
शब्द

# रुची


मार्च २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ६४

महिलादिन विशेष



बायपास, अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी झालेल्या आणि आता दम लागणे, छातीत दुखणे, पायांवर सूज, अतिरक्तदाब इ. लक्षणे असणाऱ्या रुग्णांसाठी

# हृदय तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांचा वैद्यकीय सल्ला




## हृदय तपासणीमध्ये समाविष्ट

- ई सी जी (इलेक्ट्रोकार्डिओग्राम)
- आर बी एस (रँडम ब्लड शुगर) • बी पी (रक्तदाब)
- बी एम आय (बॉडी मास इंडेक्स) • एस पी ओ 2
- शारीरिक तपासणी • डॉक्टर कन्सल्टेशन

सोबत अँजिओग्राफीची सीडी आणि मेडिकल रिपोर्ट घेऊन येणे.

फक्त ₹150/- मध्ये

सवलत फक्त २८ फेब्रुवारी दरम्यान सर्व माधवबाग क्लिनिक्स मध्ये वैध

अपॉइंटमेंटसाठी आजच मिस् कॉल द्या: **022-33494950**

Madhavbaug SAVE MY HEART FIGHT AGAINST HEART ATTACK!

VRT

An initiative by Vaidya Sane Trust

माधवबाग™ मल्टीडिसिप्लिनरी कार्डिॲक केअर क्लिनिक्स् ॲन्ड हॉस्पिटल्स्

व्हॉटएव्हर इट टेक्स

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा. मिस्डकॉल नं. **9221794571**

YouTube /Madhavbaug www.madhavbaug.org 130 क्लिनिक्स् • 2 हॉस्पिटल्स्

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची

**महिलादिन विशेष**
**मार्च २०१८, वर्ष पाचवे**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **प्रदीप म्हापसेकर**
'तिच्या वेदनांची कहाणी' या भागाकरिता रेखाटन : **ईशा सानेकर**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४३ ग्रंथाली

## अनुक्रम

### तिच्या वेदनांची कहाणी

- कोयत्याच्या तालावर पोट तोलणाऱ्या बाया... / ६
  **डॉ. कैलास रायभान दौंड**
- घरकामगारांची स्थिती व घरकामगार चळवळ / ९
  **मधू लक्ष्मण बिरमोळे**
- संघर्ष अंगणवाडी कर्मचारी महिलांचा! / १२
  **ॲड. निशा शिवूरकर**
- पुनर्वसन होताना... / १६
  **वृषाली मगदूम**
- लुटूपुटूचं अहेव लेणं...! / २२
  **श्यामल गरुड**
- तिची कविता / २५
  **गीतेश शिंदे, भगवत रावत**
- करेन हर्नी : पहिली स्त्रीवादी मनोविश्लेषक / २६
  **धनंजय गांगल**
- **'ग्रंथाली' हक्काच्या जागेत / २८**

### अक्षररंग

- उजळमाथ्यानं कुणबीपण मिरवणे महत्त्वाचे / ३०
  **प्रतिनिधी**
- शब्दशक्तीचा जागर / ३३
  **संजीवनी खेर**
- स्माइल ॲट वर्क / ३७
  **दीपक घारे**
- आर्थिक विषमता व विकास / ४०
  **डॉ. अनंत लाभसेटवार**

- परिसंवाद / ४७
- पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५१
- काळा घोडा महोत्सवातील चर्चा / ५३

### स्त्रियांच्या लेखणीतून

- ग्रंथपान – **मेहता पब्लिशिंग हाऊस / ५८**
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे / ५९**

## संपादकीय...

**श**हरात कधी कचरा वेचताना, कधी घरोघरी छोटी-मोठी कामं करणारी मोलकरीण म्हणून जगताना, कधी भर उन्हात भाज्या विकताना, कधी चहाची टपरी चालवताना, इमारती उभारताना मजूर म्हणून राबताना, रात्री-बेरात्री भर रस्त्यावर कधी आपल्या देहाचंच दुकान मांडताना 'ती' दिसते.

स्त्रीवाद, फेमिनिझम वगैरे तिच्यापासून कोसो दूर! ती रोजच्या जगण्याच्या-पोटापाण्याच्या विवंचनांशी रात्रंदिवस झगडते. ती कधी गावागावात पाला-पालातून चाळ बांधून बेफाम नाचते. देवाला सोडलेली दासी म्हणून आजन्म तिचा घास घेतला जातो. धरण बांधताना, मजूर म्हणून राबताना तुटपुंज दाम मिळालं तरी ती घाम गाळत राहते.

तिच्या कामातून, घामातून सतत काहीतरी चांगलं घडतं पण त्याचं श्रेय अनेकदा तिला मिळत नाही. कंबोडियातील वेश्याव्यवसायाच्या चिखलातून बाहेर पडून आपल्यासारख्या अनेकींची सुटका व्हावी म्हणून धडपडणाऱ्या 'सोमाली माम'चे आत्मकथन नुकतेच वाचले. स्वत:च्या शरीरावरचे चटके, माराचे व्रण, पायांभोवतीचे साखळदंड या यातनांच्या अनेक आठवणी या आत्मकथनात येतात. भयंकर अंधश्रद्धांनी कोवळ्या कळ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचे सोमालीने केलेले वर्णन वाचताना अंगावर काटा उभा राहतो. कोवळ्या मुलींबरोबर संभोग केल्यावर एड्ससारखा रोग बरा होतो, ही अशीच एक अंधश्रद्धा! समाजातल्या अंधश्रद्धा, बुरसटलेल्या रुढी-परंपरांनी स्त्रियांचे जगणे अधिकच असह्य केले. महाराष्ट्रात लाल आलवणातल्या हतबल स्त्रियांना समाजव्यवस्थेने कुरुप-विद्रूप करून अंधारात खितपत ठेवले. आसामी लेखिका इंदिरा गोस्वामी यांच्या आत्मकथनात राधेश्यामी विधवांच्या व्यथांविषयी वाचताना समाजातील परंपरांच्या क्रूर सापळ्यांविषयी अतोनात चीड येते. स्वत:ची अंत्यकर्मे नीट व्हावीत म्हणून पै-पै साठवत राहणाऱ्या या राधेश्यामी विधवा! आपल्या अंत्यसंस्कारांची त्यांना इतकी चिंता वाटते की आजारी पडल्यावर औषधोपचार केले तर पैसे खर्च होतील म्हणून त्या इलाज न करता दुखणे सोसत राहतात. कितीतरी विधवांचे अर्धे-मुर्धे जळलेले देह डोंबांनी यमुनेच्या पाण्यात फेकून दिल्याच्या हकिकती या भागात प्रसिद्ध असल्याचा उल्लेख त्यांच्या आत्मकथनात येतो. कृष्णाच्या ब्रजभूमीत 'दुधातुपाने न्हाऊन घालून, नवी वस्त्र नेसून तुमचे अंत्यसंस्कार मी करीन' असे सांगणारा भंपक ब्राह्मण या विधवांना भेटतो. किती सोपे असते बाईची फसवणुक करणे! बाईचे श्रेय पुसून टाकणे, तिला हवी ती नावे ठेवत सोयीस्कररीत्या लेबलिंग करणे, तिला नाकारणे-झिडकारणे, तिची खिल्ली उडवणे, तिचा वापर करून घेऊन, तिला साफ मोडीत काढणे हे आजवर वारंवार घडत आले आहे. स्त्रियांच्या अनेक आत्मकथनांतून बाईच्या जगण्याच्या संघर्षाचा आलेख उभा राहतो. तिच्या आयुष्यातील पडझडीच्या नोंदी दैनंदिन जीवनातही नजरेतून निसटत नाहीत.

मुंबईत प्रवास करताना समोरच बसलेल्या एखादीचे डोळे भरून आलेले दिसतात. एखादी गर्दीतच उभ्या-उभ्याने वाहत्या डोळ्यांना थोपवत असते. त्यातली कुणी लॅपटॉप सावरणारी 'कॉर्पोरेट'मधली तरुणी असते तर कुणी मध्यमवयीन असते. घरात एकट्या असताना स्वत:शीच पुटपुटणाऱ्या स्त्रियाही मी अनेकदा पाहिल्या आहेत. अशावेळी त्या स्वत:च्याच तंद्रीत असतात. रस्त्यात चालत पुरुषजातीला शिव्यांची लाखोली वाहणारी वेडाच्या टोकावरची एखादी बाईही अधूनमधून दिसते. या साऱ्याचा संबंध त्यांच्या शारीरिक-मानसिक ताणतणावांशी आहे. त्यांच्या घुसमटीशी, मानसिक कोंडमाऱ्याशी आहे. या व्यथा-वेदनांच्या असह्य ताणातून स्त्रीच्या मानसिक-शारीरिक आरोग्याचे प्रश्न आज वाढत आहेत. एका बाजूला प्रगतीची सर्वोच्च शिखरे तिने सर केलेली असली तरी बाईच्या वेदनांची कहाणी अजून संपलेली नाही. 'शब्द रुची'च्या अंकात या कहाणीचे काही धागे उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.

ते उलगडणाऱ्या लेखिका केवळ तात्त्विक बोलणाऱ्या-लिहिणाऱ्या नव्हेत. त्या प्रत्यक्ष काम करणाऱ्या आहेत. परित्यक्त्या आणि अंगणवाडी कर्मचारी स्त्रियांच्या प्रश्नांबाबत सातत्यपूर्ण काम

करणाऱ्या ॲड. निशा शिवूरकर, कचरावेचक महिलांकरता संवेदनशीलपणे झगडत राहणाऱ्या वृषाली मगदूम, मोलकरीण म्हणून संबोधल्या गेलेल्या महिलांचा, मानाने जगण्याचा हक्क त्यांना मिळावा म्हणून कार्यरत मधू बिरमोळे यांच्या लेखांतून संघटित-असंघटित स्त्रियांच्या
समस्यांचे विविध पैलू व्यक्त होतात.

कैलास दौंड यांनी ऊसतोड कामगार स्त्रियांच्या कोयत्यांमागचे वास्तव अधोरेखित केले आहे तर लावणी कलावंतांच्या पायांतील चाळांच्या कहाण्या त्यांच्यासोबत राहून, समजून घेणाऱ्या श्यामल गरुड यांचा लेख स्त्री-अभ्यासकेंद्रांच्या ॲकॅडेमिशियन्सना अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारा आहे. मानसशास्त्रज्ञ हर्नी यांची त्यांच्या क्षेत्रात झालेली उपेक्षा धनंजय गांगल यांनी मांडली आहे तर या अंकातील ग्रंथपानेही स्त्रियांच्या लेखणीतून साकारलेल्या पुस्तकांची चर्चा करणारी आहेत. महिलादिनानिमित्ताने केलेल्या अंकाच्या या मांडणीविषयी 'शब्द रुची'चे वाचक आवर्जून कळवतीलच!

आर्थिकदृष्ट्या समाजाच्या खालच्या वर्गातील, जातीच्या स्तरावरही कनिष्ठ म्हणून अव्हेरल्या गेलेल्या, नाकारलेल्या-नाडल्या गेलेल्या प्रत्येक स्त्रीची एक कहाणी असते आणि दुसऱ्या बाजूने वेगवेगळ्या वर्गातल्या स्त्रियाही त्यांच्या-त्यांच्या वाट्याला आलेल्या कहाणीच्या नायिका असतात.

अगतिकतेच्या, असुरक्षिततेच्या, निराशेच्या, वैफल्याच्या, एकटेपणाच्या, अन्यायाच्या, शोषणाच्या अंधाराशी झगडल्याखेरीज बाईला आजही पर्याय नाही. निर्मला पुतुलसारखी कवयित्री म्हणूनच हाक देते,


'उठो कि अपने अंधेरे के खिलाफ उठो!'


**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com



**ग्रंथाली**

**कथाव्रती**
**अरविंद गोखले**




लेखन-संपादन
**नीला वसंत उपाध्ये**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

अरविंद गोखले यांचा 'मंजुळा' हा कथासंग्रह नीला ज्युनियर बी.ए.ला असतानाच मी तिला शिकवला, तेव्हा संपूर्ण गोखले वाचून काढण्याची नीलाची मेहनत मी जवळून पाहिली होती. त्यामुळे 'कथाव्रती अरविंद गोखले' हा तिचा नवा ग्रंथ वाचनीय आणि अभ्यासपूर्ण झाला असल्यास नवल ते काय! माझ्या दृष्टीने अभिमानाची बाब म्हणजे, पत्रकारितेत भरीव कामगिरी करतानाच नीला उपाध्ये हिने तिच्या लेखणीचे साहित्यगुणही १८-२० ग्रंथलेखनातून निर्विवादपणे सिद्ध केले.

**– यास्मिन शेख**



# कोयत्याच्या तालावर पोट तोलणाऱ्या बाया...

/ डॉ. कैलास रायभान दौंड

**म**हाराष्ट्रात साधारणतः दोनशे सहकारी साखर कारखाने आहेत. त्यांच्या जोडीला काही खाजगी साखर कारखाने देखील आहेत. या साखर कारखान्यांना लागणाऱ्या ऊसाची तोडणी करण्यासाठी तीन-चार वर्षांपूर्वी १३ लाख ऊसतोडणी कामगार जात होते. आता काही प्रमाणात हार्वेस्टने ऊसतोडणी होऊ लागल्याने हा आकडा १० लाख इतका झाला आहे. बीड जिल्ह्यातून सर्वाधिक मजूर हे काम करण्यासाठी जातात तर नजिकच्या नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातून ५५ हजाराच्या आसपास लोक ऊसतोडणीच्यासाठी जातात. जामखेडमधूनही मोठ्या प्रमाणात लोक या कामाला जातात. ऊसतोडणी करण्यासाठी जाणारे लोक या कामाला 'बेलापूरला' जाणे म्हणतात. याचे कारण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर, हरेगाव, बेलापूर येथील साखरकारखान्यासाठी ऊसतोडणी करणाऱ्या मजूरांकडून हे नाव सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे आणि तोडणी कामगारात तर आता ऊसतोडणीच्या कामाशी ते समानार्थी झाले आहे. अतिशय कष्टाच्या या कामासाठी स्त्री व पुरुषांच्या जोड्या असतात. त्या शक्यतो एकाच कुटुंबातील असतात. या जोडीला 'एक कोयता' म्हणतात. जर तोडलेला ऊस वाहून नेण्यासाठी सोबत ट्रॅक्टर किंवा ट्रक असेल तर त्या कोयत्यांना 'डोकीसेंटर' म्हणतात आणि ऊस तोडणी करून त्या ऊसाची कारखान्यापर्यंत बैलगाडीच्या सहाय्याने वाहतूकही स्वतःच करणार असतील तर अशा कोयत्याला 'गाडीसेंटर' म्हणून ओळखतात. गाडीसेंटरपेक्षा डोकीसेंटरवाल्याचे स्थलांतर जास्त व सतत असते. पुरुष माणूस कोयत्याने ऊस तोडण्याचे काम करतो तर स्त्रिया तोडलेल्या ऊसाचे पाचट (पाने) काढणे, त्यांच्या मोळ्या बांधणे, मोळ्या वाहनांपर्यत वाहणे, नंतर सायंकाळी वाट्याला येणाऱ्या वाढ्याचा (ऊसाच्या वरला पालेदार शेंडा) चारा विकायला नेणे अशी कामे करतात. त्या क्वचित प्रसंगी ऊस तोडण्याचेही कामे करतात. या खेरीज स्वयंपाक करणे, बालसंगोपन, सोबत बैलगाडी असेल तर ती चालवणे, अशी ही कामे वाढतच जातात. या कामासाठी उचल (आगाऊ मजुरी) एका जोडीसाठी साठ ते सत्तर हजार रुपये दिली जाते. पश्चिम महाराष्ट्रात ती एक लाखापर्यंत देखील जाते.

> **ऊसतोडणी स्त्रियांची व एकूणच मजुरांची स्थितिगती सुधारायची असेल तर ऊसतोडणी मजुरांनी संघटनेतील राजकीय नेतृत्व झुगारून स्वतःचे नेतृत्व तयार करून न्याय्य हक्कासाठी पुढे आले पाहिजे. संघटनेत व निर्णयप्रक्रियेत ऊसतोडणीचे काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग घेतला पाहिजे.**

साखर उद्योगाची महाराष्ट्रातील वार्षिक उलाढाल साडेचार ते पाच हजार कोटी रुपयांची असली तरी प्रत्यक्ष ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांना आरोग्य, विमा, भविष्य निर्वाहनिधी आदी कसलीही तरतूद करण्यात येत नाही हे वास्तव आहे. एक टन ऊस तोडल्यावर कोयतेवाल्यांना अत्यल्प मजुरी मिळते. ती साधारणतः २०० रुपये इतकी मिळते. ती किमान ३०० रुपये तरी मिळावी ही त्यांची अपेक्षा आहे. कष्टप्रद आणि सतत स्थलांतराचे हलाखीचे काम करणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या जगण्याची अमानुष गाथा उलगडण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे.

ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रिया एकाच वेळी अनेक प्रश्नांशी दोन हात करत असल्याचे दिसते. संघटना व एकी यांच्या अभावाचा फायदा साखरकारखानदारांनी घेतला नसला तरच नवल. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अनेकदा मोर्चे, बंद, आंदोलने होतात परंतु ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांच्या हक्कासाठी असे कधीही होत नाही. केवळ तोंडी लावण्यापुरता ऊसतोडणी कामगारांचा वापर कैवारी संघटनांकडून केला जातो. स्त्रियांना ज्या जगण्याला सामोरे जावे लागते त्यातील अस्वस्थ करणारे काही प्रश्न असे खालीलप्रमाणे आहेत.

**कमी शिक्षण :** ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रियांचे शिक्षण अल्प असल्याचे दिसते अगदी निरक्षरांपासून ते चौथी, सातवी-आठवी इयत्तेपर्यंतचे शिक्षण असणाऱ्या स्त्रिया बहुसंख्य आहेत. जास्तीत जास्त दहावीपर्यंत शिक्षण याप्रकारचे काम करणाऱ्या स्त्रियांचे असल्याचे वास्तव आहे. शिक्षण हे जीवनमान उंचावण्याचे महत्त्वाचे साधन आहे परंतु तेच ऊसतोडणीचे काम करणाऱ्या स्त्रियांच्या पुरेसे वाट्याला येत नाही. याचे कारण म्हणजे अशा स्त्रिया बहुतांश बालविवाह प्रथेच्या बळी असतात. आईवडिलही ऊसतोडणीचेच काम करीत असल्यामुळे शाळकरी मुलींना घरी



ठेवून स्थलांतर करणे त्यांना सुरक्षित वाटत नाही. तसेच सोबत घेऊन गेले तरी सततच्या स्थलांतरामुळे कुठे शाळेत पाठवणे अवघड ठरते. अशावेळी मुलीचे लग्न लावून देण्याचा पर्याय सर्रास स्वीकारला जातो. त्यामुळे मुलीच्या सुरक्षिततेचा प्रश्न हलका होतो असे त्यांना वाटते, परंतु जीवनमान उंचावण्याचे साधन असणारे शालेय शिक्षण मिळण्याची संधी कायमची गमावली जाते.

**बालविवाहाचे दुष्टचक्र :** कायद्याने मुलीचे विवाहाचे किमान वय अठरा वर्षे पूर्ण इतके ठरवलेले आहे तरी सुद्धा बालविवाह होतात हे वास्तव आहे. ऊसतोडणी करणारे कुटुंबीय आपल्या मुलीचे लग्न जबाबदारीतून मोकळे होण्यासाठी लवकरच लावून देतात हे जसे खरे आहे तसेच मुलाचेही लग्न लवकर लावून देण्याचाही प्रयत्न असतो.असे लग्न लावून दिल्याने त्या मुलाचा एक कोयता पूर्ण होऊन ऊसतोडणीच्या कामाला जाणार असतो. हुंडा अधिक घेऊन साध्या पद्धतीने (याला गेटकेन विवाह असे म्हटले जाते.) बालविवाहाची सर्वाधिक किंमत, विवाह होणाऱ्या मुलीलाच मोजावी लागते. त्यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न तिला आयुष्यभर छळत राहतात. बालवयातील मातृत्व तिला सहन करावे लागते. कमी वयात कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्याने ताणतणाव सहन करावे लागतात. मानसिक कुचंबणा होते. याचा परिणाम अनेकदा व्यक्तिमत्त्व खुरटण्यात होतो.

**आरोग्य :** ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. बालवयातील विवाहामुळे शरीराची व मनाचीही वाढ अपूर्ण असतानाच मातृत्वाला सामोरे जावे लागल्याने पोट व गर्भाशयावर ताण पडतो. मानसिक कुचंबणा होते. शासकीय योजनेतील स्वतःच्या वाट्याचे रेशन देखील घेता येत नाही कारण सहा-सहा महिने स्वतःच्या गावी जाताच येत नाही. रोजच्या आहारातही पालेभाज्या, डाळी यांचा समावेश नसतो. पोषण आहार मिळत नसल्याने या कामगार स्त्रियांचे हिमोग्लोबिन अगदीच कमी भरते. बहुतांश बायका ॲनिमियाग्रस्त असल्याचे दिसते. पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी पाठीशी लागलेली असते. गर्भाशयाचेही आजार मागे लागतात. वेळेवर औषधोपचार मिळत नाहीत. कामावर न गेल्याने रोजगार बुडू नये म्हणून आजार अंगावर काढण्याची प्रवृत्ती बळावल्याने स्त्रियांची आरोग्याची समस्या कायम असते.


**भ्रूणहत्या :** मुलींच्या लग्नात द्यावा लागणारा हुंडा, मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न या समस्येला तोंड देतांना होणारी दमछाक यातून मुलीला जन्मच देणे नको ही भावना वाढीस लागली. कायद्याने भ्रूणहत्या बंदी असली तरी बीड, नगरसारख्या जिल्ह्यातील स्त्रियांचे कमी-कमी होत चाललेले प्रमाण चिंताजनक आहे. शिरूर कासार तालुका तर डबल रेडझोन मध्ये होता. गर्भलिंग निदान आणि नंतर होणाऱ्या भ्रूणहत्या यामुळे मुलींच्या जन्मालाच प्रतिबंध करण्याचा प्रयत्न समाजस्वास्थ बिघडवणारा ठरला आहे. अधून-मधून सोनोग्राफी मशिन व गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर कारवाई देखील केली जाते, तरी देखील हे घडतेच आहे. या विरोधात जागरूकता वाढवणे, मुलींना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी उपाययोजना करणे हाच पर्याय उपलब्ध आहे. मात्र याला किती वर्ष लागतील ते सांगता येत नाही.

गरोदरपणात ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रियांना सकस आहार मिळत नाही. सरकारी योजनांतून मिळणाऱ्या आहार घटकाचा सततच्या स्थलांतरामुळे त्यांना लाभ घेता येत नाही. ज्या गावाच्या परिसरात ऊसतोड सुरू असते, तेथील अंगणवाडीत तिची नोंदणी नसल्याने पूरक आहार मिळत नाही. माताच कुपोषित असते तिथे नवजात बाळांचे काय? त्यांचे तर लसीकरण देखील पूर्ण होत नाही. एकूणच आरोग्याच्या नावाने चांगभलं म्हणण्यासारखी परिस्थिती! साखर कारखाने या कामगारासाठी काहीच करत नाहीत. त्यांना गट विमा नाही. पीएफ नाही. आरोग्य सुविधा नाही. गरोदरपणात व बाळंतपणात सुट्टी नाही. संघटित कामगारांना मिळणारी कोणतीही सुविधा ऊसतोडणी करणाऱ्या महिलांना आणि पुरुषांना मिळत नाही . साखरकारखाने त्यांची काहीच जबाबदारी घेत नाहीत. त्यासाठी तथाकथित संघटना प्रयत्न करत नाहीत.

स्त्रियांना अनेक आरोग्यविषयक अडचणींचा सामना करावा लागतो. सतत ओझी उचलल्यामुळे पोटदुखी, गुडघेदुखी याबरोबरच मासिक पाळीमध्ये अतिरिक्त रक्तस्त्राव होणे हे त्रास महिलांमध्ये सर्रास आढळतात. ऊसाच्या मोळ्या आणि वाढे उचलून डोक्यावर वाहतूक केल्यामुळे अनेक स्त्रियांचे गर्भपात होतात. रक्तस्त्राव होण्याचे प्रमाण अनेक स्त्रियांत आढळते तर बीड, सोलापूर, अहमदनगर या जिल्ह्यातील अनेक महिलांनी अशा आजाराला कंटाळून व कॅन्सरच्या भितीने गर्भाशयच काढून टाकण्याचा मार्ग अवलंबविल्याचे दिसते. मध्यंतरी काही डॉक्टर देखील महिलांना कॅन्सरची भीती दाखवून गर्भाशय काढून टाकण्याचा सल्ला देत असल्याचे वाचनात आले. कधी-कधी वारंवार दवाखान्यात जाणे शक्य नसल्याने महिलादेखील हा मार्ग पत्करतात. मात्र यामुळे पुढे कंबरदुखी वाढत असल्याचेही स्त्रिया सांगतात.

वरील सगळी छळाची व पिळवणुकीची मालिका कमी की काय म्हणून, या स्त्रियांपैकी अनेक जणींना कौटुंबिक छळाची शिकार व्हावे लागते. रोज भल्या पहाटे उठून स्वयंपाक वगैरे कामे आटोपावी लागतात. त्यानंतर ऊसतोडणीच्या कामाला निघायचे. गाडीसेंटर असेल तर अनेकदा गाडी देखील हाकावी लागते. जेवण तर थेट परतीच्या वेळीच ऊसाच्या गाडीवर बसून करावे लागते.






डोकीसेंटर असेल तर वेळेचं बंधन न पाळता ट्रकभर ऊस तोडल्यावरच भाकरी खायला वेळ मिळतो. दरम्यानच्या काळात स्वतःच्या लहान लेकराकडेही पहायला वेळ नसतो. एवढे करूनही अधूनमधून नवरोबाचा अधिकार आणि इगो सांभाळावा लागतो. या व्यवसायात व्यसनी पुरुषांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्याचा परिणाम म्हणजे महिलांच्या छळणुकीत व मानसिक ताणतणावात वाढ! मात्र अनेक स्त्रियांनी हे सगळे सोसत कुटुंब, प्रपंच सांभाळला आहे.

दारिद्र्य आणि व्यसनाधीनता यांचं जणू अतूट नातं आहे. दसरा-दिवाळीच्या दरम्यान गावोगावी मुकादम लोक फिरू लागतात. (त्यांना ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांच्या कामावर कमिशन मिळत असते.) ऊसतोडणी कामगार त्यांच्याकडून गरजेनुसार उचल (आगाऊ मजुरी) घेतात. या पैशातून घर, शेती, लग्नकार्ये असं काही करता येईल असे नियोजन ऊसतोडणी कामगार स्त्री करत असते. तसा आग्रह धरत असते. पुरुष धोरणी असेल तरच या पैशाचा सुयोग्य उपयोग होतो. या प्रकारचे काम करणारे अनेक पुरुष दारू, गांज्या अशा व्यसनात गुरफटलेले असतात. मग मात्र ऊसतोडणीला जाण्याआधीच पैशाला पाय फुटलेले असतात. स्त्रीचे स्वप्न कोलमडलेले असते. इच्छा नसताना केवळ राबणे एवढेच तिच्या हातात राहते. पैशाचा अपव्यय झाल्याने व स्त्रीच्या हातात आर्थिक नियोजन नसल्याने दारिद्र्य वाढत राहते.

**कौटुंबिक ताणतणाव :** घेतलेला पैसा वाया घालवल्याबद्दल घरातल्या बाईला सहाजिकच राग येतो. ऊसतोडीच्या दिवसातील खर्च केवळ वाट्याला येणारे वाढे विकूनच भागवावा लागतो. त्या पैशातही व्यसनी पती वाटेदार होतो. त्यातून वाद निर्माण होतात. कुटुंबातील शांतता संपते. वर्षानुवर्षे ऊसतोडणीचे काम करूनही व्यसनी पुरुष असणाऱ्या कुटुंबाच्या दारिद्र्याचे दशावतार काही संपत नाहीत. वेळप्रसंगी सावकाराकडून देखील काही घ्यावे लागते. अशा कुटुंबातील स्त्रियांच्या कुचंबणेची कल्पनाच केलेली बरी.

**बागायतदाराचे वर्तन :** बरेचदा ऊसउत्पादक बागायदार शेतकरी ऊसतोडणी कामगारांना तुच्छ समजून बोलत असतात. ऊस थोडा वरूनच तोडला, वाढे कमीच कसे, शेतातील मिरच्या-कोथिंबीरच चोरली असे म्हणत भांडायलाही कमी करत नाहीत. याचा सर्वाधिक त्रास महिलांनाच होतो. काही बागायतदार मात्र ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांशी चांगले व आपुलकीने वागत असल्याचेही वास्तव आहे.

पुरुषसत्ताक पद्धत असल्यामुळे महिला मुकादम सहसा दिसत नाहीत.

काही ठिकाणी स्त्रियांचा कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत सहभाग असल्याने एखादी बकरी पाळली जाते. ऊसतोडणी कामगारांच्या संघटना असल्या तरी या संघटनावर सतत साखरकारखानदारांचाच वचक राहिलेला आहे तर काहींनी या कामगारांचे नेतृत्व करत करत राजकीय जम बसवत साखरकारखाने काढले आहेत. त्यामुळे कामगारांचे अहित होत आलेले आहे. ऊसतोडणी स्त्रियांची व एकूणच मजुरांची स्थितिगती सुधारायची असेल तर ऊसतोडणी मजुरांनी संघटनेतील राजकीय नेतृत्व झुगारून स्वतःचे नेतृत्व तयार करून न्याय्य हक्कासाठी पुढे आले पाहिजे. संघटनेत व निर्णयप्रक्रियेत ऊसतोडणीचे काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग घेतला पाहिजे.

**बदलाच्या दिशेने धुरळ्याचे वादळ :** दरवर्षी हंगामाच्या तोंडावर ऊसउत्पादक व कारखानदार यांच्यात वाटाघाटी वाढतात. आंदोलने होतात. काही लोक ऊसतोडणी करणाऱ्या कामगारांना विचारात न घेता संप, बंद पुकारतात. याचा परिणाम हंगाम लांबण्यात होतो. या मजुरांना मे महिन्यात देखील काम करण्याची वेळ येते. वेळोवेळी लवाद देखील नेमले जातात पण सुरक्षा काही वाट्याला येत नाही. ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रियांचे अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न अधांतरीच आहेत. ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांची मुलेच जेव्हा पुढाकार घेतील तेव्हाच या स्त्रियांचे भविष्य सुखकर होण्याची शक्यता आहे.

(लेखक ग्रामीण साहित्यिक व समीक्षक असून शिक्षक आहेत. ऊसतोडणी करणाऱ्या कामगारांचे जीवनानुभव चित्रण असणारी 'पाणधुई' कादंबरी व याच विषयावरील मराठीतील पहिलाच ठरलेला 'ऊसाच्या कविता' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे.)

**- डॉ. कैलास रायभान दौंड**
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११
kailasdaund@gmail.com



# घरकामगारांची स्थिती व घरकामगार चळवळ...

/ मधू लक्ष्मण बिरमोळे

**भा**रतात असंघटित कामगारांची संख्या सद्यस्थितीत ९६ टक्के इतकी असून घरकामगारांची संख्या यामध्ये ४० टक्के इतक्या प्रमाणात किंबहुना जास्त आहे कारण भारतात घरकामगार म हिलांचा आजपावेतो कोणत्याही राज्यात योग्य सर्व्हे झालेला नाही. महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक शहर असल्याने महाराष्ट्रात अंदाजे २५ ते ३० लाख कामगार काम करतात. मी मधू लक्ष्मण बिरमोळे गेली १५ वर्षं कष्टकरी घरकामगार संघटनेची अध्यक्ष असून घरकामगारांच्या स्थितीबद्दलचा ऊहापोह या लेखात करते आहे.

> **माझ्या आयुष्यात घरकाम करत असताना आलेले अनुभव आणि भारतातील घरकाम गारांना सन्मानाचं जगणं प्राप्त व्हावं म्हणून कष्टकरी घरकामगार संघटना सन २००४ सालात स्थापन केली. मी व माझा नवरा (लक्ष्मण बिरमोळे) डोंबिवलीमधील प्रत्येक इमारतीच्या बाहेर घरकामगार महिलांना त्यांच्या हक्कांबाबत, सन्मानाच्या लढाईबाबत जागृत करत असू.**

महाराष्ट्रात घरकामगार क्षेत्रात काम करणाऱ्या ९० टक्के या महिला असून आपल्या कामाला कामगार म्हणून संबोधले जावे अशाप्रकारचा समज या महिलांना नाही, ही मोठी शोकांतिका आहे.

**घरकामगारांची कौटुंबिक स्थिती :** घरकामगार महिला या सर्वच अशिक्षित आहेत असा समाजामध्ये समज आहे. तो संपूर्ण खोटा असून घरात हातभार लावावा म्हणून अनेक सुशिक्षित महिला या घरकाम करतात. बऱ्याच घरकामगारांच्या घरात महिलांचा नवरा हा असंघटित कामगार असतो. उदा. प्लंबर, वायरमन, बिगारी, मेस्त्री, हेल्पर किंवा शहरातील एमआयडीसीमधील नोकरी नाहीतर ड्रायव्हर! त्यांचा पगार खूपच कमी असतो. कुटुंब मोठे असते. मुलांचे शिक्षण या सर्व गोष्टींसाठी आपल्या घरात आर्थिक मदत व्हावी म्हणून कष्ट करून, आपले वीतभर पोट भरावे यासाठी महिला घरकामगार म्हणून नोकरी पत्करतात. ८० टक्के घरकामगार झोपडपट्टी (स्लम) विभागात राहतात.

**घरकाम महिलांची आरोग्य स्थिती :** घरकामगार महिला एका दिवसात ६ ते ७ घरात धुण्याभांड्याचे काम करतात. बरीचशी कामे तिसरा माळा, चौथा माळा इमारतीत असतात. जिने चढणे व उतरणे यामुळे अनेक वेळा घरकामगार महिलांच्या गुडघेदुखीचा रोग बळावतो. सातत्याने त्यांचे काम पाण्यामध्ये व कपडे धुण्यासाठी, भांडी घासण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट यामुळे तसेच संरक्षणासाठी कोणतीही सुविधा नसल्याने हातापायाची त्वचा गळू लागते. घरकामगार पाण्यात काम करत असल्याने खोकला, सर्दी, ताप अशाप्रकारचे आजार सातत्याने होत असतात. याबाबत घरकामगार महिलांना कोणतीही आरोग्य सुविधा नसल्याने, बऱ्याच वेळा या आजारांसाठी पैसे नसल्याने, बऱ्याच महिलांना आपला जीव गमवावा लागतो.

गेल्या १५ वर्षांत टीबी किंवा अन्य रोगांच्या लागण झाल्याने अनेक घरकामगारांना जीव गमवावा लागला आहे.

**घरकामगार महिलांचे वेतन :** महाराष्ट्रात घरकामगार महिलांच्या वेतनाबाबत कोणतेही निश्चित निकष नाहीत. ग्रामीण भागात घरकामगार महिलांची स्थिती फारच बिकट आहे. या महिला सहा घरची कामे करतील तेव्हा महिनाकाठी त्यांना रक्कम २००० रुपये इतका कमी पगार मिळतो आणि शहरात उदा. मुंबई या ठिकाणी तिने सहा घरची धुणीभांडी केल्यास जास्तीत-जास्त ४००० रुपये इतका पगार दिला जातो. या घरकामगार महिलांना हाफटाईम घरकामगार म्हणून संबोधले जाते. जेव्हा की इतक्या घरांमध्ये काम करण्यासाठी आठ तास काम करावे लागते म्हणजेच घरकामगारांची वेळ (तास) सुद्धा निश्चित केली जात नाही. त्याशिवाय घरकामगार महिलांना दुकानात जाणे, कपडे इस्त्री करून आणणे, सणावाराला जादा काम करून घेणे, यासाठीचा जादा मेहनताना दिला जात नाही. दिवाळीला बोनस न देता एखाद्या साडीवर भागवले जाते. आठवड्याला सुट्टी दिली जात नाही. आजारपणात सुटी घेतल्यास पगाराच्या वेळी रक्कम कापून घेतली जाते. गावी जाण्यासाठी सुट्टी घेतल्यास पर्यायी घरकामगार महिला द्यावी लागते. नोकरीबाबत संरक्षण नाही. मालकाच्या मनाला वाटेल तेव्हा काढू शकतात.





कोणतीही हमी नाही. घरकामगारांमध्ये एकी नसल्याने एकमेकांत स्पर्धा दिसते. कमी वेतनामध्ये गरज म्हणून काम करावे लागते.

**वयोवृद्ध व एकल घरकामगार महिलांची स्थिती :** घरकामगार महिलांचे ४० ते ५० वर्षं वय झाल्यानंतर त्यांना काम करणे शक्य होत नाही. ५५ ते ६० वर्ष वयात या सर्व महिला घरकाम करत नाहीत त्यामुळे बऱ्याच महिला कुटुंबव्यवस्थेतून बाहेर फेकल्या जातात म्हणून या महिलांचे जीवन दुसऱ्यावर अवलंबून असते. त्यासाठी सरकारकडून कोणताही उपाय नसल्याने त्यांची अवस्था बिकट होते. बऱ्याच घरकामगारांच्या पतीचे व्यसनामुळे निधन होते. त्या महिलंना मालमत्तेमधील हक्क मिळत नाहीत व कमवायचे कोणतेही साधन नसल्याने या महिलांना सातत्याने आपल्या अस्तित्वाची लढाई करत जगावे लागते. कधी-कधी या महिलांना भूकबळी व्हावे लागते.

**स्थलांतरित घरकामगारांची स्थिती :** मुंबई व उपनगरात बऱ्याच वेळा धनदांडग्या कुटुंबाच्या सेवेसाठी नेपाळ, बांगलादेश किंवा ग्रामीण भागातून घरकामगार महिलांना एजन्सीमार्फत किंवा ओळखीने बोलावले जाते. अतिशय अल्प वेतनामध्ये २४ तास काम करून घेतले जाते. त्यांना एक सर्व्हंट रूम, ज्या खोलीमध्ये कोणतीही सुविधा नसते. दोन वेळचे जेवण दिले जाते. मात्र या घरकामगारांना वेळेचे कोणतेही बंधन नसते. त्यांचे वेतन जास्तीत जास्त ६००० रुपये इतके कमी असते.

**घरकामगार व एजन्सीमार्फत होणारे व्यापारीकरण :** दिल्ली-मध्ये जास्तीत जास्त घरकामगार महिला एजन्सीमार्फत पुरविल्या जातात. महाराष्ट्रात सुद्धा काही एजन्सी घरकामगार महिलांचा पुरवठा कधी घरात करतात. या घरकामगार महिलांकडून त्यांच्या मेहनतान्यातून काही ठिकाणी २ टक्के, ५ टक्के इतकी रक्कम मोबदला म्हणून घेतात. अशा प्रकारच्या एजन्सीमार्फत घरकामगार महिलांचे आर्थिक शोषण केले जाते.

**घरकामगार महिलांची सामाजिक स्थिती :** घरकामगारांना समाजामध्ये कामगार म्हणून सन्मान दिला जात नाही म्हणून मावशी, माई, आक्का असे त्याचे नामकरण केले जाते. खऱ्या अर्थाने संघटित वर्गात ८० टक्के महिला नोकरी करतात कारण की, घरात घरकामगार महिला काम करतात. मात्र या घरकामगारांमध्ये आपले सामाजिक स्थान व दर्जा कोणता याबाबत जागृती करणे गरजेचे आहे. आपण जे काम करतो ते काम सन्मानाचे व कामगार क्षेत्रात मोडणारे आहे हे कळणे काळाची गरज आहे.

**घरकामगार व न्यायव्यवस्था :** बऱ्याच वेळा असे निदर्शनास आले आहे की, घरात चोरी झाली, दरोडा पडला, खिशातून पैसे चोरीला गेले, घरात सोने सापडले नाही अशा अनेक केसेसमध्ये पोलिसांचा घरकामगार महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन हा, ह्या महिला चोर आहेतच असा असतो म्हणून कोणतीही नोटीस न देता घरकामगारांना अटक केली जाते. या अशा अनेक घरकामगार महिलांच्या समस्या आहेत. या घरकामगारांना भारतात कोणत्याही राज्यात सामाजिक सुरक्षा कवच नाही. हा विचार करून मी व माझ्या आईने घरकाम करून आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व मुलांचे शिक्षण केलं. मला माझ्या आयुष्यात घरकाम करत असताना आलेले अनुभव आणि भारतातील घरकामगारांना सन्मानाचं जगणं प्राप्त व्हावं म्हणून कष्टकरी घरकामगार संघटना सन २००४ सालात स्थापन केली. मी व माझा नवरा (लक्ष्मण बिरमोळे) डोंबिवलीमधील प्रत्येक इमारतीच्या बाहेर घरकामगार महिलांना त्यांच्या हक्कांबाबत, सन्मानाच्या लढाईबाबत जागृत करत असू. मात्र याच घरकामगार महिला आमची चेष्टा करत म्हणत, ''आपल्याला कोण कामगार म्हणणार ही माणसं आपल्याला स्वप्न दाखवतात.'' मात्र डोंबिवलीतील महात्मा फुलेनगरमधील चार घरकामगार महिलांना आमचं म्हणणं पटलं आणि सन २००४ मध्ये पहिली ठिणगी पडली. संघटनेची घोडदौड सुरू झाली.

घरकामगारांना मानसन्मान, कामगार दर्जा मिळावा यासाठीची लढाई सुरू झाली. बघता बघता डोंबिवलीमध्ये ५०० ग्रुप लिडर तयार झाल्या व ५००० सभासद आणि मग थांबणे नाही. मुंबई,





रायगड, नाशिक, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, यवतमाळ, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर, बीड अशा अनेक ठिकाणी संघटना स्थापन झाली. २००० ग्रुप लिडर व २०,००० सभासद आणि १०,००० सहकारी अशी संघटनेची वाढ झाली. हा काळ होता सन २००४ ते २०१०!

**संघटनेच्या आंदोलनाचा घटनाक्रम**

१. सन २००६ – घरकामगार हक्क कामगार दर्जा मागणी मोर्चा
२. सन २००६ – नागपूर अधिवेशन मोर्चा
३. सन २००६ – कामगार आयुक्त कार्यालय मोर्चा
४. सन २००७ – घरकामगार सन्मान यात्रा नेरळ ते कर्जत
५. सन २००८ – घरकामगार अधिकार व आत्मसन्मान रॅली चैतन्यभूमी ते परेल कामगार मैदान

**विशेष**

सन २००८ महाराष्ट्र सरकारला घरकामगार महिलांची दखल घ्यावी लागली आणि सरकार द्वारे 'महाराष्ट्र घरेलू कल्याण मंडळा'ची घोषणा केली गेली.

तत्कालीन कामगारमंत्री नवाब मलिक यांनी महाराष्ट्रातील घरकामगारांसाठी मंडळ स्थापन केले व त्या मंडळामध्ये 'मधू बिरमोळे' यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. मात्र संघर्ष संपला नव्हता. या मंडळात घरकामगारांसाठी खालील मागण्या करण्यात आल्या.

१. महाराष्ट्रातील घरकामगारांचा सर्व्हे करा.
२. घरकामगारांना ओळखपत्र द्या.
३. घरकामगारांना मोफत आरोग्य सुविधा द्यावी.
४. घरकामगारांना कमी खर्चात घरकुल मिळावं.
५. घरकामगारांना (बीपीएल) दारिद्र्य रेषेखालील रेशन कार्ड द्यावे.
६. विभागवार घरेलू कल्याण मंडळ स्थापन करावे.
७. घरकामगारांसाठी स्वतंत्र न्यायमंडळ स्थापन करावे.
८. संघटित कामगारांप्रमाणे आठवडा सुट्टी, आजारी रजा, बोनस इत्यादी सुविधा प्राप्त व्हाव्यात.
९. घरकामगारांचे किमान वेतन निश्चित करावे.
१०. एकल व वयोवृद्ध घरकामगार महिलांसाठी कल्याण मंडळाद्वारे पेन्शन व्यवस्था असावी.

सन २०१० साली महाराष्ट्र घरेलू कल्याण मंडळ व या सर्व मागण्यासंदर्भात अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रातील ३०,००० घरकामगारांचा विराट मोर्चा विधानसभेवर काढण्यात आला. गेली सात ते आठ वर्ष सातत्याने पाठपुरवठा केला म्हणून महाराष्ट्रातील काही विभागात सर्व्हे केला व ओळखपत्रे देण्याचे काम सुरू झाले. मात्र या सरकारच्या काळात हे काम पूर्ण बंद आहे. संघर्ष आजही सुरू आहे. हा संघर्ष करत असताना माझ्या कामाची व कार्याची काही सामाजिक संस्था व संघटना यांनी दखल घेऊन पुरस्कार देऊन कामाची पोचपावती दिली त्यापैकी काही पुरस्कार :

१. मजूर रिपब्लिकन पुरस्कार, २००७–०८
२. जीवन ज्योत प्रेरणा सावित्रीमाई फुले, ६ जानेवारी २००८
३. शिक्षक मित्र पुरस्कार, ३१ जानेवारी २००९
४. धमाल महिला उत्सव, बदलापूर सावित्रीमाई फुले, २०१२
५. लोकसत्ता उपक्रम, नवदुर्गा पुरस्कार, २०१४
६. 'फकिरा' सत्यशोधक पुरस्कार, २०१४
७. ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, ८ मार्च २०१५
८. भारतीय कामगार कर्मचारी महासंघ

आम्हाला ठाऊक आहे कष्टकरी घरकामगारांना न्याय मिळणारच कारण ही आत्मसन्मानाची लढाई आहे.

म्हणून आम्ही साऱ्याजणी म्हणतो.

'लढेंगे, जितेंगे!'

(अध्यक्ष, कष्टकरी कामगार संघटना, महाराष्ट्र)

**– मधू लक्ष्मण बिरमोळे**
भ्रमणध्वनी : ९००४१८८६४६



# संघर्ष अंगणवाडी कर्मचारी महिलांचा!

/ ॲड. निशा शिवूरकर

गेल्या वर्षी महाराष्ट्रात झालेले तीन संप गाजले. १ जून २०१७ पासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केलेला संप अभूतपूर्व म्हणावा असाच होता. शेतकरी संप करू शकतो ही कल्पनाच शेतकरी व अन्य समाजालाही न पटणारी होती, पण परिस्थितीच अशी निर्माण झाली की, सर्व बाजूंनी नाडल्या गेलेल्या या जगाच्या पोशिंद्याला जगणे मुश्कील झाले. शेतकरी आत्महत्या वाढल्या, तसाच एक असंतोषही धुमसत आहे. त्यामुळे अस्मानी अन् सुलतानी संकटांच्या फेऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्याने संप पुकारला, अन् यशही मिळाले. महाराष्ट्र सरकारने संप फोडण्याचा प्रयत्न केला तरी शेतकऱ्यांनी आपली लढाई सुरूच ठेवली. कर्जमुक्ती, शेतमालाला योग्य हमी भाव देण्याचे सरकारने कबूल केले तेव्हाच संप मागे घेतला गेला, परंतु अद्यापही शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडले नाही. शेतकरी पुन्हा आंदोलनाच्या तयारीत आहेत.

**'अंगणवाडी कर्मचारी सभा, महाराष्ट्र' या संघटनेची मी महाराष्ट्राची अध्यक्षा आहे. संघटनेच्या स्थापनेपासून म्हणजे १९८५पासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या लढ्यात सहभागी आहे. संपकाळात वर्तमानपत्राच्या व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींनी आणि अनेक नागरिकांनी मला विचारलेय की काय आहेत या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे प्रश्न? घरदार सोडून, धोकादायक प्रवास करत का त्या मुंबईच्या आझाद मैदानावर सतत येत असतात?**

दुसरा संप झाला तो अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठतेनुसार मानधन मिळावे म्हणून. या प्रमुख मागणीसाठी ११ सप्टेंबर २०१७पासून सुरू झालेला हा संप २६ दिवस चालला. या काळात महाराष्ट्रात ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलन, जेलभरो कार्यक्रम झाले. हजारो महिला रस्त्यावर आल्या. अखेर ६ ऑक्टोबरला मुख्यमंत्र्यांनी संघटनांच्या कृती समितीशी चर्चा केली. सेवाज्येष्ठतेनुसार मानधन वाढ देण्याचा आणि भाऊबीज रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय दोन्ही, मुख्यमंत्र्यांनीच जाहीर केले. सेविकांना १५०० रुपये, मदतनीसांना १००० रुपये तर मिनी अंगणवाडी सेविकांना १२५० रुपये मानधन वाढ जाहीर केली. एप्रिल २०१८ पासून सेवाज्येष्ठतेनुसार मानधन वाढ देण्याचेही मान्य केले.

संप काळात महाराष्ट्रातील वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक माध्यमं संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांबरोबर होती. सगळे विरोधी पक्ष सरकारला जाब विचारत होतेच पण सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेनेनेही जाहीर पाठिंबा दिला. या आंदोलनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या दिवशी गावागावात झालेल्या ग्रामसभांमध्ये 'अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार मानधन वाढ द्यावी' असे ठराव झाले. सारे गाव संपकरी कर्मचारी महिलांच्या लढ्यात सहभागी झाले. अद्यापही सरकारने कबूल केल्याप्रमाणे मानधन वाढीचा आदेश काढलेला नाही. या कर्मचाऱ्यांना मानधन मिळालेले नाही. कर्मचारी संघटना पुन्हा आंदोलनाच्या तयारीला लागल्या आहेत. या लेखात आपण या अंगणवाडी कर्मचाऱ्यांविषयीच अधिक जाणून घेणार आहोत.

शेतीत धान्य पिकवणारा शेतकरी अर्धपोटी, एस.टी. कर्मचारी अर्धपोटी अन् गावागावात व शहरातील गरीबांच्या वस्त्यांमध्ये स्त्रिया व मुलांचे कुपोषण थांबवण्यासाठी काम करणाऱ्या अंगणवाडी कर्मचारीही मानधनाअभावी अर्धपोटी अन् कुपोषित ही आजची स्थिती आहे.

'अंगणवाडी कर्मचारी सभा, महाराष्ट्र' या संघटनेची मी महाराष्ट्राची अध्यक्षा आहे. संघटनेच्या स्थापनेपासून म्हणजे १९८५पासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या लढ्यात सहभागी आहे. संपकाळात वर्तमानपत्राच्या व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींनी आणि अनेक नागरिकांनी मला विचारलेय की काय आहेत या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे प्रश्न? घरदार सोडून, धोकादायक प्रवास करत का त्या मुंबईच्या आझाद मैदानावर सतत येत असतात? सरकार त्यांच्या मागण्या का मान्य करत नाही? या लेखात हेच मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने नियोजनाची अर्थव्यवस्था स्वीकारली. तर कल्याणकारी राज्याचे स्वप्न पाहिले. १९९० पूर्वीच्या सर्वच पंचवार्षिक योजनांची आखणी या दृष्टिकोनावर आधारित होती. त्यामुळे महिला, बालके, ग्रामीण जनता, शहरातील गरीब माणसांसाठी अनेक योजना आखल्या गेल्या. महिला व



बालकल्याणासाठी विविध योजनांच्या नावे वेगवेगळ्या खात्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च केले. तरीही ना बालकांचे कुपोषण थांबले ना गर्भवती महिलांचे मृत्यू. त्यामुळे महिला व बालकल्याणासाठी विशेष व स्वतंत्र योजनेची गरज वाटू लागली. २ ऑक्टोबर १९७५ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या दिवशी केंद्र सरकारने 'एकात्मिक बाल विकास योजना' सुरू केली. बालकांचे व महिलांचे आरोग्य तसेच बालकांचे शिक्षण, पोषण आहार यासाठी असलेल्या विविध योजना या योजनेत एकत्रित करण्यात आल्या. या योजनेसाठी युनिसेफचे सहकार्य सुरुवातीपासून होते.

० ते ६ या वयोगटातील मुलांना आरोग्य, पोषक आहार, शिक्षण देणे हे योजनेचे उद्दिष्ट ठरले. त्यासाठी 'अंगणवाडी' हे केंद्र ठरवण्यात आले. या कामासाठी 'सेविका' व तिला मदत करण्यासाठी 'मदतनीस' अशी दोन पद निर्माण करण्यात आली. योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ महिलांनाच ही पदे देण्यात आली. ही पदे 'मानधनी' आहेत. त्यांना वेतन नाही. कर्मचारी जरी सरकारचे काम करत असल्या तरी त्या शासकीय कर्मचारी नाहीत. महिला सबलीकरणाचे काम करणाऱ्या कर्मचारी महिला दुर्बल रहाव्यात असेच शासनाचे धोरण आहे.

सुरुवातीला ठरावीक भागात अंगणवाड्या सुरू करण्यात आल्या. महाराष्ट्रात मुंबईत धारावीला पहिली अंगणवाडी सुरू झाली. कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांनी केले नाही इतके काम या कर्मचाऱ्यांनी केले. त्यामुळे योजनेचा विस्तार वाढत गेला. महाराष्ट्रात १९८४ रोजी ठिकठिकाणी अंगणवाड्या स्थापन झाल्या. सध्या देशात अठ्ठावीस लाख तर महाराष्ट्रात दोन लाख सात हजार पाचशे सत्तावन्न महिला या प्रकल्पासाठी काम करतात. महाराष्ट्रातील ९७ हजार अंगणवाड्यांमधून ७३ लाख बालकांना आणि ३ लाख गर्भवती महिलांना पोषक आहार दिला जातो.

बालमृत्यू व गरोदर स्त्रियांचे मृत्यू रोखणे, बाळंतपणातील स्त्रियांचे मृत्यू रोखणे, ०-६ वयोगटातील बालकांना आरोग्य सुविधा, पोषण आहार, पूर्वप्राथमिक शिक्षण देणे इत्यादी एकात्मिक बालविकास प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टं आहेत. त्यासाठी कर्मचारी महिलांवर पुढील कामे सोपवण्यात आली.

१. पूरक पोषण आहार वाटप करणे.
२. आरोग्य तपासणीस मदत करणे.
३. लसीकरण व रोगप्रतिबंधक शक्ती वाढवणे.
४. संदर्भसेवा व आरोग्यसेवा देणे.
५. पूर्वशालेय शिक्षण देणे.
६. आरोग्य व सकस आहारविषयक शिक्षण देणे व कुपोषण नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.

या सहा मुख्य कामांद्वारे मुलांचा योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकास घडवून आणणे, पोषण व आरोग्यविषयक दर्जा सुधारणे, बालमृत्यू, बालरोग, कुपोषण व शाळा प्रस्थापित करणे असे व्यापक समाज बदलाचे काम अंगणवाडी कर्मचारी करत आहेत. या सहा नेमून दिलेल्या कामांसाठी प्रत्येकीने रोज एकूण पाच तास काम करायचे आहे. याशिवाय शासनाच्या विविध योजना, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण, महिला समृद्धी, हागणदारीमुक्ती इत्यादी कार्याचा भार अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर टाकला जातो. त्यांना सुमारे १८-२० रजिस्टर्स भरावी लागतात. त्यामुळे त्यांना रोज ८ ते १० तास काम करावे लागते. आपल्या कामाचा भाग म्हणून रोज गृहभेटीही द्याव्या लागतात.

गावात तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक इ. शासकीय व निमशासकीय कर्मचारी 'जे' काम करू शकले नाहीत 'ते' काम अंगणवाडी कर्मचारी महिला अत्यल्प मानधनावर करत आहेत. गरोदरपण, बाळंतपण हा निसर्गक्रम आहे. यासाठी औषध, लस, आहार इत्यादीची गरज नाही असे समाजमानस होते. अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, उदासीनता व बेजबाबदारपणा कमी करण्यात यश मिळविले आहे. शिक्षण, स्वच्छता, आरोग्य, गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची नोंद घेणे, बचत करणे, गर्भवती मातेचे वजन घेणे, योग्य वेळी, योग्य ती लस देणे, विविध गोळ्या व औषध देणे, विविध प्रकारची लस टोचणे, सकस आहार देणे इ. कामे गावात राहून अंगणवाडी कर्मचारी महिला करत आहेत. व्यापक समाज परिवर्तनाचे पायाभूत कार्य करणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कार्याचे महत्त्व समाजमान्य झाले आहे. सरकारला मात्र या कामाची किंमत नाही.

जन्माच्या नोंदीचे रजिस्टर ग्रामपंचायतीमध्ये धूळ खात पडून होते. त्यामुळे लोकांना जन्मनोंदीसाठी बरीच यातायात करावी लागत होती. नोंदणी केली नसेल तर न्यायालयात अर्ज करून हुकूम घ्यावा लागत होता. अंगणवाडी सेविका जन्मनोंदीच्या कार्यात सहभागी झाल्यामुळे जन्मनोंदी व्यवस्थित होत आहेत. अत्यल्प काळात लोकांचा सहभाग घेऊन परिवर्तनाचे कार्य अंगणवाडी कर्मचारी करत आहेत. परिणामत: अंगणवाडी हे गावातील परिवर्तनाचे केंद्र बनलेले आहे.

**'धन' ही नाही अन् 'मान' ही नाही!**

दररोज ८ ते १० तास काम करणाऱ्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा नाही. त्यांना मानसेवी कर्मचारी मानून सेवेच्या मोबदल्यात मानधन दिले जाते. सुरुवातीला सेविकेला ११० रु. व मदतनीसांना ७५ रु. मानधन दिले जाई. कोणत्याही रजा, सुट्ट्या नव्हत्या, कामाच्या वेळेची निश्चिती नव्हती. सारे गाव दिवाळी साजरे करत असताना या कर्मचारी मात्र 'सुकडी'

वाटपासाठी अंगणवाडी उघडून बसत. कोणतीही बढती नव्हती. बोनस नव्हता. योजनाबाह्य कामांची सक्ती होती. अनेक कामे अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर लादली जात होती. कोणत्याच कामाला या महिला नाही म्हणू शकत नव्हत्या. धन कमी अन् मान बिलकूल नव्हता. गावातील महिला व बालकांचे आयुष्य घडवायला निघालेल्या या महिलांचे आयुष्य अंध:कारमय झाले होते. कामाचे ओझे, अधिकाऱ्यांचा दबाव, लोकप्रतिनिधींची व गावातील टग्यांची दादागिरी या दुष्टचक्रात अंगणवाडीच्या भगिनी सापडल्या होत्या. समाजातील अत्यंत तळच्या व दुबळ्या वर्गातील स्त्रियांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष नव्हते. प्रस्थापित कामगार संघटना व त्यांच्या पुढाऱ्यांनाही या असंघटित क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची तीव्रता जाणवली नाही.

**महाराष्ट्रात अंगणवाडी कर्मचाऱ्यांची पहिली संघटना स्थापन झाली**

१९८२ नंतर अंगणवाड्यांची संख्या वाढत गेली. अत्यल्प मानधन देणारे हे काम करण्यास गावांमध्ये कोणी तयार नव्हते. अत्यंत गरीब व उपेक्षित स्त्रिया हे काम करायला पुढे आल्या. या महिलांमध्ये ४५ टक्के स्त्रिया विधवा, परित्यक्ता म्हणजे एकटीने कुटुंब चालवणाऱ्या आहेत. अनेक अडचणींना तोंड देत त्यांनी महिला व बालकल्याणाचे काम सुरू केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी व जयप्रकाश नारायण यांच्या विचारावर निष्ठा असलेले साथी बा.न. राजहंस (आण्णा) यांनी महाराष्ट्रात शेतमजूर, कष्टकरी, असंघटित कामगारांच्या संघटना बांधल्या, राज्यभर फिरताना साथी बा.न. राजहंस यांचे अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे सर्वप्रथम लक्ष गेले. या महिलांची संघटना करण्याचा विचार व निर्धार त्यांच्या मनात पक्का झाला. त्यांनी आम्हा कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली. बैठकीत 'अंगणवाडी कर्मचारी सभा' स्थापन करण्याचा निर्णय झाला. साथी राजहंस आण्णा, साथी मुकुंदराव कोल्हटकर व आम्ही सर्वच कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. महाराष्ट्रातील अंगणवाडी कर्मचारी भगिनींनी प्रत्यक्ष भेटून संघटित केले. २५ जानेवारी १९८५ रोजी 'अंगणवाडी कर्मचारी सभा (महाराष्ट्र)' ही अंगणवाडी कर्मचाऱ्यांची महाराष्ट्रातील पहिली संघटना स्थापन झाली. याच काळात हिंद मजदूर सभेने देशभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना संघटित केले.

'एकात्मिक बालविकास प्रकल्प केंद्र' सरकारमार्फत राज्यसरकारद्वारा चालवला जातो. अंगणवाडी कर्मचाऱ्यांची जबाबदारी घ्यायला केंद्र व राज्य शासन दोघेही तयार नव्हते, परंतु हिंद मजदूर सभेने देशभर व अंगणवाडी कर्मचारी सभेने राज्यभर संघर्ष करून आपल्याला भक्कम पायावर उभे केले. केंद्र व राज्य सरकारला आपापली जबाबदारी घ्यायला लावली. केंद्र व राज्य शासनाचे प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात यश मिळवले.

९ जानेवारी १९८६ रोजी अंगणवाडी कर्मचारी सभेच्या वतीने अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा पहिला मोर्चा विधानसभेवर नेला. त्यामुळे या महिलांच्या प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष गेले. शासनाला मागण्यांची दखल घ्यावीच लागली. या मोर्च्यामुळे कर्मचाऱ्यांना दिवाळी व उन्हाळ्याची सुट्टी, किरकोळ रजा व इतर सणांच्या



सुट्ट्या मिळाल्या. तसेच ग्रामविकास मंत्रालयाने आय.सी.डी. १०८६८/सी.आर./९७३/४७ हा आदेश काढून अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत नियमावली तयार केली. त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना खूप मोठा आधार मिळाला.


गेल्या ३२ वर्षात या कर्मचाऱ्यांनी विविध प्रश्नांवर गल्ली ते दिल्लीपर्यंत आंदोलने केली. परिणामत: वेळोवेळी मानधनात वाढ झाली. सुरुवातीला ९० दिवसांची त्यानंतर १३५ दिवसांची बाळंतपणाची आणि सहा आठवड्यांची गर्भपाताची रजा मिळाली. सध्या सहा महिन्यांची बाळंतपणाची रजा मिळते. मदतनीसांना सेविकापदी बढती देण्याची मागणी मान्य झाली. एस्.एस्.सी. पास सेविकांना मुख्य सेविकापदी ५० टक्के आरक्षण मिळाले. निवृत्तीचे वय ६५ वर्षे झाले. योजनाबाह्य कामांची सक्ती रद्द झाली. कामाचे तास निश्चित झाले. कामाची शाश्वती, बोनस, पेन्शन, विमा इत्यादी योजनांचा लाभ मिळाला. अशा अनेक गोष्टी संघटित ताकदीच्या जोरावर मिळवल्या.

संघटनेच्या स्थापनेपासून आजतागायत या महिलांनी अथक संघर्ष केला. ठिकठिकाणी रचनात्मक काम उभे केले. प्रसंगी पोलिसांचा लाठीमार सहन केला. बोनसच्या मागणीसाठी रात्रभर मुंबईच्या रस्त्यावर झोपल्या. अंगणवाडी कर्मचारी महिलांना माणूस म्हणून सन्मानाने जगायला मिळावे, तसेच देशातील सर्व शोषितांना व उपेक्षितांना न्याय मिळावा म्हणून कामगार चळवळ क्षीण होत असतानाही असंघटित कर्मचाऱ्यांची ही चळवळ प्रखर संघर्ष करत आहे.

**अंगणवाडी कर्मचाऱ्यांमुळे सामाजिक परिवर्तन**

एकात्मिक बालविकास सेवा योजना सुरू होऊन पंचेचाळीस वर्षे झाली आहेत. या काळात मोठे परिवर्तन झाले आहे. केंद्र सरकारने या प्रकल्पाला वीस वर्षे झाली असताना, 'एकात्मिक बालविकास प्रकल्पाची वीस वर्षे' ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. त्यात या प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांच्या कामामुळे मुलांचे कुपोषण कमी झाले आहे. लसीकरणामुळे रोगांचे तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. गावागावांमध्ये शाळेत जाणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण वाढले आहे. गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. अंगणवाडीत गेलेल्या मुलांची ग्रहणक्षमता अंगणवाडीत न गेलेल्या मुलांपेक्षा कितीतरी अधिक असल्याचे स्पष्ट म्हटले आहे. शासनाच्या अन्य अहवालांमध्येही या महिलांनी केलेल्या कामाची नोंद घेतलेली आहे.

किशोरवयीन मुलींच्या प्रशिक्षणामुळे मासिक पाळी व महिलांच्या आरोग्याविषयी जागृती निर्माण झाली. स्त्री-पुरुष समतेचा विचार गावोगावी पोहचवला जात आहे. मेळघाट, अक्कलकुआ इ.सारख्या दुर्गम भागातील कुपोषण रोखण्यासाठी अंगणवाडी कर्मचारी शासन व सामाजिक संस्थांच्या मदतीने प्रयत्न करत आहे. बालमृत्यूची नेमकी आकडेवारी व कारणे शोधण्याचे काम या सेविकांनीच केले आहे.




अनेक अंगणवाडीच्या महिलांनी गावात दारुबंदीची चळवळ यशस्वी केली आहे. बऱ्याच मैत्रिणी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती झाल्या आहेत. भंडारा जिल्हापरिषदेच्या अध्यक्षा म्हणून पवनी येथील कृष्णाबाई भानारकर यांनी जबाबदारी पार पाडली आहे. या पदांवर काम करत असताना या भगिनींनी गावातील रस्ते, पाण्याचा प्रश्न, दारुबंदीविरुद्ध ठराव, हगणदारी मुक्ती अशी महत्त्वाची कामे केली आहेत. या कर्मचारी अत्यंत जबाबदारीने काम करत असताना केंद्र सरकारने २००२ मध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांना त्या शासनाच्या प्रतिनिधी आहेत म्हणून निवडणुकीस बंदी घातली. त्यावर अंगणवाडी कर्मचारी सभेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यात न्यायमूर्तींनी सदरचा आदेश रद्द केला. परंतु केंद्र सरकारने पुन्हा आदेश काढून या कर्मचाऱ्यांना निवडणूक लढविण्यास बंदी घातली आहे. वास्तविक या सरकारी कर्मचारी नाहीत. मानधनावर काम करतात. एकीकडे सरकार या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून मान्यता देण्यास तयार नाही. दुसरीकडे मात्र त्यांच्या लोकशाही हक्कावर गदा आणत आहे.

रचनात्मक कार्यामध्येही अंगणवाडी कर्मचारी आघाडीवर आहेत. संगमनेर, पंढरपूर, सिंधुदुर्ग, कराड, सांगली, साक्री, नागपूर अशा अनेक ठिकाणी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था उभ्या राहिल्या आहेत. या संस्थांनी अल्पमानधन घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांची पत वाढवली. पतसंस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांना आपला व आपल्या कुटुंबाचा विकास करता आला. मुलामुलींना शिकवता आले.

१९९० नंतर देशात खाजगीकरण व जागतिकीकरणाचे खुले धोरण अस्तित्वात आले. देशातील गरीब माणूस, कष्टकरी, शेतकरी, कामगारांचा या धोरणामुळे बळी गेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. तसेच बेरोजगारांची संख्याही वाढली. सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या अनेक उद्योगांमध्ये खाजगीकरण व कंत्राटीकरण शिरले. शासनाने अनेकवेळा अंगणवाड्यांच्या खाजगीकरणाचा प्रयत्न केला परंतु देशभरातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्या विरुद्ध संघर्ष केला. त्यामुळे सरकारला आपला निर्णय मागे घ्यावा लागला.

अंगणवाडीत काम करताना या महिलांचे व्यक्तिगत जीवनही बदलले. त्यांचे राहणीमान बदलले. गावात त्यांना सन्मान मिळायला लागला. त्यामुळे घरातही सन्मान मिळू लागला. महिला बालकल्याण खात्याच्या कामामुळे स्त्री प्रश्नांविषयी सजगता वाढली. मोर्चे, आंदोलनांमुळे घरा-गावाबाहेरचे जग दिसले. अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा मिळाली.

सध्या महाराष्ट्र सरकारने बचत गटांचे ८०० कोटी रुपये थकविले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ७३ लाख बालकांना दिला जाणारा पोषण आहार बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**समान कामाला समान दाम नाही**

नुकत्याच झालेल्या संपानंतर सेविकेला ६५०० रुपये मिनी अंगणवाडी सेविकेला ४२५० व मदतनीसला ३५०० रुपये मानधन देण्याचे महाराष्ट्र सरकारने कबूल केले. वास्तविक अन्य काही राज्यांच्या तुलनेत हे मानधन फारच कमी आहे. कर्नाटक, तामिळनाडू, दिल्ली, हरियाणा या राज्यांमध्ये ८ ते १० हजार दरम्यान मानधन मिळते. तर पाँडेचेरीला २२,००० रुपये मानधन मिळते. वास्तविक देशातील सगळ्याच अंगणवाडी सेविकांना किमान १५,००० रुपये व मदतनीसांना १०,००० रुपये मिळायला हवेत. सगळ्यांचे काम सारखेच आहे तर मानधनही सारखेच हवे. 'समान कामाला समान दाम' या धोरणालाच महिला-बालकल्याण खात्याने हरताळ फासला आहे.

**शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा आणि वेतनश्रेणी**

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मुख्य मागणी वेतनश्रेणीची आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा म्हणून दिल्लीला केंद्र सरकारच्या विरोधात अनेक मोर्चे गेल्या ३२ वर्षांत निघाले. परंतु कोणत्याही सरकारने त्याबाबत अनुकूलता दाखवली नाही. दिवसेंदिवस सरकार समाज कल्याणाच्या योजनांची जबाबदारी झटकत आहे. त्यामुळे वेतनश्रेणीचे स्वप्न पुरे होणे कठीण झाले आहे. एकीकडे शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग दिला जात आहे. त्यांचे पगार अव्वाच्या सव्वा वाढत आहेत. खासदार, आमदारांचे वेतन वाढविले जात आहे परंतु अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मात्र किमान वेतन देण्याचीही शासनाची तयारी नाही.

महाराष्ट्रात सध्या सहा प्रमुख संघटनांच्या कृतीसमितीच्या वतीने संघर्ष सुरू आहे. प्रखर एकजूट हे या संघर्षाचे वैशिष्ट्य आहे. 'हम होंगे कामयाब'चा निर्धार करत कर्मचारी लढत आहेत.

(लेखिका परित्यक्ता स्त्रिया आणि अंगणवाडी महिलांच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण काम करीत आहेत.)

**– ॲड. निशा शिवूरकर**
भ्रमणध्वनी : ९४२३७४९७१५
advnishashiurkar@gmail.com



# पुनर्वसन होताना...

/ वृषाली मगदूम

> **माझ्या जाणिवांच्या कक्षांना हादरे बसायचे. या मुलींना यातून बाहेर काढणे, त्यांचे पुनर्वसन करणे. त्यांना मार्गाला लावणे हे सारे ज्या तीव्रपणे मला वाटते ती तीव्रता मुलीच्या पालकांच्यात का नाही?**

**मे** महिन्याच्या रणरणत्या उन्हात मी कपाळावरून ओघळणारा घाम पुसत ऑफिसमध्ये शिरले. तर मालनचा पत्ता नव्हता. मी खुर्चीत बसले तर धापा टाकत मालन ऑफिसमध्ये शिरली.

''बोल आता. काय झाले'' – मी.

''समोर मैदान आहे ना तिथे, काल संध्याकाळी प्रतिमावर बलात्कार झाला.''

''नीट सांग सार'' – मी.

''चार-पाच पोरं होती.''

''तू ओळखेतस त्यांना?''

''हो आपल्या वस्तीतलीच आहेत.''

''मग पोलीस स्टेशनला का नाही गेलीस?''

''आधी तुम्हाला विचारावे म्हटले.'' – ती.

''आज करशील तक्रार? चल मी येते बरोबर. प्रतिमाला बरोबर न्यावे लागेल.''

''नाही. मी जाईन. पोलीस संध्याकाळी भेटतात' मालनला मी घटनेचे गांभीर्य सांगितले. तक्रार करणेही किती आवश्यक आहे हेही सांगितले.''

''मला तक्रार करायचीय आहे. लई दादागिरी वाढलीय त्याची'' – मालन.

मालनने तक्रार केली की नाही काहीच कळले नाही. वर्तकनगरच्या वस्तीत निरोप देऊन मी तिला बोलावून घेतले.

''काय ग काय झाले तक्रारीचे? केली का तक्रार. त्या दिवशीच पोलिसांनी बोलावून घेतले त्यांना. दम देऊन सोडून दिले.'' – ती.

''शक्यच नाही. काय तक्रार केलीस?'' – मी.

''ती पोरं प्रतिमाला त्रास देतात, भांडतात.'' – मालन.

''अगं बलात्काराची तक्रार केली नाहीस?''

''नाही ताई, पोरीची जात. पोरगी पण तयार नाही अशी तक्रार करायला.'' मी माझ्या वकील मैत्रिणीला आपण अशी तक्रार करू शकतो का असे विचारले तर ती म्हणाली, ''मुलीनं तक्रार करणं आवश्यक आहे. आपण काही नाही करू शकत.''

मी पोलिसांशी बोलले तर वेगळीच माहिती कळली. ते म्हणाले, ''मॅडम ती मुलं म्हणत होती. ही मुलगीच आमच्या मागे मागे येते. नको म्हटलं तर ऐकत नाही. तिलाच सांगा येऊ नको म्हणून'' मालनशी बोलले तर ती म्हणाली. ''ताई संध्याकाळी पाच वाजले की उठते व बाहेर पडते, ती रात्री अकरालाच परत येते.''

''तू का सोडतेस?'' – मी.

''दंगा करते. ताई, भांडी फेकते. दार आपटते. शिव्या देते व शेवटी मला ढकलून पळून जाते.'' – मालन.

दोन दिवसांनी पाच वाजता मी वर्तकनगरला गेले. मालनचे घर गाठले. अतिशय तकलादू ढकलले तरी मोडेल असे दार. मी दारावर थाप मारली. आत शिरले. मालन पाठमोरी काम करीत होती. प्रतिमाला बोलावून आणते म्हणून ती गेली. झोपड्यातील तिचा तो संसार मी न्याहाळत राहिले. पंधरा-वीस मिनिटांनी जोरजोरात आवाज येऊ लागले. मी बाहेर आले तर मालन प्रतिमाला ओढत आणत होती. आजूबाजूला लोक जमले होते. ''ताई बघा कसे करतेय?'' असे मालन म्हणतेय तोपर्यंत प्रतिमानं जवळ असलेल्या मुलाच्या हातातील मोबाईल घेतला व मुलाला हिसका देऊन पळून गेली. तो मुलगाही तिच्या मागे पळत गेला. त्या दिवशी मालनने ''प्रतिमा दारू पिते व रात्री अक्षरश: झोकांड्या खात घरी परतते'' असे सांगितले. मंगळवारी वस्तीत मोबाईल व्हॅन येते. त्यातून नेऊन तिला ॲडमिट करू असे ठरले, पण मंगळवारी सकाळपासून प्रतिमा गायब झाली. त्या आठवड्यातच मी परत वर्तकनगरला गेले. बायकांशी बोलत होते. मालन मधेच उठून माझ्याजवळ येऊन म्हणाली, ''घेऊन येऊ का प्रतिमाला?''

''ये', मी म्हटले अन् खरेच प्रतिमा आली.

मी बायकांची मिटिंग संपवली. प्रतिमाला समोर बसवून घेतले. जवळजवळ एक तास मी तिच्याशी बोलत होते. माझ्या कोठल्याही प्रश्नाला तिने उत्तर दिले नाही. हातात हात घेतला. दिलासा दिला.



भावनिक बोलले, पण तिने माझ्या एकाही प्रश्नाला उत्तर दिले नाही. ती फक्त हसायची. ठेंगणी, जाडसर, गोरी, सातवीतून शाळा सोडलेली प्रतिमा खाली मान घालून बसली होती. मी तिची हनुवटी उचलली. तिचे फुगलेले गाल सुजल्यासारखे वाटत होते. मी सरळच तिच्या दारू पिण्याविषयी विचारले. कोठे जाते म्हटले पण तिने साऱ्याला नकार दिला. फक्त नकारार्थी मान हलवायची. नंतरही जवळजवळ महिनाभर तिला दर मंगळवारी डी.वाय. पाटील हॉस्पिटलला नेण्याचा आम्ही बेत करीत होतो व प्रतिमा हुलकावणी देत होती. सहा महिने तरी झाले असतील. एके दिवशी सकाळी मालननं, 'प्रतिमा रॉकेल प्यायली व तिला महापालिका दवाखान्यात भरती केलेय', असं सांगितलं. मी म्हटलं, ''राहू दे तिला तिथेच. महिनाभर घरी नको नेऊ. मी सांगते मेट्रनना. तिथून व्यसनमुक्ती केंद्रात पाठवू.'' मी हॉस्पिटलला जाऊन प्रतिमा व इतरांना भेटले. साऱ्या गोष्टी ठरल्या. मी 'मुक्तांगण'साठी पत्रव्यवहार तयार करू लागले, पण मालनचा सारखा फोन येऊ लागला. ''ताई घरी जाऊया. सारखी त्रास देतेय.'' ''तू तिच्या समोर जाऊच नकोस. बाहेरच बस. करू दे तिला काय करायचे ते.'' मी सांगत राहिले. पण मालनने डिस्चार्ज घेतला व घरी जाताना मला फोन केला. मी काहीशी रागावलेच. तर म्हणाली, ''ताई अजिबात ऐकत नव्हती. परत दारू घेणार नाही अशी शपथ पण घेतलीय.'' मी गप्प बसले. ''ताई आता मी लक्ष ठेवते. जाऊ देणार नाही तिला. बघाच तुम्ही.''

बरेच दिवस मालनचा अजिबात संपर्कच नव्हता. भेटली की प्रतिमाला व्यसनमुक्ती केंद्रात ठेवायचे म्हणायची. एके दिवशी प्रतिमाला ऑफिसला घेऊन आली. मी काही विचारले, की प्रतिमा होकारार्थी मान हलवायची. ''अग, तुझा आवाज मी आजपर्यंत ऐकला नाहीय. तुला बोलताच येत नाही का?''

प्रतिमा हसली व म्हणाली, ''मला खूप इच्छा होते.''

''कशाची?'' मी.

''प्यायची.'' प्रतिमा.

''मग काय करायचे?'' मी.

''सोडायची आहे मला.'' प्रतिमा म्हणाली.

मग मी तिला 'मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रा'ची माहिती दिली. पत्र तयार केले. केंद्राबरोबर संपर्क केला. गुरुवारी मालनला जायला सांगितले पण पैसे नाहीत म्हणत मालन गेलीच नाही. दोन-तीन महिने तिने असेच काढले. एक दिवस दुपारी मालनची आई आली. तिला खूप रागावले. शेवटी पैशाची जोडणी करून मालन तिला घेऊन गेली. मालनने दारिद्र्यरेषेखालील पेपर आणून दिल्यास तिचे उपचार मोफत होतील असे 'मुक्तांगण'नं सांगितले.

स्त्रीमुक्ती संघटनेनं २००० साली कचरावेचक महिलांचे संघटन केले. नवी मुंबई महापालिकेनं ओळखपत्रे दिली. तेव्हा वर्तकनगरमधील पंचवीस-तीस बायका ऑफिसला आल्या व आमचेही गट करा म्हणू लागल्या. तशा या साऱ्या महिला वयस्कर होत्या व तुर्भे डपिंगवर कचरा गोळा करायच्या. वर्तकनगर झोपडपट्टी उंचावर. टेकडावर वसली होती. लोकांनी जागा मिळेल तशा अस्ताव्यस्त झोपड्या उभारल्या होत्या. नगरसेवकाच्या कृपेनं लाईट, पाणी, टॅक्सा पावती मिळाली होती. संघटनेनं रेशनकार्ड मिळवून दिले होते. जवळच आरोग्यकेंद्र व शाळाही होती. बुद्धविहारामध्ये मुलांसाठी अभ्यासवर्ग, महिलांसाठी, शिवणवर्ग सुरू केला होता.

प्रतिमाला मुक्तांगणमध्ये ॲडमिट केल्यानंतर कमल म्हणाली, ''प्रतिमासारख्या अजून चार-पाच मुली अशाच फिरतात. त्यांचे काहीतरी करा.'' एके दिवशी दुपारी सज्जन बाई ऑफिसात आली व 'माझ्या नातीला हॉस्टेलवर ठेवा', म्हणू लागली. सुवर्णा आठवीत होती. हुशार होती. अचानक शाळा सोडून घरी बसली होती. संध्याकाळी तीही बाहेर जाऊ लागली होती. नगरकडच्या एका हॉस्टेलमध्ये सुवर्णाला ठेवले, पण पंधरा दिवसातच हॉस्टेलवरून सारखे फोन येऊ लागले. 'तिच्या पोटात दुखतेय. तब्येत बरी

नाहीय.' मग आजी सुवर्णाला होऊन परत आली. सज्जन बाईला अनेकवार सांगूनही सुवर्णा काही भेटत नव्हती. त्यादिवशी अंधश्रद्धेवर वंदना शिंदेंचे लेक्चर होते. सज्जन बाई सुवर्णाला घेऊन आली. उंच शेलाटी सुवर्णा समोर बसली. सुवर्णाला शिकायचे आहे. दाखला काढल्यामुळे शाळेत जाता येत नाही असे म्हणाली. दारू पित नसल्याचे निक्षून सांगितले. रात्री कोठे जाते विचारल्यानंतर मैत्रिणीकडे जाते म्हणाली. सुवर्णा डोळ्याला डोळे भिडवून इतकी ठामपणे सगळ्या गोष्टी नाकारत होती की मीही चक्रावून गेले.

प्रतिमा तीन महिने मुक्तांगणमध्ये राहून आली. तेथील समुपदेशकांशी बोलले तर ''प्रतिमा साऱ्याशी भांडते. सांगितलेले ऐकत नाही'' असे त्यांनी सांगितले. मालनला ''प्रतिमाला वर्तकनगरला आणू नको, गावी कोणी असेल तर ठेव'' असे सांगितले, पण प्रतिमा वर्तकनगरमध्ये आली. आठेक दिवस घरी बसली, पण प्रतिमा आल्याचे कळताच मुले तिच्या झोपडीभोवती घिरट्या घालू लागली. सुरुवातीला नाही म्हणत एके दिवशी ती त्यांच्याबरोबर गेली व परत व्यसनाचे चक्र सुरू झाले. गटातील सर्वच बायका तंबाखू खात होत्या. नवरे व मुले दारू प्यायची. 'कॅन्सर निदान कॅम्प' लावला असता पाच कॅन्सरचे पेशंट वर्तकनगरमध्ये निघाले. आसराबाईचा कॅन्सर शेवटच्या स्टेजला होता. ऑपरेशनची स्टेज नव्हती. पहिली केमोथेरपी दिल्यानंतर हॉस्पिटलमध्येच तिचा मृत्यू झाला.

अजित मगदूमने निवृत्तीनंतर 'अन्वय व्यसनमुक्ती केंद्र' काढले. वाशी महापालिका हॉस्पिटल, डी. वाय. पाटील हॉस्पिटल, कळंबोली या तीन ठिकाणी केंद्र चालू होते. बावीस लोकांची टीम होती. वर्तकनगरलाही केंद्र काढण्याची गरज वाटू लागली. शेवटी कमलच्या घरातच आम्ही केंद्र सुरू केले. मंगळवारी संध्याकाळी आम्ही दोघेही जात होतो. अजितचं व्यसनमुक्तीवर काम चालायचे तर गटातील महिला इतर प्रश्न घेऊन यायच्या. कचरा मिळत नाही. भांडणं होतात वगैरे. ''आमच्याबरोबर कंपनीवाल्यांशी बोलायला चला'', म्हणायच्या. त्या दिवशी आमच्या गटातील गायकवाडबाईच्या नवऱ्यानं अजितला बोलावलं. गलांडे कंपनीत तिचा नवरा पूर्वी सेक्युरिटी होता. कंपनी बंद पडून दहाएक वर्षं झाली होती. तिचे आता एका उद्ध्वस्त, भकास, फक्त भिंती असलेल्या इमारतीत रूपांतर झाले होते. गायकवाड त्या कंपनीच्या आवारातच झोपडं टाकून राहात होता. तो म्हणाला, ''रात्री दहा वाजले की पोरंपोरी समोरच्या भिंतीवरून उड्या मारून येतात. इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील टेरेसवर जाऊन दंगा चालू असतो. गाणी, नाच, दारू सारा धिंगाणा चालू असतो. सकाळी सहा वाजता भिंतीवरून उड्या मारून निघून जातात.'' 'पोलिसांना सांगाल का?' तर 'हो' म्हणाला.

कौशल्या ''दारूची दुकाने बंद करा'', म्हणू लागली. ती दुकाने दाखवायला तयार होती. महिलांचा एक अर्ज व अन्वय व्यसनमुक्ती केंद्राचे पत्र तयार करून काही महिलांना घेऊन आम्ही गुन्हेअन्वेषण शाखेत गेलो. त्यांनी वर्तकनगर पोलिस स्टेशनला फोन करून सांगितले. त्यादिवशी वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी चार पोलिस सोबत दिले. बाकीच्या बायकांना परत पाठवले. कौशल्या व व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक अजित मगदूम पोलिसांच्या बरोबर गेले. कौशल्यानं लांबूनच दुकानं दाखवली. पोलिसांनी चार लोकांना ताब्यात घेतले. त्यात दोन महिला होत्या. पाण्याच्या निळ्या ड्रममध्ये ठेवलेला मोठा दारूचा साठा सापडला. दोन दिवसांनी कौशल्या म्हणाली, ''ताई परत दारूची दुकाने सुरू झाली.'' बयाबाई मला बघितले की लांबूनच ओरडून सांगते, ''बारा हजार रुपये देऊन बघा मी सुटून आले.'' परत एक पत्र घेऊन डी.सी.पी.ना भेटलो. परत कारवाई, परत सुटका. स्थानिक गावठी दारू दुकानं बंद होत नाहीत, हे लक्षात आले. आज झोपडपट्टीत प्रत्येक घरात व्यसनी आहेत. तरुण पिढी बरबाद होऊ लागली आहे. यांचे पुढे काय? मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते आहे. व्यसनाविषयी उपचार घ्यायचे असतात, हे या लोकांना पटतच नाही. केंद्रावर मारूनमुटकून व्यसनींना बोलावयाचे. त्यांना त्यांचे गांभीर्यच नसायचे. गुटका, मशेरी, तंबाखू, दारू प्रत्येक घरात होती. कमलची दोन मुलेही व्यसनी होती. नवरा दारू प्यायचा. अजितला कमलच्या घरी केंद्र नको वाटायचे. महापालिका हॉस्पिटलमध्ये प्रयत्न चालू होते. वर्तकनगरमधील दारिद्र्य, बकालपणा, व्यसनाधीनता पाहून परत जाताना माझ्या मनात खोलवर एक खिन्नता झिरपायची.

मालन दर मंगळवारी व्यसनमुक्ती केंद्रात यायची व 'प्रतिमाचं काहीतरी करा.' म्हणायची. तुरुंगात टाका पण वस्तीत नको म्हणायची. सज्जन बाई पण यायची. एके दिवशी सुवर्णा व प्रतिमा दोघी एकत्र आल्या. सुवर्णा जरी आजीकडे रहात असली तरी तिचे आईवडिलही याच वस्तीत राहतात हे कळले. त्यांनाही मंगळवारी बोलावले.

सुवर्णा मंगळवारी बोलावल्याशिवाय यायची नाही. निरोप पाठवला तरी काहीवेळा यायचीच नाही. सुवर्णा चटपटीत, स्मार्ट होती. नजर एका जागी ठरायची नाही. देहबोली व ड्रेस पाहताच मध्यमवर्गीय सुखवस्तू घरातील आधुनिक मुलगी वाटायची. सुवर्णा तिच्या आईला, मनीषाला त्या दिवशी घेऊन आली. कित्येक दिवसात पाणी न लागलेली मातकट साडी काळवंडलेला निस्तेज रडवेला चेहरा. तिचा तो घाबरट व बावळा चेहरा पाहताच ती आईला कशी हातोहात बनवत असेल हे लक्षात आले. मनीषा आमचे संभाषण ऐकत गप्प बसून होती. सुवर्णा सर्व गोष्टी नाकारून ती कशी चांगली आहे सांगत होती.

''काय ग मनीषा काय म्हणते सुवर्णा?''

''ताई, सुवर्णा खोटे बोलतेय. चार चार दिवस घरातून निघून-पण जाते. कोठे जाते कोणास ठाऊक. कोणाचे ऐकत नाही. रोज तर बारापर्यंत बाहेरच असते, पण अशीच मध्येही गायब होते.'

त्यादिवशी मनीषा व मालनची व्यसनमुक्ती केंद्रात मुलींना ठेवायला तयार असल्याची पत्रं तयार करून दोघींचे अंगठे घेतले. बाललैंगिक शोषणाच्या एका परिषदेला मी गेले होते. तिथे मी या दोघींची केस मांडली असता दोघीही अल्पवयीन असल्यानं



मित्राबरोबर पाठवले म्हणाली. कमलला मी विचारले, ''प्रतिमाच्या पैशावर घर चालते का?'' कमल नाही म्हणाली. पण ताई नवरा तुरुंगात गेल्यावर पोलिस घरी यायचे. रहायचे. पोरीवर त्याचाच विपरीत परिणाम झालाय. 'नवरा असेल अशी आशा असेल तिला.'

''हो पण आता कोणी येत नाही'' – कमल.

सुवर्णा व प्रतिमाच्या पुनर्वसनाचा मुद्दा सारखा डोक्यात असायचा. एका कार्यक्रमात एका संस्थेचे प्रमुख आम्ही मुलीसाठी केंद्र सुरू केले आहे असे म्हणाले. भाषण संपताच मी त्यांना गाठले. दोघींची केस सांगितली. 'पाठवा, मी बघतो' म्हणाले. मी नंबर मागितला. त्यांनी त्यांचे कार्ड दिले. आठ दिवस मी सदर गृहस्थांना फोन लावत होते. ते फोनच उचलेनात. एकदा उचलला व गडबडीत पुण्याचा लँडलाईन नंबर दिला. तोही मी अनेक दिवस लावत होते. शेवटी लागला. मी केस सांगितली. 'मुली अल्पवयीन आहेत' म्हणताच 'जमणार नाही' म्हणाले. 'मी बालकल्याण समितीची ऑर्डर आणते', म्हटले तर, ''या मुली प्रॉब्लेम करतात. नाही ठेवून घेऊ शकत'', म्हणाले. यातच दोनेक महिने गेले व काम तर झालेच नाही. मी अनेकांना व्यसनमुक्ती केंद्राविषयी विचारायचे. या निमित्ताने महाराष्ट्रातील अनेक केंद्र माहीत झाली, पण महिलांसाठी 'मुक्तांगण' हे एकच केंद्र असल्याचे लक्षात आले.

सुवर्णाला व मनीषाला मी बोलवायला पाठवले तर गेले पंधरा दिवस सारेच गावाला गेल्याचे कळले, पण नंतर मनीषा स्वत:हून सुवर्णाला घेऊन आली म्हणून मला बरे वाटले. गावी साखरपुडा केला. ''लग्नाची तारीख ठरवली, पण ही नाही म्हणाली म्हणून लग्न झाले नाही.'' असे मनीषा म्हणाली, ''पण चांगलेच झाले. लाखभर लग्नाचा खर्च झाला असता व आठ दिवसातच परत आली असती. तुम्हाला खूप महाग पडले असते.'' मी म्हटले, ''ती अल्पवयीन असल्यानं कायद्यानं हा गुन्हा आहे.'' वगैरे मी बरेच बोलले. त्या दोघी ऐकत होत्या. सुवर्णा व्यसनमुक्ती केंद्रात जायला तयार झाली. पुढची दिशा ठरवून आम्ही घरी आलो. मंगळवारी आम्ही केंद्रावर गेलो तर सज्जन बाई वाट बघत बसल्या होत्या. शनिवारी सुवर्णा घरातून पळून गेल्याचे सज्जन बाईने सांगितले. व्यसनमुक्ती केंद्रात गर्दी होती. म्हणून मी, मनीषा व सज्जन बाईला घेऊन कमलच्या माडीवर गेले.

मनीषाच्या चेहऱ्यावर तणाव होता. ती काहीच बोलत नव्हती. सुवर्णाचे वडीलही आले. त्यांना मी पोलिसात तक्रार करायला सांगितली. 'मनीषाला टेन्शन घेऊ नको', म्हणून सांगितले.

मनीषा व तिच्या नवऱ्याने पोलिसात तक्रार केली. गुरुवारी

बालकल्याण समितीची परवानगी घ्यावी लागेल असा मुद्दा पुढे आला. मालनला एकदा मी प्रतिमाला पैसे देऊ नको म्हटले तेव्हा ती म्हणाली, ''ताई मी पैसे देत नाहीच. उलट हीच मला भांडताना शिव्या घालते. तुझ्या पैशाची पिते का म्हणते. अंगावर पाच-दहा रुपयेही फेकते.''

''कोण देते पैसे?''

''एक असेल तर नाव घेईन. हिला अक्कल नाही. पाचशेची नोट फेकतात. भारी दारू पाजतात व हिला भोगतात. व्यसनमुक्ती केंद्राचे उपचार घेत होती. तेव्हा ताई एक आठवडा बाहेर गेली नव्हती. तर या पोरांनी झोपडीबाहेर येऊन शिट्ट्या वाजवणे, हाका मारणे याचा सपाटा लावला व ती परत जायला लागली. गोळ्या द्यायला लागले की झोप येते म्हणून फेकून देते.'' मालन हतबल होऊन सांगत होती. मालनचा नवरा तुरुंगात होता. किरकोळ भांडणातून त्याच्या हातून एका माणसाचा खून झाला होता. त्याला मरेपर्यंत जन्मठेप झाली होती. त्यांची केस दिल्ली कोर्टात चालू होती. त्याबद्दलही मालन मला वकिलाशी बोलायला लावायची. नवऱ्याबरोबरचा एक मित्र सुटून आल्यानं तिला आशा वाटत होती. आतापर्यंत वकिलांना साठसत्तर हजार रुपये दिले होते. कडेवर दोन वर्षांची चुणचुणीत पोर होऊन मालन आली. 'सोळा वर्षे नवरा तुरुंगात आहे', म्हणाली. मी कडेवरच्या पोराकडे पाहू लागले तर 'मागील वर्षी पॅरोलवर सुटून आला होता', म्हणाली. 'तू कामावर जातेस ना?' विचारले तर 'ह्या पोरीचा नाद व नवऱ्याची केस यात काम कुठलं टिकतंय?' म्हणाली. वकिलाला वीस हजार त्याच्या खात्यात भरायचे होते. मग मी तिथे बँकेत खाते उघडून प्रोसिजर करून दिली. 'कोठून आणलेस पैसे?' म्हटले तर नवऱ्यानं त्याच्या

सुवर्णा सापडली. पोलिसांनी जबाब घेऊन तिला घरी पोचवले. मी कमलला फोन केल्यानंतर तिच्याकडून मला हे कळले. शुक्रवारी सज्जन बाईला व मालनला घेऊन भिवंडीला मी व अजित गेलो. रस्त्यात सजन्न बाई सारखी 'घरी फोन लावा' म्हणत होती. मी फोन लावला तर सुवर्णाची आई म्हणाली, आम्ही पोलिस स्टेशनला आहोत. पोलिस सुवर्णाच्या वडिलांना खूप मारताहेत. मी पोलिसांना फोन लावला. सुवर्णा सापडल्याबद्दल आभार मानले. पोलिस इन्स्पेक्टर बाहेर होते. 'सुवर्णाच्या वडिलांना का मारताहेत?' असे विचारले तर ते म्हणाले, ''मॅडम हे लोक खोटं बोलतात. या लोकांनी या मुलीचे गुजरातमध्ये लग्न लावून दिले. पैसे घेऊन ही मुलगी पळून आलीय पण वडील कबूलच करत नाहीत.'' मी सज्जन बाईला, 'लग्न केले का?' हे परत-परत विचारत राहिले तर ती 'नाही' म्हणत राहिली.

कमलचा फोन आला. 'सुवर्णाच्या आईशी बोला' म्हणाली. सुवर्णाची आई, नवऱ्याला आत टाकले आहे. सुवर्णा जिथे सापडली त्या लोकांनाही बोलावून घेतल्याचे सांगत होती.

''पण का?'' - मी.

''तुम्ही लग्न केले व सांगत नाही म्हणतात'' - ती.

''पण तुम्ही लग्न केलेत का?'' - मी.

''होय.'' - तिचे उत्तर.

''काय?'' मी ओरडलेच. काही क्षण मला काही सुचेनाच. मी फोन बंद केला. आता काय? ही चौकशी चालू असेल तर बालकल्याण समितीची ऑर्डर घेणे योग्य आहे का? अध्यक्षांना हे सांगणे आवश्यक नाही का? माझी व अजितची चर्चा झाली. आपण काही काळ थांबू असे ठरले. अध्यक्ष मॅडम 'ऑर्डर काढायला नको', म्हणाल्या. आम्ही परतलो. आपण समुपदेशनात कमी पडलो अशी खंत मला वाटू लागली. सुवर्णाची आई खोटं बोलत असल्यानं घाबरली होती.

असेच काही महिने गेले. मंगळवारी मालन भेटायला यायची. मुलीलाही होऊन यायची. प्रतिमा 'मी दारू पित नाही' म्हणायची. पण उपचारही नीट घेत नव्हती. मालन तिला केंद्रात ठेवा म्हणायची त्यामुळे परत भिवंडीला जायचा विचार मनात उचल खायचा. सज्जन बाईही ऑफिसला येऊन 'सुवर्णा संध्याकाळी बाहेर जाते. दोन दोन दिवस गायब असते. काहीतरी करा.' म्हणायची. मी व अजित परत वर्तकनगर पोलिस स्टेशनला गेलो. मुलीच्या आईचे संमतीपत्र, अन्वय व्यसनमुक्ती केंद्राचे पत्र, बालकल्याण समितीची पत्रावरील पोच, सारे सादर केले. पोलिस इन्स्पेक्टर वसावेंनी लगेच मुलींना बोलावून घेतले. त्यांचा जबाब तयार केला. बालकल्याण समितीनं काही प्रश्न विचारले. 'मुक्तांगण' पुण्यास असल्यानं ऑर्डर काढता येईल का? मुलीची मेडिकल होणे आवश्यक आहे. मग त्यांनी पोलिसांनी मुलीची मेडिकल करून रिपोर्ट सादर करावे व 'अन्वय व्यसनमुक्ती केंद्रा'ने 'मुक्तांगण' या मुलींना ठेवून घ्यायला तयार आहे व महाराष्ट्रात मुलीसाठी हे एकच व्यसनमुक्ती केंद्र असल्याचे लिहून आणायला सांगितले.

नवी मुंबई महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये मी या मुलींना घेऊन गेले. त्यांची मेडिकल झाली. पोलिसांच्या ताब्यात हॉस्पिटलने रिपोर्ट दिले. हे सारे घेऊन सुषमा बालकल्याण समितीकडे गेली. आमची सुरुवातीची पत्रे स्त्रीमुक्ती संघटनेच्या नावावर होती. मॅडमने सांगितल्यानुसार आता ती व्यसनमुक्ती केंद्राच्या नावावर केली होती. त्यामुळे त्यांचा गोंधळ होत होता. दिवसभर फोनाफोनी चालू होती. ॲड. मनीषा तुळपुळेंनी चुकीचे काही होणार नाही याची ग्वाही दिली. मीही खूप वेळा बोलले. शेवटी ऑर्डर निघाली. पोलिसांची पत्रे, मेडिकल रिपोर्ट हे सारेच समितीला झेरॉक्स प्रत न ठेवताच सादर केले. अन्वय व्यसनमुक्ती केंद्राच्या लेटरहेडवरच ऑर्डर काढली. आमच्याकडे इतर पत्रं काहीच राहिले नाही. मालनला मी 'सर्व पत्रं झेरॉक्स करून सादर कर.' असे सांगूनही 'का केले नाहीस?' असे विचारता ती म्हणाली, ''बंद पाकिटात होते त्यामुळे उघडायचे नाही असे मला वाटले.'' हॉस्पिटलला मेडिकल रिपोर्टची कॉपी मिळेल का असे विचारता, 'नाही' असे उत्तर मिळाले. वसावे मॅडमनीही सर्वच पत्रं पाठवून दिली होती. शेवटी वसावे मॅडमनीच मुक्तांगणला परत एक पत्र द्यावे असे ठरले व त्यांनी सविस्तर असे पत्र दिले.

बालकल्याण समितीच्या ऑर्डरला कोर्टाच्या ऑर्डरइतके महत्त्व असते. तिचा अवलंबही करणे बंधनकारक असते. मुलींना दुसऱ्या दिवशी लगेच मुक्तांगणला पाठवायचे ठरले, पण भिवंडीहून येताना सुवर्णानं दोन महिने तिची पाळी न आल्याचे सांगून नवा धक्का दिला. टेस्ट केली तर ती पॉझिटिव्ह आली. परत हॉस्पिटलला पाठविले. हॉस्पिटलतर्फेच पोलिसांनी सुवर्णाचा जबाब घेतला तर तिने मला एमटीपी करायची नाही व व मला त्या मुलाशी लग्न करायचे आहे असे सांगितले. हॉस्पिटलने मग तिला घरी पाठवले. मग प्रतिमाला एकटीलाच मुक्तांगणला पाठवायचे ठरले व नवीनच आव्हान पुढे उभे राहिले. 'मलाही लग्न करायचे आहे. माझाही मित्र लग्नाला तयार आहे', असे प्रतिमा म्हणू लागली. त्या मंगळवारी तिला मी म्हटलं, ''बोलव त्या मुलाला आपण बोलू त्याच्याशी. मीच तुझं लग्न लावून देते.'' तिने चुकीच्या भ्रमात मुक्तांगणला जाऊ नये असे मला वाटत होते. लग्नाचे डोक्यात घेऊन गेली की ती उपचार घेणार नाही. 'तो मुलगा लग्नाला तयार आहे' असेच ती सारखे म्हणत राहिली. मालनला, ''तू भेटलीस का त्या मुलाला?'' असे विचारले तर ती म्हणाली, ''पूर्वीपण भेटलेय. कालपण भेटले. हिच्या समोरच मला म्हणाला, ''असल्या फालतू मुलीशी मी लग्न करेन होय? मी काय एकटाच आहे होय. अनेकांच्या बरोबर झोपलीय.''

मालनची व त्याची खूप हातापायी झाली होती. प्रतिमाला खूप समजावले पण ती हेका सोडत नव्हती. मालन चिडत होती. ''ताई हिला भोगायचे असले की बोलावतो व लग्न करतो म्हणून उपभोग घेतो व फेकून देतो. मी मालनला 'आज संध्याकाळी परत एकदा त्याच्या घरी जाऊन बोल', म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता मालनचा, 'आम्ही निघतोय.' असा फोन आला. मी तिला ''मुलाला विचारायला रात्री गेली होतीस का?'' विचारले तर म्हणाली, ''नाही ताई. हीच रात्री गायब झाली

ते सकाळीच आली. मग तुम्ही सांगितल्याप्रमाणे पोलिस स्टेशनला जाऊन मॅडमकडून पत्र घेतले व निघालोय आता.''

सुवर्णाची एमटीपी झाली. मनीषा सारखे फोन करून म्हणायची, ''ताई इथूनच मुक्तांगणला नेतो. घरी नेले की ती थांबायची नाही.'' मी हॉस्पिटलला, ''सोमवारी सकाळी डिस्चार्ज द्या'' असे सांगितले. तिथून पोलिस स्टेशन व पुणे असे ठरले, पण निरोपात काहीतरी घोळ झाला. शुक्रवारीच तिला डिस्चार्ज मिळाला. शनिवार-रविवार सोडून पाठवा असे मुक्तांगणमध्ये सांगितले होते. ''दोन दिवस तिला सांभाळा.'' असे मी तिच्या आईला सांगितले. पण सुवर्णा पळून गेल्याचा फोन आला व मी खूप रागावले. सुवर्णाचे वडील त्यादिवशी घरीच होते. मग मी त्यांच्यावरही खूप चिडले. एवढे लक्ष ठेवता येत नाही व तिला अडवता येत नाही म्हणजे काय? मी पोलिस स्टेशनला फोन केला. वसावे मॅडमनी सकाळी आठ वाजता सगळ्यांना बोलावून घेतले. रात्री अकरा वाजता सुवर्णा घरी आली होती. वसावेंनी पत्र दिले व तिथूनच पुण्याला पाठवले. दुपारी सुवर्णाला ॲडमिट केल्याचा फोन आला व मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

आज मी हे सारे खूप तटस्थपणे व तिऱ्हाईतच्या भूमिकेतून लिहितेय, पण पुनर्वसनाच्या या प्रवासात खूप उलघाल झाली. अचानक पुढे जाण्याचा रस्ता बंद झाल्यासारखे वाटायचे. मार्ग सापडायचा नाही. चुकीच्या मार्गानं चाललोय का? असं वाटायचं. मग मी वेगवेगळ्या अँगलने या प्रश्नांचा विचार करायची. लोक दिशाभूलही करायचे. 'कशाला न सुटणाऱ्या भानगडीत पडता?' म्हणून बावळटही ठरवायचे. प्रश्न सुटत नाही याचे वाईट वाटायचे. पोलीस व बालकल्याण समिती यांच्याशीही खूप संघर्ष झाला. स्वत:ची भूमिका मांडताना इतरांना पटवून देताना आतल्या आवाजाला खूप चार्ज करावं लागायचं. सुवर्णाचं लग्न झाल्याचं कळताच खूप राग आला. मी चिडल्यामुळे सुवर्णाच्या घरचे घाबरून परत आले नाहीत. पण त्यांना गरज नसताना मी त्यांच्या आयुष्यात लुडबुड करतेय का, असेही मला वाटायचे. सुवर्णा गरोदर आहे हे कळताच मला पुढची वाटच सापडेना. पण परिस्थितीनं जेव्हा-जेव्हा दरवाजा बंद केला तेव्हा मी घाई केली नाही. वाट पाहिली. विचारप्रक्रिया चालू ठेवली. सुवर्णाच्या घरचे सोयीनुसार माझ्याकडे यायचे. लग्न करून देणे हा तिच्यापासून सुटकेचा सोपा मार्ग त्यांनी निवडला. मी याला विरोध करीन म्हणून माझ्यापासून लपवून ठेवले. या सगळ्या दीड वर्षाच्या प्रवासात माझी मती गुंग व्हायची. माझ्या जाणिवांच्या कक्षांना हादरे बसायचे. या मुलींना यातून बाहेर काढणे, त्यांचे पुनर्वसन करणे. त्यांना मार्गाला लावणे हे सारे ज्या तीव्रपणे मला वाटते, ती तीव्रता मुलीच्या पालकांच्यात का नाही? ताईचे चाललेय ते चालू दे अशी बघ्याची भूमिका का आहे? खूप प्रश्न पडायचे. परिस्थितीने त्या दोघी इतक्या गांजल्या होत्या की त्यांना मार्ग सापडत नव्हता. मी मार्ग दाखवला तरी साथ देण्याचं बळ नव्हतं. हे सारे करून नंतर काय करायचे असे प्रश्नही त्यांना पडत असतील का? आला दिवस ढकलणं व आहे त्याचा स्वीकार करणं, इतकं वाईट आयुष्य त्या मुली जगतात याचं मला कसंनुसं वाटत होतं. अन्यायाविरुद्ध आवाज नाही. प्रतिसाद नाही. त्यांच्यावर मी जबरदस्ती करतेय का? असे वाटायचे पण मग हळूहळू सारे माझ्या मनात झिरपायचे व त्यांची मानसिकता पचनी पडण्याची सवयच व्हायची. त्याचं जगणं समजायचं. ती उमगायला लागायची व त्यांच्यासाठी काम करण्याचा रस्ता सरळ-सोपा व्हायचा.

(लेखिका कचरावेचक महिलांच्या संघटन उभारणीकरता गेली २० वर्षे कार्यरत आहेत.)

**- वृषाली मगदूम**
भ्रमणध्वनी : ९३२२२५५३९०
vamagdum@gmail.com


## मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१८



# लुटूपुटूचं अहेव लेणं...!

श्यामल गरुड

**भा**रतातील तमाम लोककला या त्या त्या गावगाड्यातील दलित-मागास-बहुजनांच्या कलासक्त नाळेतून प्रसवल्या व त्या सर्व कला वेशीबाहेरील भुके-कंगालांनी अत्यल्प वाद्यांतून तगवल्या. जैविक सर्जनाची टिमकी न वाजवता व अभिजात कलेकडून मान्यतेची कुठलीही आशा न बाळगता आपल्या या लोककलांनी शतकांचा प्रवास केलाय, हे आज कोणीच नाकारू शकणार नाही.

**सन २०१६ मध्ये 'दैनिक पुण्यनगरी' या वर्तमानपत्रातल्या 'कनातीच्या मागे' या माझ्या 'तमाशावरील सदरा'च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरता आले. पांढरपेशी समाजाने आपल्या तथाकथित सुसंस्कृत नाकावर मध्यमवर्गीय पदर ओढून तमाशाला नेहमीच नावे ठेवलीत.**

'तमाशा' हा आपल्या महाराष्ट्राचा असाच एक अस्सल लोककलाप्रकार! सन २०१६ मध्ये 'दैनिक पुण्यनगरी' या वर्तमानपत्रातल्या 'कनातीच्या मागे' या माझ्या 'तमाशावरील सदरा'च्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरता आले. पांढरपेशी समाजाने आपल्या तथाकथित सुसंस्कृत नाकावर मध्यम वर्गीय पदर ओढून तमाशाला नेहमीच नावे ठेवलीत. अलीकडच्या काळात तर तमाशा काय, संपल्यातच जमा आहे, यासारखे उसासे टाकायला सुरुवात केली आहे. साधारणतः दोनशे-अडीचशे वर्षांची परंपरा असलेला तमाशा जर खरच लोप पावत चाललाय तर याच पार्श्वभूमीवर तमाशा कलावंताच्या किमान कलाइतिहासात नोंदी व्हाव्यात व तमाशाचा सुवर्णकाळ त्यांच्या चरित्रात्मक आढाव्यातून नोंदवून ठेवावा, या हेतूने माझी भटकंती सुरु झाली. अंतःस्थ एक भावना निश्चितच होती. तमाशातील स्त्रियांचे जगणे जवळून बघताना त्यांचे अनेक गुंतागुंतीचे सामाजिक प्रश्न समजावून घेणे, हा हेतू त्यामागे स्पष्ट होता.

स्त्रियांच्या शोषणावर चर्चा होऊ लागल्या आहेत. धर्म-जात-वंश-वर्गाची उतरंड अन् त्यातून निर्माण झालेली पुरुषसत्ता ही लपून राहिलेली नाही. पुरुषसत्ताक रचितांच्या सर्व सत्ता या धर्मापासून ते उत्पादन साधनांवरच्या त्यांच्या केवळ मालकीहक्कांपुरत्याच मर्यादित नसून त्या सत्ता पुरुषांच्या हाती एकवटल्या आहेत. हा सत्तेचा केंद्रबिंदू जगभरातील स्त्रीच्या लैंगिकतेला नियंत्रित करतो. भारतात दलित-मागास-बहुजन स्त्रीची लैंगिकता जातवास्तवाच्या विषमतेवर आधारित आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ''स्त्रिया या जातीव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत.'' प्रत्येक जातीच्या कुंपणाआड आपापल्या स्त्रियांवर पाळत ठेवीत तिच्या लैंगिकतेला नियंत्रित करण्याची नीतिमूल्ये ठरविली गेली आहेत. महात्मा फुल्यांचा 'कुणबिणीचा अखंड' यादृष्टीने अत्यंत अभ्यासनीय आहे. स्त्रियांच्या श्रमाची जागा ठरवत स्त्रियांनी कुठे उभे राहून काय काम करायचे? कुणी जातश्रेष्ठत्वाची बूज राखत चार भिंतीत संस्कृतीचे जतन करायचे तर कुणी उन्हा-तान्हात कष्ट करून जगायचे, तर कुणी विशिष्ट जात-धर्माचे मनोरंजन करण्यासाठी आपले आयुष्य पणाला लावायचे. स्त्रीशोषणाची ही जातधर्माधिष्ठित प्रतवारी कशी सुसंगतपणे पूर्वापार चालत आलेली आहे. हे बहुजन स्त्रीप्रश्नांची व स्त्रीवादाची मांडणी करतांना संध्या नरे-पवार व प्रतिमा परदेशी सारख्या काही लेखिकांनी बऱ्यापैकी नोंदवून ठेवले आहे. त्याचबरोबर विविध स्त्री अभ्यास केंद्रावर दलित-मागास-बहुजन स्त्रियांच्या प्रश्नांवर संशोधन सुरू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या श्रामाबाबत दखल घेत अनेक मोलकरणी, कचरा वेचणाऱ्यांसाठी अनेक संघटनाही कार्यरत आहेत. देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांना सांभाळणाऱ्याही संघटना आहेत. अर्थात आपल्याकडे यातही खूप विरोधाभास आहे. 'कचरा आमच्या मालकीचा' म्हणायला लावणे, 'सेक्स हाही एक कामधंदा आहे' हे त्यांच्याच तोंडून वदवून घेण्यासारख्या मासलेवाईक बाबी, ज्यात जातीच्या आधारावर लादल्या गेलेल्या दलितत्वाची भलामण करून, त्या कामातून सुटका न करता, त्याच कामाची-शोषणाची गोडी निर्माण करण्याची जिनोसाईड रणनीती अलीकडे आखली जाते, असे वाटू लागले आहे. शोषण व्यवस्थेला सुरुंग लावण्याची भाषा न करता तिला लिपापोती करून ही व्यवस्था पुन्हा सांभाळण्याचीच नवी टूम पुढे येत आहे. या सर्व स्त्री-प्रश्नाच्या परिप्रेक्ष्यात मात्र तमाशातील स्त्रियांचे प्रश्न अत्यंत दुर्लक्षित राहिलेत की काय? हे याठिकाणी



नोंदवावेसे वाटते.

तमाशा कलाक्षेत्राविषयी बहुजन परिप्रेक्ष्यात बघताना जर विशिष्ट जातीतल्या स्त्रीची लैगिकता (जेंडर) विशिष्ट उच्च जातीच्या मनोरंजनापुरती मर्यादित ठरविली गेली असेल तर तमाशातील लावणी आज मराठी चित्रपटामधून व विविध चॅनल व स्टेज शो वर कुलकर्णी, कानिटकर, नेरुरकर यांसारख्या तथाकथित उच्चवर्णीय स्त्रियांनीच जोरदार चालविली आहे व मूळ तमाशातल्या अंगभरून कपडे घालून नृत्य करणाऱ्या स्त्रियांच्या तुलनेत अधिक अंगप्रदर्शन करीत ती पेश केली जाते आहे. ही केवळ व्यवसायापुरती खांदेपालट आपल्या सोयीने केली जाते व पर शो हजारो-लाखोंनी ती विकलीही जाते परंतु मूळ तमाशातील स्त्री गावोगावी जत्रे-यात्रेत डोक्यावर बिराड घेऊन उन्हातान्हात आपली कला सादर करीत फिरते. जातवास्तवाच्या कुंपणाआतली डांबून ठेवलेली स्त्री व ती मोडून बाहेर पडणारी स्त्री यांत जातीच्या सीमारेषा धूसर होतात का? की व्यवसायापुरती सोयीची उचलेगिरी हे अंतर्गत विरोध व गुंतागुंती स्त्री प्रश्नांच्या अभ्यासकांनी निश्चितच अभ्यासावे.

आठ मार्चला महिला दिनानिमित्ताने स्त्री प्रश्नांसंदर्भात वेगवेगळ्या पद्धतीने विचारमंथन केले जाते. मला यानिमित्ताने तमाशातील कलावंत पत्नीचं दुःख काय असतं किंवा तमाशाक्षेत्रात या कलावंत पत्नी आपल्या उमेदवारीचा काळ ओसरल्यावर काय दुःख-वेदना भोगतायत ते सांगायचे आहे.

कधीकाळी भरजरी साड्या, ड्रेपरीच्या पेट्या बाळगणाऱ्या, स्नो-पावडर, लाली, काजळाची डबी, रंगीबिरंगी क्लिपांचा चाप लावून फडमालकाची बायको म्हणून मिरवणाऱ्या या स्त्री-कलावंत दिग्गज तमासगिरांच्या कलावंत पत्नी म्हणून लुटुपुटूचं अहेव लेणं २० ते २५ वर्षे सहज पेलतात. तमाशाचे मोठे फड सात महिने जत्रा-यात्रेत फिरतात. यादरम्यान स्व-इच्छेने व खुलेपणाने कलावंत स्त्री-पुरुष याप्रकारचे साहचर्य स्वीकारतात. तमाशा क्षेत्रात या संबंधांना नावं न ठेवता एकप्रकारे मान्यताच आहे. पुरुष कलावंताची घरी लग्नाची बायको असते. ती गावाकडे उंबरठा ते माजघरातील उस्तवारी पार पाडीत असते. तिची मुलं शाळेत शिकत असतात. कलावंत पत्नीची मुले तमाशात येतात. कुठल्याही अटीशिवाय वर्षानुवर्षे त्या कलावंतासोबत त्याची कलावंत पत्नी राहते. अनेकदा मोहतर लावला जातो. या संबंधातून होणारी मुले नंतर तमाशात काम करतात. लग्नाच्या बायकोची मुले मात्र सहसा तमाशाकडे येऊ दिली जात नाहीत. कलावंत पत्नीचे पैसे मात्र तो आपल्या घरादारासाठी व मुलांच्या शिक्षणासाठी सहज वापरतो. इथे कलावंत पती पूर्वापार चालत आलेली सनातनी पुरुषसत्ता इमाने इतबारे सांभाळतो. अनेकदा तमाशा कलावंताची जेव्हा कारकीर्द संपते आणि कलावंत पुरुष जेव्हा आपल्या मूळ घरी परततो तेव्हा बहुतेक कलावंत पत्नींचे पैशाअभावी कफल्लक अवस्थेत अतोनात हालच होतात.

महाराष्ट्रातल्या अनेक कलावंत पत्नींना भेटले. उदाहरणार्थ यमुनाबाई तळेगावकर, उषाबाई कोल्हापूरकर (चंद्रकांत



ढवळपुरीकर), सुलोचनाबाई नलावडे (श्रीधर नलावडे) असतील, यांच्याशी संवाद साधतांना जाणवले की भविष्याची कुठलीही तरतूद न करता या कलावंत स्त्रियांनी पारंपरिकतेच्या अहेव लेण्याला जिवापाड जपले व सरतेशेवटी अनेकींनी हात पोळून घेतलेत. आज उत्तरआधुनिकतेत आपण 'लिव्ह इन रिलेशनशिप'वर मोकळेपणाने वारेमाप बोलतोय, पण तमाशाक्षेत्रात फारशी अक्षरओळख नसणारा मोठा निरक्षर वर्ग, जो आपल्या पहिलेच स्त्री-पुरुष नात्यासंबंधी वेगळा विचार करून एका कलासक्त जाणिवेच्या समविचारावर एकत्र राहिला होता व याचा साधा थांगपत्ताही आपल्या पांढरपेशी वर्गाला लागला नाही.

आजही तमाशा क्षेत्रात अनेक कलावंत पत्नींचा सन्मानाने उल्लेख होतो. त्यात मोतमबाई वढळीकर (गहीनाथ शिंदे), छबुताई कराडकर ( चंद्रकांत ढवळपुरीकर), फुलाबाई बोरगावकर (शिवराम बोरगावकर), कांताबाई महाडिक (दत्ता महाडिक), राधाबाई नाशिककर (माधवराव गायकवाड), प्रभाबाई शिंगणेकर ( बाबुराव शिंगणेकर), शशाबाई बारदकर (भिकाभाऊ सांगवीकर), हिराबाई औरंगाबादकर (भिमाआप्पा सांगवीकर), शालनबाई मराठवाडीकर (दत्तोबा मराठवाडीकर) यासारख्या आणखीनही बऱ्याच कलावंत पत्नींची नावे नोंदविता येतील, ज्यांनी आपल्या कलेसोबतच तमाशे फडही सांभाळले, पण अलीकडच्या काळात तमाशा क्षेत्रातल्या मुली अधिक सजगतेने वावरताना दिसतात. त्या रीतसर लग्न करून आपल्या स्थैर्याला प्राधान्य देताना दिसतात. उदाहरणार्थ, अंजली नाशिककर यांनी संभाजीराजे जाधव यांच्याशी विवाह केला. शारदाबाई वढळीकरांनी आश्रोबा वंजारी भूमकर यांच्याशी विवाह करून केवळ कलावंत पत्नी म्हणून पुढील काळात येणारी अस्थिरता नाकारली. हे बदल हल्ली तमाशा क्षेत्रात बऱ्यापैकी दिसू लागले. परंतु तमाशातल्या मोठ्या प्रमाणात एकटेपणाच्या पारंपरिक अहेव लेणं पेलणाऱ्या स्त्री कलावंतांची यादी खूप मोठी आहे. त्या निराधार पोरक्या अवस्थेत जगत आहेत. वार्धक्यामुळे धड तमाशात काम नाही व इतर श्रमाची सवय नसल्याने यातल्या अनेक जणींची अत्यंत केविलवाणी स्थिती आहे. आज आपल्या महाराष्ट्रात असंघटित स्त्री कामगारांच्या प्रश्नांसंबंधी अनेकजण लढत आहेत पण तमाशातील स्त्रियांच्या विविध प्रश्नांसाठी कोणीही पुढे येत नाही हे खेदाने नमूद करावं लागेल. तमाशाला सातत्याने वाईट ठरवत गेल्याने त्यातल्या स्त्री प्रश्नांकडेही आपण सोयीस्करपणे डोळेझाक केली, हेच चित्र आज ठळकपणे अधोरेखित होत आहे.


जात वास्तवावर दलित-मागास-बहुजन स्त्रीच्या प्रश्नांसंदर्भात आपण गांभीर्याने विचार करतांना तमाशातील स्त्रियांना वाळीत टाकून कसे चालेल? हल्ली पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या काही विदुषी शहरात पंख्याखाली बसून तमाशातील स्त्री प्रश्नांची चर्चा व लिंग शोषणाच्या प्रश्नांतर्गत देहविक्रय करायला भाग पाडणाऱ्या स्त्रियांच्या समस्या कुठेतरी एकाच पारड्यात तोलत आहेत. ज्या विदुषींना तद्दन चंगळवादी संगीतबारी व तमाशातला फरकही माहीत नाही, त्या आपल्या कल्पनाविलासाच्या जोरावर तमाशा स्त्रीच्या लैंगिक शोषणाच्या तद्दन पुस्तकी संकल्पना वापरत 'जेंडर इश्यू'च्या नावाखाली भुगा पाडताहेत. गावगाड्यातील जत्रा-यात्रेत हातावर पोट घेऊन फिरणाऱ्या या कलावंत स्त्रियांची व त्यांच्या विविध प्रश्नांची मीमांसा 'स्त्री अभ्यास केंद्रांच्या डिस्कोर्स'मध्ये कधी येणार आहे की नाही? हा प्रश्नही तेवढाच गंभीर आहे.

आपण जगभरातल्या स्त्री प्रश्नांना सहोदरी भगिनीभावातून बघण्याइतपत व्यापक झालोय, परंतु कलेच्या क्षेत्रात भक्कम पणे पाय रोवून उभ्या असणाऱ्या आपल्याच परिघावरच्या असंख्य लोककलावंत भगिनी आजही अज्ञानाच्या व परंपरेच्या जोखडाखाली, जगण्याच्या चुकीच्या वाटाघाटीत आयुष्य पणाला लावत आहेत. त्यांच्या या अंधारगुहेपुढे एकतरी उजेडाचा दिवा आपल्यालाच ठेवावा लागेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने भगिनीभावाची कूस उजळेल...!

(लेखिका मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापिका म्हणून कार्यरत.)

**- श्यामल गरूड**

भ्रमणध्वनी : ९९२०४२३१७९



# तिची कविता

## 'सूज'

जननेंद्रियाला आलेली जन्मभराची सूज
तरीही पोटासाठी सुरू शरीरांशी गूज

चुरगळलेली योनी झाला अस्तित्वाचा चोथा
बापच म्हणतो दारापाशी उभा आहे चौथा

काल एक शोधत होता स्तनांमध्ये पान्हा
लाज माझी विकली तेव्हा कुठे होता कान्हा?

करु पाहतात उत्तेजित लावून डॉटेड कॉंडम
विझल्या देहाशी झोंबणारी असली जात कंडम

पोलिसही वसूल करतात शरीराचा हप्ता
कुणीही यावं, जावं भोगून इतका देह सस्ता?

आहे जवानी तोवर म्हणतात कमवून घे दाम
ओसरल्यावर बहर होईल जगणे सुध्दा हराम


– गीतेश गजानन शिंदे
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६
geeteshshinde@gmail.com




## कचरा वेचणाऱ्या मुली

आपल्या-आपल्या शहरांत
जरूर पाहिल्या असतील
कचरा वेचणाऱ्या मुली
गल्लीतल्या कचऱ्याच्या ढिगांवर
चालत्या-फिरत्या खाटांसारख्या
कचऱ्यातच आपोआप जन्माला आल्यासारख्या नाही वाटत,
या कचरा वेचणाऱ्या मुली?
जागोजाग फाटलेल्या
आपल्या कपड्यांसारख्या गोण्यांमध्ये भरतात त्या...
तुम्ही-आम्ही फेकलेल्या
कागदांचे तुकडे, तुटके-फुटके टीनाचे आणि प्लॅस्टिकचे डब्बे
जेव्हा एखादा छापलेला फोटो किंवा साबणाचा डब्बा मिळतो त्यांना...
तेव्हा त्या ठेवून देतात त्यांना सांभाळून...
आणि तेव्हा तर तुम्ही त्यांना पाहूच शकत नाही,
जेव्हा कचऱ्यातून काहीबाही उचलून
त्या गुपचुप तोंडात टाकतात!
त्यांच्या आसपास फिरणाऱ्या प्राण्यांमध्ये
कशा दिसतात या कचरा वेचणाऱ्या मुली?
हा प्रश्न समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाबाहेरचा आहे
आणि सौंदर्यशास्त्र त्यांच्यासाठी अजून तयार झालेलं नाही.
हो, पण आजकाल कलात्मक छायाचित्रणासाठी
मसाला जरूर बनतात या कचरा वेचणाऱ्या मुली!
आपल्या त्वचेवर काजळीची पुटं चढवत
केसांच्या जटा विस्कटत-वाढवत
लाज-शरम सोडून शरीर हवं तिथे खाजवत
घाम आणि पाण्याच्या सपकाऱ्यांनी,
जमा झालेल्या मळाच्या रेघोट्या उमटलेल्या चेहऱ्यांनी...
पिवळ्या दातांनी कळत नाही कुणाला चिडवतात
आठ-नऊ वर्षांपासून वीस-पंचवीस वर्षांपर्यंतच्या या मुली
कळत नाही कशा, कोणत्या कचराकुंडीतून
आपल्या पोटात मुलंही घेऊन येतात...
मेल्या होत्या या सगळ्याच चौऱ्याऐंशीच्या गॅसमध्ये*
आता कुणाला विचारणार, कुठून उगवल्या आहेत
या कचरा वेचणाऱ्या मुली?
कुठल्याच रजिस्टरमध्ये यांचं नाव नाही लिहिलेलं
शोधूनही सापडत नाही यांच्या बापाचा पत्ता...
यांचा कुठेच कुणी भाऊ नाही दिसत.
इतकंच नाही तर स्वत:च असतात स्वत:ची आई
या कचरा वेचणाऱ्या मुली!

**मूळ हिंदी कविता – भगवत रावत**
**अनुवाद : वीणा सानेकर**

* १९८४, भोपाळ गॅस दुर्घटना




# करेन हर्नी
# पहिली स्त्रीवादी मनोविश्लेषक

/ धनंजय गांगल

**क**रेन हर्नी ही बाई म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महत्त्वाची मनोविश्लेषक आणि मानसोपचारतज्ज्ञ. किंबहुना स्त्रीवादी मनोविश्लेषणाचा पाया तिने रचला असे म्हणता येईल. तिचा जन्म १९८५ साली जर्मनीत झाला. तिचा कार्यकाळ साधारण १९१० ते १९५२. तिच्या मृत्यूपर्यंत ती सतत कार्यरत होती. साधारण १९१३ साली 'युनिव्हर्सिटी ऑफ बर्लिन'मधून ती वैद्यकीय क्षेत्रात एम. डी. झाली. १९२० मध्ये काही सहकाऱ्यांसोबत तिने 'बर्लिन सायकोऍनालिटिक इन्स्टिट्यूट'ची स्थापना केली. १९३२ साली फ्रान्झ अलेक्झांडर याच्या निमंत्रणावरून ती अमेरिकेला 'शिकागो इन्स्टिट्यूट ऑफ सायकोऍनालिसीस' येथे त्याची सहकारी म्हणून रुजू झाली. त्यानंतर दोन वर्षांनी ती ब्रुकलिन येथे राहावयास गेली. १९३०-४०च्या दशकात ब्रुकलिन येथे वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक बुद्धिवंतांची मांदियाळी होती. तिथेच तिने आपले उर्वरित आयुष्य व्यतीत केले.

> **ती फ्रॉइडची विद्यार्थी नव्हती पण फ्रॉईडला तिची, तिच्या कामाची पूर्ण जाणीव होती. एक शास्त्रज्ञ म्हणून खरे तर त्याने तिला प्रोत्साहन द्यायला पाहिजे होते. पण त्याने नरो-वा-कुंजरोवा अशीच भूमिका घेतली. तिच्या अस्तित्वाची दखलही त्याने कधीच घेतली नाही.**

तो काळ हा जगप्रसिद्ध सिगमंड फ्रॉइड (१८५६-१९३९) या मनोविश्लेषक आणि मानसोपचारतज्ज्ञ याचा प्रचंड प्रभाव असलेला काळ होता. मनोविश्लेषणाच्या क्षेत्रात, त्याच्या विचारांहून वेगळा विचार मांडणं हे जवळपास पाप समजले जाई. किंबहुना तिचे तर निरीक्षण असे होते की हे विज्ञानाचे क्षेत्र असूनही या क्षेत्रात झापडबंदपणा आला असून कुठलाच वेगळा विचार स्वीकारला जात नसे. ब्रुकलिनला असताना ती 'न्यूयॉर्क सायकोऍनालिटिक इन्स्टिट्यूट' येथे व्याख्याता म्हणून जात असे. इथेच तिची भेट एरिक फ्रॉम आणि हॅरी सुलिव्हान या दोन मनोविश्लेषण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींशी झाली. त्यांच्याच प्रोत्साहनाने तिने व्यक्तिमत्व आणि मनोविश्लेषणाबद्दल स्वतःचे सिद्धान्त मांडायला सुरवात केली. फ्रॉइडपेक्षा वेगळे काही मांडणे हे स्वीकारार्हच नव्हते आणि त्यामुळेच तिची 'न्यूयॉर्क सायकोऍनालिटिक इन्स्टिट्यूट'मधून गच्छन्ति अटळ होती. ती



फ्रॉइडची विद्यार्थी नव्हती, पण फ्रॉईडला तिची, तिच्या कामाची पूर्ण जाणीव होती. एक शास्त्रज्ञ म्हणून खरे तर त्याने तिला प्रोत्साहन द्यायला पाहिजे होते. पण त्याने नरो-वा-कुंजरोवा अशीच भूमिका घेतली. तिच्या अस्तित्वाची दखलही त्याने कधीच घेतली नाही. अशी 'न्यूयॉर्क सायकोएॅनालिटिक इन्स्टिटट्यूट'मधून गच्छन्ती झाल्यावर तिने काही सहकाऱ्यांसोबत 'अमेरिकन इन्स्टिटट्यूट ऑफ सायकोॲनेलॅसिस' या संस्थेची आणि 'अमेरिकन जर्नल ऑफ सायकोॲनेलॅसिस' यांची स्थापना केली. या इन्स्टिटट्यूटमध्ये मग ती तिच्या मृत्यपर्यंत (१९५२) शिकवत राहिली.

फ्रॉइडने मनोविश्लेषणात स्त्री आणि पुरुष हे मूलतः वेगळे असल्याचे मांडले. 'पेनीस एनव्ही' हा त्याचा एक सिद्धांत. पुरुषांप्रमाणे लिंग नसल्याने स्त्रियांना आपण कमी पडतोय असा न्यूनगंड तयार होतो आणि त्यातून त्यांची एक पराभूत मनोभूमिका तयार होते आणि म्हणून स्त्री व पुरुष यांचे मानसशास्त्र निसर्गतः वेगळे असते - हे त्याचे सार. हर्नीने हा खोडून काढला. 'ओडिपस कॉम्प्लेक्स' म्हणजे मुलाचा आईकडे आणि मुलीचा बाबांकडे निसर्गतः ओढा असणे हा फ्राईडचा अजून एक सिद्धांत. हर्नीने तोही खोडून काढला. तिच्या मते 'पेनीस एनव्ही' म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या जननेंद्रियांबद्दल हेवा, असूया वाटणे आणि न्यूनगंड तयार होणे हे नैसर्गिक नसून, समाजातील स्त्री-पुरुष असमानतेतून आले आहे. स्त्रियांना पुरुष्याच्या लिंगाचा नाही तर विषम सामाजिक परिस्थितीत, पुरुषांकडे स्त्रियांपेक्षा जी जास्त सत्ता एकवटली आहे, प्रत्यक्षात त्याचा हेवा वाटतो. मुलीला वडिलांचे आकर्षण हे आईपेक्षा त्यांच्याकडे असलेल्या जास्त सत्तेचे असते. पुढे जाऊन तिने पुरुषांच्या 'वूम्बस एनव्ही' म्हणजे पुरुषांना स्त्रियांच्या गर्भाशयाचा आणि त्यामुळे तिला चक्क नवीन जीव जन्माला घालता येतो, या तिच्या सर्जनशीलतेचा हेवा वाटतो, या सिद्धांताची मांडणी केली. या स्त्री-पुरुष असमानतेमुळे पुरुषाला स्वतःला सतत सिद्ध करण्याचा दबाव असतो, स्त्रियांना तो तेवढा नसतो आणि ह्याचेही कुठेतरी पुरुषांना आकर्षण आणि सुप्त असूया असते. आपण स्त्रीप्रमाणे निर्मिती करू शकत नाही या जाणिवेतून आणि त्यातून येणाऱ्या अगतिकतेमुळे पुरुष सतत स्वतःला सिद्ध करण्यासाठी धडपडत असतो. जास्त सत्ता, उच्च पद यामागे लागतो. सतत दुसऱ्यांवर सत्ता गाजवण्याची त्याची धडपड या अगतिकतेतूनच येते.

तिने स्त्रियांचे मानसशास्त्र आणि न्यूरोसिस या विषयांवर बरीच पुस्तके लिहिली. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात ती आत्मशोधाकडे वळली, पण सरतेशेवटी करेन हर्नी लक्षात राहते ती फ्रॉईड च्या काही सिद्धांताना आव्हान देणारी आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी आगळी-वेगळी व्यक्ती म्हणून!

(संगणक अभियंता, सामाजिक-सांस्कृतिक विश्लेषक)

**- धनंजय गांगल**
**भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०**
dhananjay.gangal@gmail.com

**ग्रंथाली**

**बखर वास्तुकलेची**




**प्रकाश पेठे**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

सर्वगुणसंपन्न वास्तुनिर्मिती होणे ही गरज अबाधित राहील. कारण माणूस सौंदर्याचा भुकेला असतो. उत्तम वास्तूंचे जतन करण्याचा प्रश्न नंतर हाती घेता येईल. जॉन रस्किनचे 'सेव्हन लॅम्प्स ऑफ आर्किटेक्चर' अभ्यासाला होते. त्या सात ज्योती म्हणजे त्याग, सत्य, शक्ती, सौंदर्य, जीवन, स्मृती आणि आज्ञाधारकपणा. त्याने १८४९ साली लिहिलेल्या त्या सात गोष्टींबद्दल वादविवाद होऊ शकतात, पण दोन हजार वर्षांपूर्वी व्हिटुव्हियसने वास्तूच्या सर्वगुणसंपन्नेचे स्थैर्य, उपयुक्तता आणि सौंदर्य हे तीन निकष मानले जातात असे म्हटले. ते तीन निकष जागतिक प्रतिष्ठेचे प्रिटझकर बक्षिस देतानाही तपासले जातात.









'ग्रंथाली'च्या विविध उपक्रमांसाठी दि. २७ फेब्रुवारी २०१८ रोजी बॅण्डस्टॅण्ड (वांद्रे) येथील जागेची कागदपत्रे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, 'ग्रंथाली'कडे सुपुर्द करण्यात आली. यावेळी शिक्षणमंत्री विनोद तावडे, आमदार आशिष शेलार या मान्यवरांसोबत 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक आणि ग्रंथालीचे पदाधिकारी उपस्थित होते.

● मुंबई मनपाचे आयुक्त अजोय मेहता यांनी अतिशय सकारात्मक भूमिका घेऊन 'ग्रंथाली'स आपल्या हक्काचे छप्पर मिळवून दिले.

● 'ग्रंथाली'च्या टायकलवाडीतील कार्यालयात प्रवेश करण्याचा क्षण दिनकर गांगल आणि अनुराधा गांगल यांच्या उपस्थितीत साजरा करण्याचा योगही 'ग्रंथाली'ने जुळवून आणला.





'ग्रंथाली' आता आपल्या हक्काच्या जागेत...

१०१ द नेस्ट, 'पहिला माळा, मनोरमा नगरकर मार्ग, स्टार सिटी सिनेमासमोर, टायकलवाडी, माहीम, मुंबई-४०० ०१६.



# उजळमाथ्यानं कुणबीपण मिरवणे महत्त्वाचे

**ग्रंथाली परिवारातील लेखक आणि कवी श्रीकांत देशमुख यांच्या 'बोलावें ते आम्ही' या काव्यसंग्रहास सर्वोत्कृष्ट मराठी साहित्यकृतीचा वर्ष २०१७ सालीचा 'साहित्य अकादमी' पुरस्कार प्राप्त झाला. तो स्वीकारतानाचे श्रीकांत देशमुख यांचे भाषण...**

**सा**हित्य अकादमीने माझ्या कवितेचा जो सन्मान केला त्याविषयी मी सर्वप्रथम कृतज्ञता व्यक्त करतो. माझ्या कवितेचा सन्मान हा कृषीजन जाणिवेचा आणि मी ज्या कोरडवाहू शेतकरी कुटुंबातून आलो, जे कुटुंब देशातील सर्वसामान्य शेतकरी वर्गाचे प्रतिनिधित्व करते, त्या शेतकरी-कष्टकरी समूहाचा सन्मान आहे.

कवी हा वर्तमानाचा संवेदनशील प्रतिनिधी असतो. स्वत:ला खरवडून तो आपले नाते आपल्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाशी जोडतो. त्यामुळे चांगली कविता ही सतत समकालीन असते असे मला वाटते. कवीने आपल्या स्वत:च्या कलाकृतीचे मूल्यमापन करू नये. तसे करणे हे अनैतिक असते असे मला वाटते. मी फक्त माझ्या जाणिवांविषयी बोलणे त्यामुळे अधिक रास्त आहे.

मराठी भाषा, संस्कृती आणि समाज हा एक भारतीय पातळीवरील वैशिष्ट्यपूर्ण समाज आहे. मराठी साहित्य हा मराठी संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. एवढेच काय मराठी संस्कृतीचे समग्र दर्शन घडविण्याची शक्ती मराठी भाषा, कविता, लोकपरंपरा, लोकसाहित्य आणि प्राचीन काळापासूनचे उपलब्ध साहित्य यात आहे. गाथासप्तशती, लीळाचरित्र, ज्ञानेश्वर आणि त्यांचे समकालीन भक्तिसंप्रदायातले संत, मराठी मुस्लिम संत कवी, तुकोबा, शिवाजी राजांचे उपलब्ध समकालीन लेखन, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन परंपरेतले लेखन, सत्यशोधक चळवळ ही आधुनिक मराठी साहित्य आणि समाजाची वैभवशाली पार्श्वभूमी आहे. या परंपरेतच लेखन करणारा एक कवी, लेखक म्हणून मला त्याचा अभिमान वाटतो. समग्र भारतीयात्वाशी जोडणारी ही लेखन परंपरा वैश्विक जाणिवांशीही नाते जोडणारी आहे.

चक्रधर स्वामी, तुकोबा, जोतिबा, महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर अशा थोरांचे लेखन हे केवळ लेखन नसून परिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या कृतिशीलतेचा वारसा सांगणारे आहे. याच लेखन परंपरेतला मी स्वत:ला समजत असल्यामुळे माझ्यावरही कवी म्हणून एक मोठी सांस्कृतिक जबाबदारी आहे, याचे भान ठेवणे मला रास्त वाटते. लेखनातून सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनासाठी आवश्यक असणारी पार्श्वभूमी तयार होऊ शकते अशी माझी धारणा आहे. या अर्थाने कविता ही देखील कृतिशील असते असे मला वाटते.

कवी लेखक असणे ही एक प्रकारची जोखीम आहे. योग्य शब्दांची निवड करून, संपृक्त अनुभव गोळीबंद पद्धतीने मांडणे म्हणजे कविता लिहिणे असे मला वाटत नाही. लेखन करत असताना कवी लेखकाच्या मनाच्या तळाशी जे काही ढवळून निघते ते अधिक महत्त्वाचे असते. व्यक्त होणे ही त्या पुढची आवश्यक क्रिया आहे, जी मनाच्या अस्वस्थतेचे प्रतिनिधित्व करत असते. माझी कवी म्हणून असणारी अस्वस्थता माझ्या भोवतालच्या जमिनीशी भिडून असणाऱ्या माणसांशी निगडित, पर्यायाने त्यांच्याविषयी बोलणारी, व्यक्त होणारी आहे. मी ज्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणात जन्मलो, वाढलो त्याविषयी बोलणे, लिहिणे मला अधिक सोयीस्कर, नैतिक आणि जबाबदारीचे वाटते. या अर्थानेच मी स्वत: माझ्यासाठी साहित्यातले भूमितत्त्व आणि भूमिप्रतिष्ठा ही अधिक महत्त्वाची मानतो. तिला सोयीसाठी कोणत्या अर्थाने ओळखायचे हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे, कारण शेतकरी कुळातला तुकोबा हा मराठीतला पहिला संत आणि शेतकरी कुळातला शेतकरी राजा शिवाजी आणि त्यांना असं संबोधणारा जोतिबा हे मला माझे सर्वश्रेष्ठ पूर्वज वाटतात.

ज्यांचा जीव आहे आपल्या गावावर
ते गावाबद्दल कधीच बोलत नाहीत
मनातल्या मनात सांभाळत रहातात
घराची दारं, उंबरे, ओटे ओसऱ्या.



**ज्ञानपीठ विजेते लेखक आणि साहित्य अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर कम्बार यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना श्रीकांत देशमुख**

ज्यांचा जीव आहे साऱ्यांचाच गावावर
परक्याच्या शेतालाही कुरवाळत जे मायेनं
कोणताही बैल वाटतो त्यांना जगन्नियंता.
आपल्या भोवतालाविषयी ते कधीच बोलणार नाहीत
त्यांच्यातच सामावलंय इथलं पिकपाणी, ओढेनाले
डोंगरदऱ्या, मायलेकी, बापलेक, गुरंवासरं.
आपणच आपले विषयी बोलण्याचं पाप
ते कधीही करणार नाहीत
जे झोपतात उशाला घेऊन मातीचा ढिग
उगवतात आणि वाढतात मातीत

माझी ही कविता खेड्यापाड्यात, डोंगरदऱ्यातून वस्ती करणाऱ्या बिनचेहऱ्याच्या माणसांविषयी बोलणारी कविता आहे. जे लोक जगाचा चेहरा घडवतात पण स्वत: मात्र भूमिगत असतात. कलासंस्कृतीला आकार देण्यात याच अदृश्य समूहाचा निर्णायक सहभाग असतो. माझ्यातून निरंतर वाहणारी संवेदना ही या कृषिसमूहाची संवेदना आहे. बापूजी आयुष्यभर ज्या खेड्याविषयी, ग्रामस्वराज्याविषयी बोलले त्याला भिडून पिढ्यान्‌पिढ्या जगणारा आणि मातीवर राबताना, माती होणारा हा विश्वव्यापी समूह आहे. म्हणून मला उजळमाथ्यानं कुणबीपण मिरवताना विशेष आवडते. कुणबीपण ही कुठल्याही अर्थानं मला जात, प्रदेश, धर्म, भाषानिष्ठ संवेदना वाटत नाही. शेती करणे हे पवित्र काम आहे, असे मानणारा थोरो यासाठीच मला थोर वाटतो.

भारतीय शेती, खेडी आणि खेड्यातला माणूस हा बापूजींच्या आस्थेच्या केंद्रस्थानी होता. ''शासक को प्रजा की भाषा सिखनी चाहिये।'', असं ते म्हणायचे. भारतीय साहित्यातही भारतीय कृषक समाज, संस्कृती आपल्या व्यथावेदनांसह मोठ्या प्रमाणात मांडली गेली आहे. भारतीय बहुसंख्य समाजाबद्दल बोलणारे साहित्य म्हणून भारतीय कृषिजनसाहित्य ही मध्यवर्ती साहित्यधारा आहे.

शेती आणि शेतकरी हा कायम शोषणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहात आला आहे. गेल्या काही दशकात देशभरात आणि विशेषत: महाराष्ट्रातील विदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. शेतकरी आत्महत्या ही घटना एकूण शेतीव्यवस्था आणि ग्रामव्यवस्था कोणत्या अवस्थेत आहे हे दर्शविणारे एक निदर्शक आहे. जागतिकीकरणातून शेतीव्यवस्थेची अवस्था सुधारेल असे भाकीत मांडले गेले होते. ते खोटे ठरले आहे. शेतीव्यवस्थेतला एक लिहिता घटक म्हणून ही बाब मला विशेष चिंताजनक वाटते. आपली आद्य आणि विद्यमान संस्कृती कृषिबहुल असतानाही या समाजघटकाविषयी निर्माण झालेला असमतोल कोणाही संवेदनशील मनाला चिंतित करणारा आहे.

तो बोलत नाही युगांतराबद्दल
सांगतो फक्त नांगराच्या फाळाची गोष्ट.
ज्यानं भूमी पेरून आपल्या निरागस हातांनी
खावी चावून पहिल्यांदा दुधाळ कणसं
त्यानंच पेरला पहिला दाणा.
राखून ठेवलीय त्याच्यासाठी त्यानं
कपाळावरली अदृश्य रेघ
अपरंपार आभाळाखाली मनभरून माथा टेकवण्यासाठी.
तो सांगतो फक्त
बैलाच्या आभाळभिड्या खांद्याची गोष्ट
क्षितिजालाही पेलणार नाहीत असे नांगर आणि माती
खांद्याला समजून भूमी सावरण्याची गोष्ट
तो बोलत नाही युगांतराबद्दल.

मी स्वत:ला कुणबी कवी मानतो. हे कुणबीपण श्रमणाऱ्यांची एक विश्वव्यापी जीवनशैली आहे. श्रमाने तिला भाषा दिली, गाणी-चित्र दिले. लोकसंचितातून ती निर्माण झाली आहे. त्यामुळेच जागतिकीकरणातही ती आपल्या आदिभावाचे नैतिक उच्चारण करताना दिसते. भारतीय देशीयतेचा शोध या परंपरेला वगळून घेता येणार नाही. ती घडवण्यात जसा हजारो-लाखो अज्ञान कष्टकरी, शेतकरी, आदिवासी, स्त्रिया यांचा वाटा आहे तेवढाच मराठी संतपरंपरेचा आणि म. जोतिबा फुलेप्रणित सत्यशोधकी परंपरेचा

आहे. या संस्कृतीतले जे न-नैतिक होते ते जोतिबांनी नाकारले आणि तिला खरा बहुजन पाया दिला. हेच काम पुढे अधिक विस्तृत स्वरूपात महर्षी वि.रा. शिंदे, आंबेडकर यांनी केले. मराठी साहित्यावर या जाणिवेचा निर्णायक प्रभाव पडला आहे. मीही त्याला अपवाद नाही.

परंपरेचे गौरवीकरण टाळून शेतीव्यवस्था आणि शेतकरी समाज समजून घेणे कवी म्हणून मला गरजेचे वाटते. बदलतं सामाजिक, राजकीय आणि बहुस्तरीय सांस्कृतिक परिवर्तन यात आजचा शेतकरी आणि गाव नेमका कुठे आहे, हा कलावंत म्हणून मला पडलेला प्रश्न कायम असतो. या बदलाच्या अवकाशाचा कुणबीपणाचा पुर्नशोध घेणारी माझी कविता आहे. आपली संवेदनशीलता भौतिकीकरणाच्या धबडग्यात नापीक होत असताना कलावंतांची जबाबदारी विशेष महत्त्वाची आहे. साहित्य हे क्रांती घडवून आणते की नाही यापेक्षाही समाजाची विचारशीलता आणि संवेदना टिकवून ठेवण्याचं काम ते करते, ही बाब परिवर्तनासाठी आवश्यक भूमी निर्माण करणारी असते. संवेदना संपलेला समाज सर्वात भयावह असतो. तो तसा होऊ न देणे ही कवी लेखकाची प्रतिज्ञा असायला हवी.


शेतकरी कष्टकऱ्यांची मुलं शिकून गावगाड्याबाहेर पडायला लागली. शिक्षणातल्या बहुजन परंपरेतून दलित, ग्रामीण साहित्य निर्माण झाले. मूलत: शेतात राबणे ही बाब एका बाजूने सृजनशील मानली तरी ती भयंकरपणे कष्टप्रद असल्याने शेतात राबणारा लिहू शकत नाही. तो फक्त गाणे गाऊ शकतो, तोही जगण्याचा आधार म्हणून. भारतीय खेडी ही तळाशी जाऊन विचार केला तर रोमँटिक कधीही नव्हती. खेड्यांशी भावनिक आणि जैविक संबंध नसणाऱ्यांनी ती रोमँटिक स्वरूपात उभी केली. गेल्या काही दशकात भारतीय पातळीवर खेड्यातला हा तथाकथित रोमँटिसिझम लेखनाच्या पातळीवर नाहीसा होताना दिसतो. नवे लेखन अधिकाधिक वास्तववादी आणि जगण्याला भिडणारे होताना दिसते. मीही असाच थेट वर्तमानाचे बोट हाती धरून काहीएक नोंदवणारा कवी लेखक आहे. प्रतिशोध घेण्यापेक्षा पुनर्शोध घेणे मला महत्त्वाचे वाटते.

भूमी आणि तिला जोडून येणाऱ्या भूमिकांना नकार देणे, मला मानसिक आणि भावनिक विस्थापनांना आमंत्रित करणारे वाटते. स्थितीवादाला नकार देऊनही ही भूमिनिष्ठा जपता येऊ शकते. जी आपल्याला प्रेमचंद, रेणू यांच्या साहित्यातून दिसते. भूमिनिष्ठा ही कलावंताला सामान्यत्वाशी जोडून विश्वात्मकतेकडे नेणारी असावी. मराठीपणाला महाराष्ट्राचे दैवत, विठ्ठल जोडलेला आहे. माझी कविताही विठ्ठल आणि पंढरपुरातल्या असंख्य प्रतिमांनी व्यापलेली आहे. विठ्ठलाकडे मी अध्यात्मिक प्रतिकापेक्षा सांस्कृतिक प्रतिक म्हणून पहातो. अध्यात्म्याच्या चौकटीतही तुकोबा, ज्ञानोबा यांसारख्या संतांनी मांडलेला विद्रोह हा सांस्कृतिक विद्रोहच होता. मीही कवी म्हणून आधुनिक जाणिवांच्या पातळीवर या परंपरेला जोडून घेतले आहे. मराठी अभंग साहित्य हे मराठी शेतकऱ्यांचे ऊर्जाकेंद्र आहे. सतत होणाऱ्या पडझडीत या साहित्यानेच त्याला जगण्याचे बळ दिले आहे. हीच व्यापक अर्थाने आपली भारतीय परंपरा आहे.

**श्रीकांत देशमुख** **– प्रतिनिधी**
नांदेड, महाराष्ट्र
भ्रमणध्वनी : ८९८३६९८५८१
shrikantdeshmukh63@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

## श्रीकांत देशमुख यांची दोन पुस्तके



**पडझड**
**वाऱ्याच्या**
**भिंती**

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

**बोलावें**
**ते**
**आम्ही...**

**मूल्य १८० रु.**
**सवलतीत १३० रु.**



# शब्दशक्तीचा जागर

संजीवनी खेर

**जयपुर लिट फेस्टिव्हलसाठी ठेवलेले विषय विचारांना चालना देणारे असे होते. त्यासाठी जगभरातून जमलेले विचारवंत, लेखक, कवी, पत्रकार आपापल्या देशातील स्थिती त्यातील त्यांचे जीवन- संघर्ष, व्यक्तिगत विचार मांडत होते. साहित्याच्या पलीकडे जाऊन नृत्य, नाट्य, संगीत, शिल्प अशा माध्यमांतून सर्जनाच्या वाटा धुंडाळल्या गेल्या होत्या.**

एक शानदार साहित्य महोत्सव पाहून, ऐकून आल्याचे समाधान 'झी जयपुर लिट फेस्टिव्हल'ला जाऊन आल्यावर मिळाले. यंदाचे ह्या शब्द महोत्सवाचे अकरावे वर्ष होतं. सेलिब्रेटी इव्हेंट म्हणावा असा डौल ह्या महोत्सवाला होता. कुणालाही मज्जाव नव्हता. जागतिक कीर्तीचे साहित्यिक सहजपणे कुठेही अहं न दाखवता मोकळेपणाने मिसळत होते.

कलात्मकतेने सजलेला डिग्गी पॅलेसचा परिसर राजस्थानी लोककलाकारांच्या गायन नृत्याने दुमदुमत होता. मंचावर गायनाचा कार्यक्रम सुरू होता. देशी विदेशी साहित्यिकांची लगबग सुरू झाली होती. त्यांच्यातही प्रचंड उत्साह नि ऊर्जा जाणवत होती. मस्त हवा, स्वच्छ परिसर! राजेशाही वातावरण, तरीही सामान्य तरुण-तरुणींचा आपल्या लाडक्या साहित्यिकांना ऐकायला-पाहायला असलेला अमाप उत्साह. हातात नवी पुस्तके, तुडुंब भरू लागलेले मंडप, त्या शामियान्याचे कापडही खास राजस्थानी प्रिंट्सचे. उच्च अभिरुची सर्वत्र दिसत होती. २० देशातील साहित्यिकांची हजेरी, ८० हजाराहून अधिक लोकांनी प्रतिनिधी म्हणून नोंदणी केली होती. सहा शामियानात प्रत्येकी आठ सत्रं सुरू (अशी ४८ सत्रं), अगदी काटेकोरपणे वेळेतच सत्रं संपणे, सकाळी ९.३० ते सायं ६-१५ चर्चा, मुलाखती, पुस्तक प्रकाशन, प्रत्येक शामियान्यात एक हजार लोकं मावतील एवढी जागा पण तितकेच लोक ऐकायला उभे, श्रोत्यात तरुणांचा सहभाग ६०%, शिस्त, स्वच्छता, अदबशीर वागणं एवढ्या गर्दीत पाळलं जात होतं. लेखकांशी बोलायची संधी, पुस्तकांवर हस्ताक्षरं करायला दालनांजवळ छोटे तंबू, १४ जागी वैविध्यपूर्ण खाण्यापिण्याची व्यवस्था, सर्वत्र कार्डनेच व्यवहार! पैसे घेतच नव्हते. नवी प्रीपेड कार्ड्स करून देत होते. इंग्रजी आणि हिंदी चर्चासत्रांनाही अलोट गर्दी, संगीत, लोकनृत्य तसेच सायंकाळी संगीत मैफलींचे, देशी-विदशी नाट्यांचे सशुल्क आयोजन, देशी- विदेशी आबालवृद्धांचा जणू फॅशनमेळा, उत्साहाने थबथबलेली रंगीबेरंगी कमानीने सजलेली ही 'झी जयपुर लिट-फेस्टची' जागतिक साहित्य नगरी. कुठेही राजकीय रंग नाही पण अयोग्य राजकारणावर साहित्यिकांनी घेतली ठोस नि ठाम भूमिका! विदेशींनीही त्यांच्या अनुभवातील दडपशाहीतील साहित्याची चर्चा केली. 'झी'ची ह्यात प्रमुख भूमिका, त्यांच्या छोट्या तंबूत टॉलस्टॉय, डोस्कोव्हस्की, मंटो, सुधा मूर्ती, शशी थरूर, पीको अय्यर, एमी टॅन, तसेच नवोदितांची पुस्तकं वाचायला उपलब्ध होती. तुम्ही त्या पाच दिवसात तिथे बसून वाचू शकत होतात अन् शेवटच्या दिवशी तुम्हाला हवे ते एक पुस्तक तुम्ही घरीही नेऊ शकत होतात.



**जयपुरचा डिग्गी पॅलेसचा परिसर सजला होता.**

एक वेगळा महत्त्वाचा विभाग 'राऊंडटेबल चर्चा' ह्यात प्रकाशन व्यवसायातील प्रकाशक, मुद्रक, चित्रकार, वितरक, विक्रेते, अनुवादक, साहित्याचे एजंट (ही जमात इंग्रजी पुस्तकांच्या जगात रुजत आहे) यांची विविध विषयांवर चर्चा आणि संवाद. प्रकाशकांच्या खेरीज पुस्तक व्यवहार शक्य नाहीय. त्यांच्यात चर्चा होणं गरजेचं, त्यांच्या अडचणींचा निचरा होणं गरजेचं. त्याचाही वेगळ्या स्वतंत्र विभागात, जगभरातील प्रकाशक, मुद्रक, चित्रकार, अनुवादक वितरक यांच्यात मुक्त संवाद सुरू होता. पुस्तक प्रकाशनाचे, पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाचे समारंभ होत होते. लेखकांच्या सह्या घ्यायचे कामही जोरात.

हमीद करझाई, मुहंमद युनुस. मीरा नायर, झाकीर हुसेन, किरण नगरकर, सुधा मूर्ती, गुरुविंदर कौर, अमीश त्रिपाठी, नयनतारा




**अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई यांची मुलाखत घेतली विल्यम डारलींपल यांनी**

सहगल, उर्वशी बुटालिया, विवेक शानभाग, विशाल भारद्वाज, नंदिता दास, नवाजुद्दीन सिद्दीकी, अशोक बाजपेयी, विनोद दुआ, वीर संघवी, शोभा डे, नमिता गोखले (ह्या फेस्टिव्हलच्या संस्थापक, आयोजक), वीर संघवी, रुपी कौर तसेच पाकिस्तान, रशिया, आफ्रिका, चीन, सिरिया, इजिप्त, लॅटिन, अमेरिकन देश, युरोपातील अनेक देशातील तसेच अमेरिका, जपान कोरिया,अफगाणिस्तान येथून साहित्यिक आलेले होते. इंग्रजी साहित्याच्या जाणकार वाचकांना ज्ञात-अज्ञात असलेली मंडळी उपस्थित होती. प्रत्येक चर्चासत्र एक तासाचे होते. पाच मिनिटांच्या मध्यंतरानंतर वाचकांना इतरत्र जायला वेळ असे नि लगेच पुढचे सत्र सुरू होई. तरुण वाचक प्रश्नही थेट विचारत होते, त्यावरून ते तयारी करून आल्याचे जाणवत होते.

ह्या उत्सवासाठी ठेवलेले विषय विचारांना चालना देणारे असे होते. त्यासाठी जगभरातून जमलेले विचारवंत, लेखक, कवी, पत्रकार आपापल्या देशातील स्थिती त्यातील त्यांचे जीवन- संघर्ष, व्यक्तिगत विचार मांडत होते. इथे राजकारणी वा राजकारण वर्ज्य होते का? एका परीने व्यासपीठावर हारतुरे 'हांजी हांजी' असे हे वागणे नव्हते. राजकारणी होते ते केवळ आपापल्या पुस्तकाविषयीच्या चर्चेत. प्रत्येकाचे स्वदेशातील समस्यांवर बोलणे वा न बोलणे हाही एक राजकारणाचाच भाग असतो. ज्या काळात अस्मिता फार नाजूक केल्या गेल्या आहेत अशा काळात असा उत्सव करणे नि सर्वांनी आपली मतं कुठलेही दडपण न बाळगता मांडणे महत्त्वाचे आहे. विचारांच्या भिंती पडल्या तरच खुली हवा सर्वत्र खेळेल, जी देशाच्या, नागरिकांच्या आरोग्यासाठी, प्रजासत्ताकाच्या दृढतेसाठी आवश्यक आहे. हा संदेश लेखनाने सर्वांपर्यंत पोहोचवला तरच दुबळ्यालाही बळ येईल, पण मिंधेपणाने वागणाऱ्या माणसांनी हे धैर्य दाखवणे अवघडच असते. देशोदेशींच्या लेखकांनी जो माणूसपणा एवढंच मूल्य मानून पुढे जायचा मार्ग चोखाळलाय तो इतरांना बळ देणारा आहे. भारतातील १५ भाषांचे प्रतिनिधी, शब्दांची जादू अनुभवायला, अक्षरांचे सामर्थ्य आजमावायला जमलेला तारुण्याच्या सळसळत्या उत्साहाचा वाचक. थंडीच्या मौसमाने ढंगदार, फॅशनेबल पोषाखात देशीविदेशी वावरत होते.

देशातील इतर साहित्यसंमेलने तरुणांना आकर्षित कसं करावं ह्या चिंतेत असताना ह्या वाढत्या तरुण समंजस गर्दीचं रहस्य आपल्या आयोजकांनी जाणून घेतलं पाहिजे. संवाद नि चर्चा, कल्पना नि स्वप्न ह्यांचा संगम असणारे साहित्यजगत! स्वत:ची कुवत नि ताकत जोखायला शिकवणारे जगभरच्या संघर्षात लोकांचे साद-पडसाद, आक्रोश नि लढे समजून घ्यायला हे इंग्रजी साहित्यसंमेलन योग्य व्यासपीठ आहे. ह्या संमेलनाचं वैशिष्ट्य होते ते विषयांच्या आणि सहभागी लेखनकर्मींच्या मोकळेपणात. उदाहरणार्थ- रेमनंटस ऑफ अ सेपरेसन, ट्रान्सलेटिंग हिस्टॉरिकल फिक्शन,द पॉलिटिक्स अँड पोएटिक्स ऑफ विमेन्स वर्क इन इडियाज नॉर्थ ईस्ट, प्रिझनर्स ऑफ कॉन्शस, ग्लोब टू ग्लोब- व्हाय हॅम्लेट वर्क्स इन एव्हरी कंट्री, अ टेल ऑफ टू कोर्ट्स तंजावूर अँड त्रावणकोर, फ्रॉम पीपल टु सिटिझन्स, फेमिनिन गेझ - विमेन रायटिंग मेमॉयर्स, वर्ड्स आर




**मंटोवरील सिनेमाच्या दिग्दिर्शिका नंदिता दास, अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी यांना बोलते केले विनोद दुआ यांनी....**

ऑल वी हॅव, ऑन लेनिन, रिव्हर ऑफ लाइफ, रिव्हर ऑफ डेथ, द रिटन वर्ल्ड, पॉवर टू शेप, पीपल्स हिस्ट्री, नॅरेटिव्ह ऑफ; लाइफ अँड लिव्हिंग, फिक्शनल लीप इत्यादी ४७५ वक्ते इथल्या व्यासपीठांवरून बोलले. आश्चर्यचकित व्हावे अशीच ही संख्या आहे. फ्रंट लॉन, चारबाग, बैठक, संवाद, दरबार हॉल, मुगल टेंट ह्या सहा मंडपातून माणसं बोलण्यात नि ऐकण्यात गर्क होती. ह्या खेरीज प्रकाशकांच्या चर्चा, भेटी वेगळ्या मंडपांतून 'जेबीएम हवेलीत' चालू होत्याच.

कुठला कार्यक्रम ऐकावा, कुठला सोडावा हा पेच होता. हाच विचार करून लोक खुर्ची सोडतच नव्हते. दुसऱ्या मंडपात ज्यांचे आपल्याला ऐकायचेय असे वक्ते असतील तर घालमेल होत होती. हे सारे पाहणे पुस्तकांच्या जगात वावरणाऱ्यांना खूप सुखद होते. त्यातल्या त्यात समाधान होते की ज्यांचे ऐकता आले नाही त्यांची सेशन्स लाइव्ह नेटवर अपलोड केली जात होती. त्यामुळे आपापल्या हॉटेलात वा निवासस्थानी बसून हुकलेली सेशन्स पाहता, ऐकता येत होती. काय हुकले त्याची जमा-वजा एकमेकांना ऐकवताना पाहून शब्दांचे गारुड विरलेले नाही याचीच साक्ष पटत होती.

सिनेमातील लोकांच्या कलाकृतींच्या निर्मितीप्रक्रियेबद्दल तरुणांना साहजिकच कुतूहल होते नि सर्वत्रच असते. त्यामुळे मीरा नायर, विशाल भारद्वाज, नंदिता दास, नवाजुद्दीन सिद्दीकी, सोहा अली-शर्मिला टागोर, संजना कपूर अशांच्या चर्चासत्रातही गर्दी नि कमालीची सुसूत्रता नि विषयभान राखले गेले होते. त्यांचे शेक्सपियरच्या कथांवरील सिनेमे, मंटोवरील चरित्रपट, कामसूत्र व इतर सिनेमाच्या वेळचे लिखित व चित्रितचे अनुभव वा त्यांचे नवे पुस्तकच चर्चिले जात होते. त्यामुळे प्रेक्षकांना वैयक्तिक बाबींच्या चौकशा करायला संधीच नव्हती. ज्या चर्चा मी केल्या त्यातील स्त्रियांच्या सहभागाच्या चर्चा मला व्यक्तिश: आवडल्या. पुरुष साहित्यिकांचे अनुभव नि त्यांनी आपापल्या जगात घेतलेल्या भूमिका नक्कीच महत्त्वाच्या होत्या.

तिथे आलेल्या अनेक देशी विदशी स्टार्समध्ये शशी थरूर नक्कीच लक्षवेधी होते. त्यांनी सरळ-सरळ हिंदुत्ववाद्यांना शिंगावर घेतले. 'व्हाय आय एम हिंदू' ह्या त्यांच्या नव्या पुस्तकाबद्दलची भूमिका त्यांनी थेटपणे मांडली. अनेक आक्रमणं पचवून, सर्वांना सामावून घेत त्यांच्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात करत हा धर्म विशाल हृदयी झाला आहे. विद्वान स्त्रीपुरुषांच्या विचार मंथनातून तो विकसित झाला आहे. त्याला संकुचित करून विद्वेषावर उभा करणाऱ्यांचा हिंदू धर्म माझा नाही तर मी माझ्या वडिलांकडून नि भोवतालच्या सश्रद्ध लोकांच्या वागण्यातून मनावर बिंबलेला एक समंजस धर्म आचरत आहे, असे ते म्हणाले. घरच्या धार्मिक वातावरणाचा त्यांच्यावर खोल पगडा आहे. तत्त्वज्ञान, परंपरा यांचे सखोल ज्ञान त्यांना आहे हे त्यांच्या वक्तव्यातून लोकांच्या ध्यानात येत होते. तेथे जमलेला तरुण वर्ग ह्याच धर्माचा पुरस्कर्ता असावा असे त्यांच्या प्रतिक्रियांवरून जाणवत होते.

संजय राय यांनी नसरीन मुन्नी कबीर आणि झाकीर हुसेन यांना बोलतं केलं. नसरीनने अनेक कलाकारांवर लिहिलंय नि डॉक्युमेंटरीज केल्यात. नसरीनने झाकीर हुसेनवर लिहिलेल्या पुस्तकाच्या संबंधात हा संवाद होता. स्वत: झाकीर हुसेन हा हिंदू मुस्लिम ह्या गंगाजमनी तहजीबमध्ये वाढलाय. शिवाय विदेशी संगीतही त्याने आत्मसात केलंय. जन्मत:च वडिलांनी कानात देवाचे शब्द ऐकवण्या ऐवजी ताल नि नाद ऐकवला, तोच आमचा देव आहे. गणेश आणि सरस्वतीवंदना शिकणं ही सहज गोष्ट होती. इंग्रजी शाळेत ख्रिस्तीप्रभूची प्रार्थना असे नि अम्मीमुळे मदरशात अल्लाची इबादत शिकलो. संगीताखेरीज दुसरे जीवनच नसल्याने तेच अंगात घुमत असे. कधी कधी कलाकार चांगले वाद्य वा साज नाही म्हणून खट्टु होतात पण कला ही साजात नव्हे तर आपल्या अंगात, बोटात, रगारगात असावी लागते. त्यांनी एकदोन चित्रपटातही भूमिका केल्या आहेत. त्याचेही अनुभव त्यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत सांगितले. नसरीनचे अनुभवही रंजक होते, तिच्या म्हणण्याप्रमाणे अशा लिखाणात लिहिणारा जितका अदृश्य असेल तितका कलाकार अधिक ठळकपण समोर येतो.

'सलाम बॉम्बे', 'कामसूत्र'ची निर्माती, दिग्दर्शक मीरा नायर यांच्याशी संवाद साधला वीर सिंघवी यांनी. एका मध्यमवर्गीय सरकारी अधिकाऱ्याच्या घरची, ओरिसातील ही स्त्री. घरी वातावरण पैशाचे नव्हते पण भरपूर पुस्तकांचे मात्र होते.ओरिसातील परिसर हा समृद्ध सांस्कृतिक भारलेपणाचा होता. ती सामाजिकतेच्या जाणिवेतून डॉक्युमेंटरीज करीत होती. पण 'सलाम बॉम्बे' ह्या चित्रपटाने तिला जगप्रसिद्धी नि मानसन्मान दिले. अस्सल मुलांची ही कथा जगभरच्या लोकांना भावली. हा चित्रपट केला तेव्हा हॉटेलरुम घेण्याइतके पैसे नव्हते म्हणून एका वयस्क स्त्रीबरोबर रुम शेअर केली होती. फोन नंबरही तिचाच दिला होता. सिनेमा संपल्यावर २० मिनिटे लोकांनी स्टँडिंग ओव्हेशन दिले. ती परत खोलीवर आली तर त्या बाईंच्या फोनवर कौतुकाच्या फोन्सचा भडिमार झालेला होता. 'कामसूत्र' जयपुरलाच शूट केले होते. शूटींगच्या वेळी संसद सदस्य येऊन



**झाकीर हुसेनशी संवाद साधतांना संजय राय**

बसत हे पाहायला की ही काही अश्लील सिनेमा तर शूट करत नाहीय ना? माणसांचे वाचन नि लेखकाचा शब्द हा सिनेमा करताना महत्त्वाची सामुग्री असते असेही तिने नमूद केले.

पाहिलेल्या ऐकलेल्या सर्वच संवादातून वेगवेगळ्या देशातील समज गैरसमज, वांशिक भेदभाव, सामाजिक भेदभाव, राजकारण्यांचे हस्तक्षेप, साहित्यिकांनी दिलेला लढा यांची माहिती मिळत होती. ऐकलेल्या परिसंवादापैकी काहींचाच गोषवारा इथे देत आहे. आपल्या वाचकांना विषयांतील वैविध्य ध्यानी येईल. 'रेमनंटस ऑफ सेपरेशन' हा फाळणीच्या वेळी भारतात आलेल्यांच्या आठवणींविषयींचा संवाद होता. उर्वशी बुटालिया, चांद सूर, सुनीता कोहली आणि अंचल मलहोत्रा असा हा संवाद होता. चांद सूर ह्या ९२ वर्षांच्या तर अंचल मलहोत्रा विशीतली तर बाकी दोघी ७०च्या असा काळाचा विस्तार होता. अंचलचे पुस्तक फाळणीच्या वेळी घर सोडताना लोकांनी आठवण म्हणून काय आणलं, त्यातून काय स्मरतं असं होते. फारच अंतर्मुख करणाऱ्या मुलाखती तिने घेतल्या होत्या. त्या वस्तू, जसा एखादा कलथा असेल, पत्राचा तुकडा असेल वा झाडाचे पान असेल ज्याच्याशी त्या व्यक्तींचे भावनिक विश्व जुळले होतं. घर, गाव सोडताना त्यांना बरोबर काहीही घेऊ दिलं नव्हतं, अंगावरच्या कपड्यांनिशी घरं सोडली होती. जिवंत राहिलो हेच खूप होतं. जणू त्या लहानशा वस्तूंत त्यांनी गमावलेली मातृभूमी आणली होती. चांद सूर यांच्या बलुचिस्थानमधील फळांच्या चवीची दाट आठवण आहे. काही स्वाद, गंध, रंग यांच्याशी त्यांच्या किती तरी आठवणी जुळलेल्या आहेत. एक जाणवत होते की त्या महाभयंकर घटनेनंतर इथल्या वा तिथल्या कुणाच्याच मनात परस्पर समाजातील माणसांविषयी कटुता नाही. जेव्हा चांद सूर परत आपल्या घरी– लाहोरला गेल्या तेव्हा लक्ष्मी मॅन्शनमधील सध्याच्या लोकांनी त्यांचे स्वागत केले, आपुलकी दाखवली. उत्तरेतील लोकांमध्ये धार्मिक भेद नाही कारण त्यांची संस्कृती एक आहे. लखनौ असो वा लाहोर तिथली संस्कृती, खाणंपिणं, साहित्य त्यांना भावनात्मकता परस्परांना जोडून ठेवते. हे वास्तव भारतात इतरत्र जाणवणं शक्य नाही.

पीको अय्यर ह्या जपानचा नागरिक असलेल्या साहित्यिकाचे दिसणे, वागणे आणि संस्कार ह्यात जमीन अस्मानाचा फरक आहे. ब्रिटनमधील बालपण, आता अमेरिकेत स्थायिक. गुजराती आई नि तमिळ वडील, आता जपानी पत्नी यांमुळे त्यांचे गृहस्थजीवन वेगळच आकारले आहे. त्यांना जपानी संस्कृती खूप प्रिय आहे त्यामुळे त्यातील तत्त्वज्ञान, विचार यांचा त्यांच्या लेखनावर खूप खोल परिणाम आहे. खरंतर त्याचमुळे ते वाचकप्रियही आहेत. त्यांच्याच हस्ते साहित्यमहोत्सवाचे उद्घाटन झाले तेव्हा त्यांनी इंग्रजी लेखनाचे केंद्र एकेकाळी इंग्लंड होते नंतर न्यूयॉर्क आणि आता मुंबई होत आहे. लेखकाचे काम राजकारण, धर्म, वंश यामुळे तयार होणाऱ्या सीमा बुजवून एक खुले सीमाहीन जग निर्माण करणं हे आहे. साहित्यिक जगाचे प्रश्न सोडवू शकतील का? माहीत नाही, पण योग्य मनोभूमी तयार करणं शक्य आहे. हे आपल्या हाती आहे. जेव्हा-जेव्हा अभिव्यक्तीवर बंधनं येतात तेव्हाच मनातले अभिव्यक्त करायची ऊर्मी सृजनशीलांना येते. हे जगाचा इतिहास सांगतोय हे त्यांचे प्रतिपादन पटत होते.

व्यासपीठांवर तरुण साहित्यिकांनाही वाव होता. त्यांची स्वप्नं, अडचणी, त्यांचा संघर्ष यांना एक सुजाण नि सुसंस्कृत अवकाश मिळत होता. उत्तरपूर्वेतील राज्यांतील लेखिका, धर्मांध वातावरणात आपली चूक-बरोबर मतं मांडण्यातल्या समस्या, तरुण-तरुणींना प्रेम व्यक्त करण्यातही येणारे अडथळे, त्यांचे अक्षरांतून व्यक्त होणे महत्त्वाचे होते. सर्वामध्ये मोकळपणाने बोलता येणं, मिसळता येणं हे विदेशी लेखकांना भारून टाकत होतं. रुपी कौरच्या छोट्या कविता, गुरमित कौरचे समाजाला ठणकावून सांगणे की 'पाकिस्तानने नव्हे तर युद्धाने माझ्या वडिलांना मारलंय' त्यानंतर तिला ज्या सामाजिक रोषाला तोंड द्यावं लागलंय ते तरुणांच्या सच्च्या भावना दर्शवत होतं. रुपी कौरचं म्हणणं की, 'माझा देह हा त्यांचा पलंग नाहीय!' हे सुस्त समाजाला खाड्कन जागं करत होतं. कॅनडाची रहिवासी असणारी रुपी ही कवयित्री, चित्रकार, लेखिका, नाट्य सादरीकरण करणारी पंजाबी मूळ असलेली तरुणी आहे. तिची 'मिल्क अँड हनी', 'द सन अँड हर फ्लावर' ही पुस्तके बऱ्याच जणांनी वाचलेली असावीत. स्त्रीला जे सोसावे लागते त्याची वेदना, असहायता आणि तिची ताकद कवितांतून व्यक्त होते. श्रोत्यातील अनेकांचे डोळे तिच्या कवितांनी पाणावले होते.

अनेक पुस्तकांची प्रकाशनं तिथे होत होती. 'पद्मावत' हे मृदुला बेहरी यांचे पुस्तक प्रकाशित होताना मृदुला म्हणाल्या, राणी पद्मिनीबद्दल कथा दंतकथा फार पूर्वीपासून आहेत. जायसी ह्या कवीने प्रथम तिच्याविषयी लिहिले होते. त्यानंतर जेम्स टॉडने लिहिले अनेक फारसी आणि राजस्थानी लेखनात तिचा उल्लेख आहे, १२ वे शतक, १५वे शतक, १७ वे शतक आणि आज असा ह्या कथेचा प्रवास झाला आहे.

प्रकाशकांच्या कक्षातही खूप गहनचर्चा होत होत्या. हा सारा व्यवहार, प्रसार, देखणेपणा ह्या घटकाखेरीज शक्य नाही. याची बूज राखून झी-जयपुर फेस्टिवलने अनेक बाबींवर चर्चा केली, उपाय सुचवले ह्यातही देशी-विदशी प्रकाशनांनी आपली मते, अडचणी, उपाय सुचवले. सर्वत्र उत्साह हेच सूत्र होते. सरस्वतीचा संसार वैभवशाली असू शकतो नि आहे ह्याचाच प्रत्यय हरक्षणी येत होता.

**(लेखातील प्रकाशचित्रं –स्वाती दात्ये)**


(ज्येष्ठ पत्रकार आणि लेखिका)

**– संजीवनी खेर**
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२
sanjeevanikher@gmail.com

# स्माइल अॅट वर्क

दीपक घारे

शि. द. फडणीस आणि वसंत सरवटे ह्यांनी सामाजिक, सांस्कृतिक विषयांवरची हास्यचित्रं काढून व्यंगचित्रकलेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. पण तरीही एका विशिष्ट क्षेत्राशी निगडित असलेली व्यंगचित्रं अथवा व्यंगचित्रमालिका मराठीत अजूनही कमीच आहेत. या पार्श्वभूमीवर माणिक खेर यांचं 'स्माइल अॅट वर्क' हे ई-पुस्तक जरुर बघण्यासारखं आहे.




**म**राठीत व्यंगचित्रं मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत असली तरी त्यात राजकीय व्यंगचित्रांचं प्रमाण अधिक असतं. शि. द. फडणीस आणि वसंत सरवटे ह्यांनी सामाजिक, सांस्कृतिक विषयांवरची हास्यचित्रं काढून व्यंगचित्रकलेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं, पण तरीही एका विशिष्ट क्षेत्राशी निगडित असलेली व्यंगचित्रं अथवा व्यंगचित्रमालिका मराठीत अजूनही कमीच आहेत. या पार्श्वभूमीवर माणिक खेर यांचं 'स्माइल अॅट वर्क' हे ई-पुस्तक जरूर बघण्यासारखं आहे. औद्योगिक समाजशास्त्र (इंडस्ट्रियल सोशिऑलॉजी) या विषयातल्या त्या तज्ज्ञ आहेत आणि व्यवस्थापन, कार्यसंस्कृती (वर्क कल्चर), बदलतं तंत्रज्ञान यावर त्यांनी इंग्रजी-मराठीतून ग्रंथलेखन केलेलं आहे. उद्योगजगतातील स्पर्धा, सीईओ, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांची मानसिकता, त्यातील विसंगतींचा हलक्याफुलक्या विनोदाच्या आधारे माणिक खेर यांनी घेतलेला वेध रंजक आणि त्यामागच्या सूचक भाष्यामुळे उद्बोधकही झालेला आहे.


'ऑफिसात काम करणाऱ्या एका माणसाचा दिवस', अशी या पुस्तकाची रचना आहे. घरी-दारी, ऑफिसमध्ये, लंच टाइममध्ये जे काही कानी पडतं त्याचं खुमासदार दर्शन यात आहे. दोन अथवा तीन पात्रांच्या संवादातून तसेच दोन-तीन चित्रांच्या मालिकेतून हा संवाद साकारला जातो. मूळ संभाषणाला व्यंगचित्रांच्या माध्यमातून दृश्यरूप दिलेलं आहे ते शिरीष मुळ्ये ह्यांनी. अशा चित्रांमध्ये मोजक्या रेषांमध्ये वातावरणनिर्मिती करणं आणि चित्रमालिकेमध्ये नेहमी येणाऱ्या पात्रांना किंवा व्यक्तिरेखांना दृश्य ओळख देणं कौशल्याचं काम असतं. मुळ्ये ह्यांनी ऑफिसचे मोजके तपशील दाखवून, व्यक्तिरेखांच्या हावभावातून आणि देहबोलीतून जिवंतपणा आणलेला आहे. ही चित्रशैली सुबक नसली तरी ती भावदर्शक (expressive) आहे.

माणिक खेर यांच्या या व्यंगचित्रमालिकांमधून जी कार्यसंस्कृती व्यक्त होते त्यामध्ये काही नेहमीच्याच मूलभूत मानवी प्रवृत्ती आहेत. नवे सिद्धांत आहेत. बदलत्या तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेल्या, मानवी स्वभाव आणि कार्यपद्धतीचं आधुनिकीकरण यांच्यातल्या नव्या विसंगती आहेत. व्यवस्था आणि व्यवस्थापन बदललं तरी त्यातून पळवाट काढण्याची प्रवृत्ती कशी कायम राहते, कामातली ढिलाई, अव्यवस्था यांनाही तात्त्विक आणि सैद्धांतिक मुलामा कसा हुशारीने दिला जातो याचीही उदाहरणे इथे आलेली आहेत.

या चित्रांमधला कर्मचारी, मग तो एखादा ऑफिसर असो वा

एखादी सेक्रेटरी अथवा क्लार्क यांना नेहमीप्रमाणेच गॉसिप करायला आवडतं. छोट्या मोठ्या सवलती हव्या असतात. बॉसचं टेन्शन नको असतं. बॉसची गैरहजेरी स्टाफला आनंदाची पर्वणी असते. सोमवारी कामावर आलं की रविवारचा आळस अजून पुरता गेलेला नसतो. माणिक खेर यांनी हे कर्मचाऱ्यांचं मनोविश्व व्यंगचित्रांमधल्या संवादांमधून अचूक पकडलं आहे. बायोमेट्रिक ॲटेंडन्सच्या संदर्भात एक स्त्री कर्मचारी दुकानदाराला विचारते, ''उद्याची हजेरी आज नोंदवणारं मशीन आहे का?'' दुसऱ्या एका चित्रात एक मजेदार निरीक्षण येतं, ''जोडून सुट्या आल्या की डेंग्यूचं प्रमाण वाढतं.''

बॉसची कर्मचारी वर्गातली ही प्रतिमा ही बहुधा नकारात्मक असते. तर बॉसची स्वत:ची धडपड आपण एक अत्यंत बिझी, एफिशिअंट आणि नैतिकता पाळणारे आहोत अशी आभासी प्रतिमा









निर्माण करण्याची असते! भेटायला आलेल्याला निष्कारण बसवून ठेवणं, समोरच्याशी बोलण्याऐवजी सतत मोबाईलवर बोलत राहणं, कुणालाही न दुखावता पॉप्युलर राहणं अशा काही युक्त्या या व्यंगचित्रांमधून आलेल्या आहेत.

नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या बॉसला त्याच्या सहकाऱ्याने मारलेला टोमणा असाच मार्मिक आहे. ''नोकरीला लागताना सगळेच चांगले असतात, खुर्चीत बसले की बिघडतात.'' युनियन लीडरच्या उपद्रव मूल्यामुळे त्याला मिळणारा मानसन्मान हा देखील काही चित्रांमध्ये विनोदाचा विषय झालेला आहे. एच आर मॅनेजर हा अलिकडच्या काळातला नवा अधिकारी. त्याचा दुतोंडी स्वभाव त्याच्या जॉब प्रोफाइलला कसा पूरक आहे तेही काही चित्रांमधून मिश्किलपणे सांगितलेलं आहे.

या पुस्तकातला सर्वात मार्मिक विनोद आहे तो गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा. एका व्यंगचित्रात हे निरीक्षण येतं ते असं, ''न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत फक्त दोन ठिकाणी लागू पडत नाही. अवकाशात किंवा सरकारी कार्यालयात. अवकाशात वस्तू फिरताना दिसतात तरी पण कार्यालयात तुमच्या फायली गायबच होतात!''

माणिक खेर आणि शिरीष मुळ्ये यांनी आजच्या भारतीय कार्यसंस्कृतीचं स्मितरेषा उमटवणारं आणि अंतर्मुख करणारं असं चित्र रेखाटलं आहे. आपल्याकडे आर.के. लक्ष्मण यांची व्यंगचित्रं किंवा परदेशातल्या स्कॉट ॲडम्सची 'डिल्बर्ट' व्यंगचित्रमालिका खूप लोकप्रिय आहेत. 'स्माइल ॲट वर्क' बघताना डिल्बर्टच्या 'काफ्काएस्क् ब्यूरॉक्रसी'ची, काफ्काच्या साहित्यातील अतिवास्तव वातावरणाची आठवण होते.

'Smile at Work' हे पुस्तक ई-बुक म्हणून इंग्रजीत प्रकाशित झालेलं आहे. त्याचा मराठी अनुवाद 'कामाचा हसरा दिवस' या नावाने प्रकाशित व्हायचा आहे. त्यातील ही काही निवडक व्यंगचित्रे.

(ज्येष्ठ कला-साहित्य समीक्षक आणि लेखक)

**– दीपक घारे**
भ्रमणध्वनी : ९१६७७६४३२८
gharedeepak@rediffmail.com

**ग्रंथाली**



## दृष्टिकोन

**दिप्ती वारंगे**

**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत ११० रुपये**

या सर्व कथांमधील एक जाणवलेलं वैशिष्ट्य असं की त्या निराशेकडे, हतबलतेकडे जाणाऱ्या नाहीत. एकट्या घरी जाणाऱ्या मुलीला सोबत करू इच्छिणारा तरुण सद्हेतूने तसे करू इच्छित असेल-तसा त्याचा दृष्टिकोन असू शकतो. 'डबा' कथेमध्ये एका सुखवस्तू मुलीला अखेर अन्नाची किंमत कळतेच. 'पूर्वज' कथेत अंधश्रद्धेचा आधार घेतला तरी दादांचा मूळ उद्देश लोकांनी गाव सोडून जाऊ नये, माणसं जोडलेली रहावीत, हा असतो. 'एकुलता एक'मध्ये नात्यांची गुंतागुंत, त्या मधल्या अपेक्षांचं ओझं हे जाणवून दिल्यावरही ही नाती शेवटी आधार देतात, असेही दाखवले आहे. दिप्ती वारंगे यांच्या कथालेखनात थोडा नवखेपणा जाणवला, तरी नव्या प्रतिभेचे आश्वासनही दिसते. कथा या साहित्य प्रकाराचे भान दिसते.

**– उषा तांबे**



## अमेरिका : खट्टी-मिठी

**डॉ. मृण्मयी भजक**

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १३० रु.**

डॉ. मृण्मयी भजक या व्यवसायाने डॉक्टर आहेत आणि वृत्तीने संवेदनशील पत्रकार; त्याला जीवनातील सुंदरता पहाणाऱ्या ललितदृष्टीची जोड आहे. म्हणूनच प्रस्तुत लेखसंग्रह हा एकाच वेळी माहितीपर व त्याचवेळी ललित झाला आहे. उत्सुक दृष्टीची उत्स्फूर्तता या लेखनात आहे. त्याप्रमाणे अकारण समर्थन करणारी सम्यक अलिप्तताही त्यांच्या लेखनात आहे. भारतीय मनाच्या संवेदनेनं अमेरिका टिपणाऱ्या लेखिकेनं वाचकाला असं व इतकं अंतर्मुख करणं हेच या लेखनाचं श्रेय आहे असं मला वाटतं.

**– मधु मंगेश कर्णिक**

# आर्थिक विषमता व विकास

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**ग**रिबी हा मानवाला लागलेला एक असाध्य रोग आहे. तो सर्व जगभर सापडतो. आपण ईश्वरासमोर सगळे सारखे. कायद्यासमोर समान, पण प्रत्यक्ष जीवनात विषम का असा प्रश्न उद्भवणं साहजिक आहे. एकीकडे मुकेश अंबानीचा १.२ अब्ज डॉलरचा जगात सर्वात महाग महाल तर दुसरीकडे अमानवी स्थितीत रहाणारे झोपडपट्टीवासी. ही विषमता बघून भारत आर्थिक तफावतीची राजधानी आहे असं सकृतदर्शनी सर्वांना वाटतं, पण ते खरं नाही. याबाबतीत साम्यवादी चीन व भांडवलशाहीवादी अमेरिका आपल्या पुढे आहेत.

आर्थिक विषमता मोजण्यासाठी अर्थतज्ज्ञांनी जिनी कोइफिशियंट (Gini Coefficient) नावाचा एक निर्देशांक शोधून काढला. त्यामुळे प्रत्येक देशातली आर्थिक विषमता समान मोजपट्टी वापरून मोजणं शक्य झालं. हा निर्देशांक भारतापेक्षा चीनमध्ये व अमेरिकेत जास्त विषमता आहे असं सांगतो. काही वर्षांपूर्वी तो अमेरिकेत ४५ टक्के तर चीनमध्ये ४७.४ टक्के होता. तुलनेनं भारतात तो ३६.८ टक्के असे. हा निर्देशांक जेवढा कमी तेवढी आर्थिक समता जास्त. आपला देश गरीब म्हणून आपल्या सम ाजवादी धोरणानं दारिद्र्याची समान वाटणी केली असंच म्हणावं लागेल.

हेच दुसऱ्या एका निर्देशांकावरून सिद्ध होतं. देशातल्या १० टक्के उच्चभ्रू व १० टक्के नीचतम उत्पन्न असलेल्या गटांचं गुणोत्तर लक्षात घेतलं तर काय आढळतं? हे गुणोत्तर आपल्या देशात ८.६ तर अमेरिकेत १५.९ व चीनमध्ये २१.६ टक्के आहे. म्हणजे अतिश्रीमंत व अतिगरीब यांच्यात सापडणारी तफावत भारतात अमेरिकेपेक्षा किंवा चीनपेक्षा कितीतरी कमी आहे. तरीही आपण त्या लोकांपेक्षा जास्त अश्रू का ढाळतो? अमेरिकेत तर श्रीमंत व गरीब यामधील आर्थिक दरी अजूनच वाढली. २०१३ मध्ये ३ टक्के अतिश्रीमंत लोकांच्या खिशात राष्ट्रीय उत्पन्नाचा ३०.५% पडतो असं आढळून आलं, पण मॅकडोनाल्डमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं उत्पन्न मात्र कमी झालं. या महासत्ताक देशात अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात असल्या तरी असं आर्थिक ध्रुवीकरण झालं म्हणून सत्ताकर्ते बुचकळ्यात पडले. पण हे काही नवीन नाही.

रंकापेक्षा राजे, प्रजेपेक्षा बादशहा आणि हल्लीच्या काळात जनतेपेक्षा मंत्री नेहमीच श्रीमंत असतात. मग त्याविषयी ऊर बडवण्यात काय अर्थ? याचं एक कारण असं की देशातील संपत्ती किंवा उत्पन्न जेव्हा काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित होते तेव्हा राजकीय अस्थैर्य निर्माण होतं. हल्ली अमेरिकेत मॅकडॉनल्ड किंवा तत्सम उपहारगृहात अकुशल काम करणाऱ्या मजुरांनी पगार वाढवा म्हणून मोर्चे काढले. सध्या नीचतम केंद्रीय वेतन ताशी ७.२५ डॉलर आहे. ते १५ डॉलर करा अशी या संपकऱ्यांची मागणी आहे. असं केलं तर आम्हाला दाराला कुलुकप लावावं लागेल असं आस्थापन मालक म्हणतात. हा कलह लक्षात घेऊन डेमॉक्रॅट पक्षाच्या राजकारण्यांनी आपले घोडे मजुरांच्या गाडीला जुंपले. २०१४ व २०१६च्या राष्ट्रीय निवडणुकीत आर्थिक विषमता हा विषय ऐरणीवर ठेवण्याचं जाहीर केलं.



**भारतात आर्थिक विषमता चीन किंवा अमेरिकेपेक्षा कमी आहे.**

नवलाची गोष्ट म्हणजे मानवाला लागलेल्या वेश्यागिरीच्या शापाप्रमाणे आर्थिक विषमता हा दुर्गुणही नष्ट करण्याचा मंत्र कुणी शोधून काढला नाही. आर्थिक समता निर्माण करण्यासाठी कार्ल मार्क्सनं १८६७ साली साम्यवाद जगासमोर मांडला. सोव्हिएट युनियन व चीननं तो स्वीकारला. पण युरोप व भारतासारख्या देशांनी साम्यवादाचा सौम्य अवतार की जो समाजवाद म्हणून ओळखला जातो, देशात आणला. एकटी अमेरिका त्यापासून अलिप्त राहिली. तिनं भांडवलशाहीला पुजलं.

याच्या परिणतीवस्थेत काय आढळतं? कुठलीच राज्यप्रणाली आर्थिक विषमतेचं निर्मूलन करू शकली नाही. साम्यवादात माणसाच्या उपजत सर्जकतेला सोडचिठ्ठी देण्यात येत असल्यामुळे अर्थनिर्मिती कमी होते आणि दारिद्र्याची समान विभागणी होते. म्हणून सोव्हिएट युनियनचा महासत्ताक राष्ट्राचा डोलारा कोसळून पडून त्या देशाचं विघटन झालं. चीननं लोकांच्या अभिव्यक्तीला मुसक्या बांधून जुलुमशाहीला गादीवर ठेवण्यासाठी साम्यवाद कवटाळला, पण अर्थकारणाच्या बाबतीत भांडवलशाही पत्करली हे विशेष. आज अमेरिकेपेक्षा चीनमध्ये जास्त बाजारपेठीय अर्थकारण आढळतं.

समाजवादी धोरणामुळे युरोप किंवा भारतात आर्थिक विषमता कमी झाली नाही. गरिबांचं राहणीमान वाढवण्यासाठी या देशांनी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यासाठी लागणारा पैसा समाजातल्या उत्पादक घटकांवर अतिरिक्त कर लावून उभारला. पण तो कमी पडल्यामुळे भरमसाट कर्ज काढलं. ते त्यांचं पानिपत ठरलं. आजही युरोपमधील मुख्य देशांचा (स्पेन, फ्रान्स, इटली, ग्रेट ब्रिटन) वाढदर फार रोडावलेला आहे. भारताचं चित्र यापेक्षा फार निराळं नाही. एकेकाळचा ८-९ टक्के वाढदर २०१८ मध्ये ६.२ टक्के असणार असं म्हणतात. २०१४ मध्ये आपण प्रथमच उजवं सरकार निवडून दिलं. त्यामुळे समाजवादी धोरणाला बाजूला ठेवून परदेशी गुंतवणुकीसाठी दारं खुली करण्यात आली आहेत. आता अर्थकारणाचा दर वर जाईल अशी आशा, पण तसं झालं नाही. आर्थिक विषमता मात्र वाढली. याचं कारण तिचं निर्मूलन करणं म्हणजे मृगजळाचा पाठलाग करण्यासारखं आहे.

ओबामांनी हारवर्ड विद्यापीठाचे एकेकाळचे अध्यक्ष व डावे अर्थतज्ज्ञ म्हणून नाव कमावलेले लॅरी समर्स यांना आर्थिक सल्लागार म्हणून नेमलं. त्यांच्या डाव्या धोरणामुळे अमेरिकेच्या अर्थकारणाची २.५ टक्क्यांनी वाढ होताना दमछाक झाली म्हणून यापेक्षा ती कधीच जास्त होणार नाही असं त्यांचं मत आहे. याचं कारण रचनात्मक मर्यादा व घटती लोकसंख्या. याप्रमाणे त्यांनी आपल्या अपयशाचं उदात्तीकरण केलं, पण ट्रंपने पुस्तकी ज्ञानाऐवजी व्यवहारज्ञान असलेले उजवे गॅरी कोहन व नंतर पॉवेल यांना नेमलं आणि अर्थकारणाला उभारी आली. बेरोजगारी घटली आणि मजुरांची वानवा भासू लागली. त्यामुळे गेल्या १०-१२ वर्षात त्यांना प्रथमच पगारवाढ मिळाली. केंद्रीय किमान वेतन तासाला ७.२५ डॉलर (४७५ रुपये) असूनही वॉलमार्टनं व अनेक इतर उद्योगांनी ते ११ डॉलर (७२५ रुपये) वर नेलं. मोदींनी याप्रमाणे उद्योग जगात मुरलेले सल्लागार नेमले नाहीत हे दुर्दैव.

क्षितिजावर सध्या जी वादळं दिसताहेत त्यामुळे विकास व वाढदर खुंटणार अशी चिन्हं दिसताहेत. तेलाचे भाव वाढले आहेत. त्यामुळे परदेशी चलनाच्या गंगाजळीवर बोजा वाढणार. २०१५-२०१६ मध्ये भारतानं खनिज तेलाच्या आयातीवर ६४ अब्ज डॉलर खर्च केले होते. आता त्यासाठी जास्त भुर्दंड बसणार. दुसरं म्हणजे २०१८ मध्ये अमेरिकेची मध्यवर्ती बँक (Federal Reserve) व्याजाचे दर निदान तीनदा वाढवणार असं म्हणतात. म्हणजे भारतातही ते वर जाणार हे ओघानं आलंच.

**विकासातल्या अडचणी**

अर्थवाढ मंदावणं हे भारतासाठी चांगलं चिन्ह समजण्यात येत नाही कारण आपली लोकसंख्या सारखी वाढत आहे. दर महिन्याला १० लाख नवीन मजूर नोकऱ्यांच्या शोधार्थ बाजारपेठेत शिरतात. एवढ्या नोकऱ्या अमेरिकेची जगातली सर्वात मोठी अर्थव्यवस्था (१८ ट्रिलियन डॉलर) निर्माण करू शकत नाही. मग आपली २ ट्रिलियन डॉलरवाल्यांची काय बिशाद आहे? ट्रंपने एका वर्षाच्या कारकिर्दीत २० लाख नोकऱ्या पैदा करून विक्रम केला. आपल्या अर्थकारणानं त्या काळात १ लाख नवीन रोजगारनिर्मिती देखील केली नाही. हा मजूरवर्ग बव्हंशी अकुशल व अल्पशिक्षित. अनेकांनी शालेय शिक्षण देखील पूर्ण न केलेलं. या कच्च्या मनुष्यबळाचा देशाला फार फायदा होत नाही. अधिकांश शेतीवर काम करतं. शहरातले बेकार बेरोजगार कुठली तरी लहानमोठी कामं करून कुटुंबाला आधार देतात नाही तर आंदोलन करतात.

रोजगारनिर्मिती हा भारतासमोरचा एक मोठा संकटमय प्रश्न आहे. मोदींनी अशा वर्गाला कौशल्यशिक्षण देऊन उत्पादक करण्यासाठी देशात ठिकठिकाणी कौशल्यशिक्षण केंद्र उघडलीत. पण तो प्रकल्प यशस्वी झाला नाही. म्हणून त्यांनी कधी नव्हे ते केलं. त्या मंत्र्याला डच्चू दिला. तसंच त्यांनी नोकरशहांचंही करायला पाहिजे. बौद्धिक वार्धक्य आलेले अनेक केवळ नोकरीच्या ज्येष्ठत्वामुळे पदोन्नती मिळत गेलेले बाबू काम करतात. त्यांचं वैशिष्ट्य म्हणजे एकतर कुठल्याही प्रश्नाकडे एकात्म दृष्टीनं न बघता कप्पेबंद पद्धतीनं (Silo) बघणं नाहीतर आपला अधिकारकक्ष विस्तारित करणं. हे जुनं लाकूड छाटल्यावरच नवीन फांद्या फुटतील. त्यांच्या जागी नवीन दमाचे, नवीन विचारांचे आणि भविष्यलक्ष्यी बाबू नेमण्याची जरुरी आहे असं कुणीही म्हणेल. हा नोकरशाहीचा वृक्ष त्यांनी मुळासकट हलवल्याशिवाय किडलेली फळं खाली पडणार नाही व नवीन बहर येणार नाही.

**आर्थिक मंडळ**

अडचणीत सापडल्यावर मोदींनी आर्थिक सल्लागार मंडळ नेमलं. त्याचा मुख्य (किबेक डिब्रॉय) व सगळे सभासद विद्यापीठातले. म्हणजे त्यांचं पुस्तकी ज्ञान जरी दांडगं असलं तरी

व्यावहारिक चातुर्य मर्यादितच. त्यामुळे सरकारी नियमांचा उद्योगांवर काय परिणाम होतो तो त्यांनी प्रत्यक्षात कधी बघितला नसतो. त्यांनी एकही नोकरी पैदा केलेली नाही किंवा कुणाला स्वत:च्या खिशातून पगार दिलेला नाही. मग त्यांचं हस्तिदंती मनोऱ्यातलं ज्ञान काय कामाचं? त्यांच्याऐवजी मोदींनी औद्योगिक जगातले काही अर्थवंत सल्लागार म्हणून नेमले असते तर कितीतरी फायदा झाला असता. अशा तज्ज्ञांचा भारतात तोटा नाही. टाटा, इंफोसिस, रिलायन्स, टीसीएस (TCS) यासारख्या जागतिक पातळीवरील नानाविध कंपन्या भारतात असून तिथे अर्थतज्ज्ञ काम करतात. पुस्तकी ज्ञानापेक्षा त्यांचं औद्योगिक जगातलं आर्थिक ज्ञान जास्त उपयोगी ठरलं असतं. तसंच त्यांनी परदेशातून अर्थशास्त्राचे प्राध्यापक सल्लागार म्हणून आयात करणं बंद केलं पाहिजे. सध्या अरविंद सुब्रमण्यम व निती आयोगातून नुकतेच निवृत्त झालेले अरविंद पनागरिया हे अमेरिकेत ज्या हस्तिदंती मनोऱ्यात काम करतात ते भारतापेक्षा अंमळ श्रेष्ठ असेलही, पण त्यांनाही कुठलंच व्यवहारी ज्ञान नाही. त्यांनीही कुठल्याच प्रकारची रोजगारनिर्मिती केलेली नाही.

यासाठी त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंपकडून धडा शिकायला पाहिजे. त्यांनी आर्थिक सल्लागार म्हणून गेरी कोहन (Gary Cohn) व मध्यवर्ती बँकेचे नवीन चेअरमन जेरोम पॉवेल (Jerome Powell) नेमले. या दोघांनीही पुस्तकं लिहिण्याऐवजी औद्योगिक जगात काम केलं होतं. कोहन गोल्डमन सॅक्स या नामवंत वित्त कंपनीचे अध्यक्ष तर पॉवेल इनव्हेस्टमेंट बँकर होते. यापासून आपण बरंच शिकू शकतो. कसंही करून मोदींनी आपल्या स्थितीगत, काष्ठवत् व शिलाभूत नोकरशाहीला मुळापासून हलवलं पाहिजे. या बाबतीत सुरुवातीला त्यांनी काही प्रयत्न केले पण ते अपुरे पडले.

याचा परिणाम भारतात होणाऱ्या परदेशी गुंतवणुकीवर होणार. जानेवारी २०१८ मध्ये डावोस, स्वित्झर्लंड येथे संपन्न झालेल्या ४८व्या जागतिक आर्थिक परिषदेत मोदींनी परदेशी गुंतवणूकदारानं भारतात भांडवल गुंतवा म्हणून आव्हान दिलं. लालफितीऐवजी लाल गालिचा तुमचं स्वागत करेल या आश्वासनानं ते हुरळून जातील का हा प्रश्न आहे कारण अमेरिकेत भांडवलावर वाढत्या व्याजदरामुळे जास्त परतावा मिळत असेल तर ते भारतासारख्या दूरस्थ ठिकाणी गुंतवण्याचा धोका कशाला पत्करतील?

ट्रंपनी अमेरिकन कंपन्यांच्या उत्पन्न करात लक्षणीय कपात केली. ते दर जगात सर्वाधिक असत, पण आता ३५ टक्केवरून २१ टक्केवर आले आणि अमेरिकन अर्थकारणाला उत्तेजन मिळालं. त्यामुळे अनेक युरोपीय देश काळजीत पडले कारण तिथले दर काही अपवाद सोडले तर अमेरिकेपेक्षा जास्त आहेत. आपलेही तसेच आहेत. परदेशी कंपन्यांना आपल्या देशात ४० टक्के उत्पन्न कर आणि २ टक्के शैक्षणिक कृषी व आरोग्य अधिभार (cess) भरावा लागतो. म्हणजे भारतात अमेरिकेपेक्षा दुप्पट उत्पन्न कर आहे. अशा परिस्थितीत आपण परदेशी भांडवल कसं आकर्षित करू शकू?

सध्या भारतात कुठलीही जोखीम न पत्करता सरकारी कर्जरोख्यावर सुमारे ८ टक्के व्याज मिळतं. अमेरिकन १० वर्षाच्या सरकारी कर्जरोख्यांवर २.५ टक्के परतावा मिळाला तर गुंतवणूकदार पेढे वाटतात, पण अमेरिकेतले दर वाढल्यावर हा फरक कमी होईल.

### साम्यवाद व विषमता

सध्या जगात दोनच शुद्ध साम्यवादी देश आहेत – क्युबा व उत्तर कोरिया. ही राज्यप्रणाली या बुटुकल्या देशांमध्ये अस्तित्वात असण्याचं कारण आर्थिक समता व जनकल्याण नसून राष्ट्रपित्यांच्या वारसदारांना जुलमाने गादीवर ठेवणं हे आहे. मी काही वर्षांपूर्वी साम्यवाद प्रत्यक्ष बघण्यास क्युबामध्ये गेलो होतो. तिथे आर्थिक विषमता टाळण्यासाठी सर्वांना जवळजवळ सारखेच पगार सरकार देते. मग तो डॉक्टर असो की भंगी असो, पण वेतन सारखं असलं तरी प्रत्येकाची आवक एकसारखी असं समजणं चुकीचं ठरेल.

मी गाडी भाड्यानं घेतली तेव्हा त्यासाठी बाबूचं (clerk) काम करणारा पेड्रो एके काळचा हवाना विद्यापीठातला पदार्थ विज्ञानाचा प्राध्यापक निघाला. अशी पदावनती स्वीकारण्याचं कारण? नवीन धंद्यात त्याला परदेशी पर्यटकांकडून भरपूर बक्षिसी (tips) मिळत होती. त्यामुळे तो प्राध्यापकांपेक्षा जास्त कमाई करीत होता आणि ती देखील परदेशी चलनात. त्यामुळे तो विदेशी प्रवाशांसाठी राखून ठेवलेल्या खास दुकानात खरेदी करू शकत होता. याउलट त्याच्या देशी बांधवांना रेशनच्या दुकानात ओळीत उभं राहून सरकारनं ठरवलेलं मर्यादित अन्न विकत घ्यावं लागत होतं. माणसाच्या सर्जनशीलतेची याप्रमाणे कोंडी झाल्यामुळे उत्पादन घटलं आणि देश दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला. हे ओळखून हल्ली सरकारनं साम्यवादाची पकड ढिली करून काही लोकांना लघुउद्योग स्थापन करण्याचं स्वातंत्र्य दिलं. आज क्युबामध्ये आर्थिक विषमतेऐवजी दारिद्र्य समानताच सापडते.

व्हेनेझुएला हा दक्षिण अमेरिकेतला तेलसंपन्न देश. तेलाच्या उत्पन्नापासून तो देश समृद्ध झाला होता, पण डॉलर बरोबर जरी पाश्चात्त्य संस्कृती येते तसं समृद्धीमागे विषमता अवतरते. ती नष्ट करण्यासाठी व्हेनेझुएलाच्या ह्युगो चाव्हेझने तीव्र समाजवाद–साम्यवाद देशात आणला. आणि काय झालं? देशाचं तेलउत्पादन व उत्पन्न घटलं. तो हुकुमशहा कॅन्सरनं मेला पण त्या देशाजवळ एवढं काळं सोनं असूनही आता त्याला कर्जफेड करणं कठीण झालं. तो राष्ट्रीय दिवाळखोरी जाहीर करणार असं म्हणतात.

### विषमतेचं कारण

या आर्थिक विषमतेचं मूळ कशात आहे? तिची व्युत्पत्ती कशी होते? एका थॉमस पिकेटी नावाच्या डाव्या फ्रेंच अर्थतज्ज्ञानं 'कॅपिटल इन ट्वेंटीफर्स्ट सेंच्युरी' नावाचा ६८५ पानी ग्रंथ २०१३ मध्ये प्रसिद्ध केला. त्याच्या मते जगातल्या आर्थिक विषमतेचं मूळ $R > G$ या साध्या समीकरणात आहे. हे समीकरण बघून 'बी' ग्रूप (जैवशास्त्र) घेतलेल्यांना एकदम अच्युत गोडबोलेंच्या 'गणिती' या पुस्तकाकडे धाव घेण्याची किंवा रामानुजनांचं स्मरण

करण्याची जरुरी नाही. 'R' म्हणजे रिटर्न. गुंतवणुकदारांना भांडवलावर मिळणारा परतावा. आणि 'G' म्हणजे ग्रोथ किंवा अर्थकारणाचा वाढदर. या समीकरणानुसार परतावा वाढदरापेक्षा नेहमी जास्त असतो.

अलिकडच्या पुस्तकात त्यानं भारतातील आर्थिक विषमतेवर प्रकाश टाकला. तो म्हणतो, ''आपल्या देशातील ५९ टक्के संपत्ती १ टक्के लोकांच्या हातात केंद्रित झालेली आहे. तेच प्रमाण अमेरिकेत ४० टक्के आहे. या देशातील खालच्या ९० टक्के लोकांजवळ संपत्ती आहे त्यापेक्षा जास्त १ टक्के पुंजीधारकांजवळ आहे. आपत्ती किंवा युद्धकालीन वेळीच आर्थिक विषमता कमी होते. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली तेव्हा आर्थिक समता वाढली म्हणून विषमतेच्या ज्वरावर युद्ध हे औषध आहे असं कुणी म्हणत नाही. भारतात बिहार व आसाममध्ये सर्वाधिक कमी विषमता सापडते म्हणून त्या राज्यात कुणी गर्दी करीत नाही. उलट तिथलेच लोक महाराष्ट्रात येतात. आर्थिक विषमता हा विकासाचा एक अपरिहार्य दुष्परिणाम आहे असंच म्हणावं लागेल म्हणून त्या दुर्गुणावर ऊर्जा खर्च करण्याऐवजी विकासावर लक्ष केंद्रित केलेलं बरं. याची पडताळणी करण्यासाठी डोकं फार खाजवण्याची जरुरी नाही.

ऑक्टोबर २०१४ मध्ये भारताचा वाढदर ४.७ टक्के होता परंतु सरकारी कर्जरोख्यांवर किंवा बँकेतल्या ठेवीवर त्यापेक्षा जास्त परतावा मिळत असे. स्थावर इस्टेटीत गुंतवलेल्या पैशावरही तशीच कमाई होते. हल्ली शेअरबाजारातही तेच आढळतं. सध्या मुंबईतल्या सेन्सेक्स निर्देशकानं उसळी घेऊन ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. जगाच्या अर्थकारणात गेली शेकडो वर्षांचा अभ्यास केल्यावर पिकेटीला हा मंत्र सुचला.

शेवटी भांडवलदारच गुंतवणूक करू शकतो. कष्टकऱ्यांजवळ त्यासाठी तेवढा पैसा नसतो. वाढदर कष्ट करणाऱ्यांवर अवलंबून असतो. म्हणजे तो कष्टकऱ्यांच्या उत्पादनशक्तीचं एक प्रतीक समजण्यास हरकत नाही. या वस्तुस्थितीमुळे कष्टकऱ्यांपेक्षा गुंतवणुकदार श्रीमंत होऊन समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. म्हणूनच आपण नेहमी म्हणतो की पैशाजवळ पैसा जातो.

### निर्मूलन

मग आर्थिक विषमतेचं निर्मूलन करण्यासाठी काय केलं पाहिजे? उपाय सोपा आहे. तो म्हणजे श्रीमंतांचं कररुपानं शोषण करून त्याच्या संपत्तीचे पुनर्वाटप करणे. म्हणजे साम्यवाद आलाच. त्यासाठी पिकेटीनं दोन प्रकारचे कर सुचवले.

एक म्हणजे वैश्विक कर. तो श्रीमंत देशांवर आकारून कांगो, इंडियासारख्या गरीब देशांना त्याचे वाटप केल्यानं आंतर्देशीय आर्थिक विषमता कमी होईल. विद्यापीठाच्या हस्तिदंती मनोऱ्यात ते शक्य वाटत असलं तरी वस्तुस्थितीत कधीच खरं ठरणार नाही. भारतातल्या झोपडपट्टीवासीयांचं पुनरुत्थान होण्यासाठी न्यूयॉर्कमधला कष्टकरी जादा कर भरण्याची शक्यता उद्या पृथ्वीनं आकाशमालेतलं स्थान बदलण्याएवढं कठीण, म्हणून या संकल्पनेचा विचारच न केलेला बरा. अशा कराला पुष्टी देणारा कुठलाच राजकारणी अमेरिकेत निवडून येणार नाही म्हणून पिकेटीनं दुसरी देशांतर्गत करपट्टी सुचवली. श्रीमंतांना कापून गरिबांची झोळी भरल्यानं आर्थिक विषमता कमी होईल हे तार्किक वाटतं. त्यासाठी पिकेटीनं श्रीमंतांसाठी ७५ टक्के करदर सुचवला, पण असं केल्यानं धनाढ्य लोक आपली वागणूक बदलून कर कसे चुकवतील हे लक्षात घेणं आवश्यक आहे.

योगायोग असा की त्यावेळी पिकेटीच्या फ्रान्समध्ये समाजवादी सरकार निवडून आलं. अध्यक्ष हॉलंडेनं अगदी तसंच केलं. वर्षाला १० लाख युरोपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या फ्रेंच लक्ष्मीधारकांवर त्यांनी ७५ टक्के करभार लावण्यास सुरुवात केली. हेतू हा की त्यामुळे देशाची तिजोरी फुगून निम्नस्तरीयांना कल्याणकारी योजनातून मिळणारे अनेक लाभ वाढवता येईल. पण हे गणित सर्वस्वी फसलं कारण अशा लक्ष्मीधारकांनी एकदम आपली वागणूक वैधपणे बदलली. एक म्हणजे ते आपलं वेतन करमुक्त स्वरुपात घेऊ लागले. पैशाऐवजी कंपनीचे समभाग घेतल्यास ते करपात्र ठरत नाही. ते विकल्यावरच त्यावर कर भरावा लागतो. कित्येकांनी देशत्याग करून दुसऱ्या देशांचं नागरिकत्व पत्करलं. बऱ्याच लोकांनी काम करणंच बंद केलं. त्यामुळे सरकारचं उत्पादक व यशस्वी गटापासून होणारं कररूपी उत्पन्न वाढण्याऐवजी घटलं आणि देशभर नैराश्य पसरलं. असे पैसेवाले देशात भांडवली गुंतवणूक करीत असल्यामुळे नवीन कारखाने व नवोदित कंपन्या स्थापन होणं बंद होऊन त्या अनुषंगानं होणारी रोजगारनिर्मिती कमी झाली. देशातलं बेरोजगारीचं प्रमाण इंग्लंड किवा जर्मनीपेक्षा जास्त झालं. हॉलंडेची लोकप्रियता रसातळाला गेली.

सप्टेंबर २०१४ मध्ये फ्रान्सचा वाढदर शून्यापेक्षा जास्त नव्हता. शेवटी हॉलंडेना ही अधिकृत लुटमारी बंद करून हार पत्करावी लागली. हे त्यांच्या राजकीय जीवनाला आत्मघातकी ठरलं आणि पर्यायानं पिकेटीही आपटला.

संपत्तीधारकांचं शोषण करून उत्पन्नाचं पुनर्वितरण केल्यानं रामराज्य निर्माण होत नाही हे यापूर्वी भारतानंही सिद्ध करून दाखवलं होतं. नेहरू-इंदिरा गांधींच्या जमान्यात उच्चतम करदर ९० टक्के असे. त्यावेळी तो कुणी भरत नसे. लोकांनी जास्त काम करून उत्पन्न वाढवणे एक तर बंद केलं नाही तर टेबलाखालून व्यवहार होत. ती पद्धत आजही सुरू आहे. त्यावेळी आपला वाढदर २-३ टक्के असे. तो 'हिंदू' वाढदर म्हणून ओळखला जाई. १९९१ मध्ये जेव्हा मुक्त व बाजारपेठीय अर्थकारणाचा अभिषेक झाला तेव्हा कुठे वाढदरानं उसळी खाल्ली. दशलक्षावधी लोक दारिद्र्यमुक्त होऊन दारिद्र्यरेषेवर राहू लागले. तसंच देशातलं अब्जाधीशांचं पीक वाढलं. आज आपल्या देशात मायबाप ग्रेट ब्रिटनपेक्षा डॉलरच्या चलनात जास्त अब्जाधीश आहेत. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढली असेल. म्हणून डावे निरर्थक अश्रू गाळतात हे दुर्दैव.

कुठल्याही विकसनशील देशाला प्रगतीचा हा अहेतुक पण

अपरिहार्य आर्थिक परिणाम टाळता येत नाही. आर्थिक समता कितीही आदर्शवादी व उदात्त असली तरी ती विकसनशील देशाला अप्राप्य आहे असंच म्हणावं लागेल.

त्यामुळे निराश होण्याची जरुरी नाही. शेवटी देशातील आर्थिक विषमतेपेक्षा उपभोग समता (Consumption Equality) महत्त्वाची असते. भारतासकट सर्व महत्त्वाच्या देशात सरकार अनेक कल्याणकारी योजना आखते. अमेरिकेत अशा योजनांचा एवढा अतिरेक झाला आहे की काही प्रांतात सरकार गोरगरिबांना भ्रमणध्वनी व तो वापरण्याचा खर्च भरते. निरनिराळ्या योजनांमधून गरीब कुटुंबांना प्रत्येकी ६३,००० डॉलरच्या सुविधा मिळतात. या देशाचं वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ५३,००० डॉलर आहे. याचा अर्थ असा की कामावर जाऊन साहेबांच्या शिव्या खाण्यापेक्षा घरी बसून सरकारी शिध्यावर जगणं कितीतरी श्रेयस्कर आहे. या देशात एकूण ४७ टक्के कुटुंबांना सरकारकडून कुठली ना कुठली मदत मिळते. जवळजवळ तेवढ्यांनाच उत्पन्नकर भरावा लागत नाही. म्हणजे अर्धे लोक दुसऱ्या अर्ध्या लोकांना पोसतात. परावलंबित्वाची भावना याप्रकारे बोकाळल्यामुळे अमेरिकेचे ऐश्वर्याचे दिवस लवकरच मागे पडणार असं काही अर्थतज्ज्ञ म्हणतात. अमेरिकेला जगातील प्रशिक्षित तंत्रज्ञांचं व उत्पादक व्यावसायिक लोकांचं आकर्षण का हे यावरून कळतं. असे विद्याविभूषित लोक कसून काम करून आळशी अमेरिकन लोकांसाठी कर भरतात. महत्त्वाचं म्हणजे ते सरकारकडून कुठच्याच मदतीची अपेक्षा करत नाही.

अशी दुभती गाय कुणाला आवडणार नाही? म्हणून आर्थिक विषमतेच्या निर्मुलनार्थ ऊर्जा खर्च करण्यासाठी अर्थनिर्मितीवर जोर देणंच देशाच्या पुनरुत्थानासाठी उचित ठरेल. गाय जोपर्यंत दूध देते तोपर्यंत तिच्या आचळावरील गोचिडाची काळजी कशाला करा?

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते..

**ग्रंथाली**

# हुंकार




**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

...जीवनात कुठेही संघर्ष दिसला की माझ्यातला कथालेखक जागृत होतो आणि तो शब्दबद्ध करण्यास माझी लेखणी सरसारते. जगात सुखापेक्षा दुःख, त्यागापेक्षा भोग आणि सौहादापेक्षा कलह जास्त सापडत असल्यामुळे विषयांना तोट नाही. पाहिजे ती चिकित्सक बुद्धी आणि लिहिण्याची ओढ. देश व वेष वेगळे म्हणून माणसाच्या भावना व मनोवृत्ती बदलत नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत तीच आसवं उभी राहतात आणि छातीत तेच काळीज धडधडत असतं. त्यामुळे घटना वेगळ्या असल्या तरी प्रतिक्रिया कशी होते हा कथेचा सार ...लघुकथा म्हणजे एक प्रकारचं शीघ्र साहित्यच. मॅकडोनल्डच्या शीघ्र अन्नाप्रमाणे (फास्ट फूड) ...लघुकथांचे दोन प्रकार म्हणता येतील– मनोविश्वलेषणात्मक व घटनात्मक. मनाचे विविध पापुद्रे उलगडून कथा लिहिल्यामुळे मराठीच्या साहित्याच्या मुशीत फ्रॉईड केव्हाच फ्राईड (तळलेला) झाला आहे... रोजच्या जीवनात जगभर जो कलह सापडतो, तो कलात्मकरीतीने गुंफला तर लालित्यपूर्ण कथा निर्माण होऊ शकते. त्यासाठी मनोविकारतज्ज्ञाची जरुरी नसते. अनुभवांचं भांडवल आपण कृतीतून व वाचनातून मिळवू शकतो. म्हणजे लेखक होण्यासाठी प्रथम वाचक होणं आवश्यक असतं.

# प्रतिसाद

सर्वोत्तम ठाकूर

'पुणे, एक अविस्मरणीय भेट' हा डॉ. लाभसेटवार यांचा जानेवारी २०१८ च्या 'शब्द रुची'तील लेख वाचून मनात आलेले काही विचार.

'लाभसेटवार प्रतिष्ठान'ची कायदेशीर नोंदणी करण्याकरता बक्षिसी द्यावी लागेल हे त्यांच्या लेखपालांनी सांगितले आणि ती तशी दिली हा उल्लेख आहे. त्या लेखापालाऐवजी पाठीचा कणा अधिक ताठ असलेला दुसरा लेखपाल लाभसेटवार यांनी घेतला असता तर एक रुपया सुद्धा टेबलाखालून न देता त्यांना नोंदणी करून घेता आली असती आणि ती देखील साधारण तेवढ्याच वेळात, उगाच हेलपाटे घालायला न लावता, ही माझी खात्री आहे. कामे करून घेण्याकरता सरसकट त्या बाबूंचे हात ओले करण्याच्या या जमान्यात अशा ताठ कण्यांच्या व्यक्तींची कामे अधिक लवकर केली जातात. (उगाच कटकट नको या लेखपालाचे अथवा तशाच कोणाचे तरी – वैर नको ही भीती मनात असावी) हे सत्य आहे. भ्रष्टाचार वाईट मानायचा आणि आपलं काम करून घेण्याकरता पैसे देऊन आपण त्याला मदतच करायची हे सर्रास चालू आहे.

भारतात खूपच भ्रष्टाचार होता आणि अजूनही चालू आहे हे वादातीत आहे, पण या परिस्थितीत टाटांसारखा फार मोठा उद्योगसमूह गेली कित्येक दशके त्यापासून सतत दूर राहिला आहे आणि विस्तारत आहे, हे आजच्या भारतात होऊ शकतं. इथली पहिली विमानकंपनी टाटांनी सुरू केली होती. नंतर सरकारने तिची मालकी घेतली. सरकारी धोरण बदलल्यानंतर सिंगापूर एअरलाईन्स बरोबर घेऊन नवीन विमानकंपनी स्थापन करायला टाटांनी अर्ज केला. याला मान्यता पाहिजे असल्यास टाटांनी चौदा कोटी रुपये (लाच) द्यावे असा प्रस्ताव त्यांच्याकडे आला. ही माहिती आणि मागितलेल्या रकमेचा आकडा रतन टाटा यांनी स्वत:च उघडपणे सांगितला होता. त्यांच्या दृष्टीने हे 'अनैतिक' (त्यांचे शब्द) त्यांनी केलं नाही.

मला प्रत्यक्ष माहीत असलेलं टाटा समूहातील दुसरं उदाहरण टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस (टीसीएस) बद्दल इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारतात संगणक आणायला बंदी होती. बऱ्याच परिश्रमानंतर संगणक आयात करायला टाटांना परवानगी मिळाली. त्या जमान्यात एक संगणक म्हणजे सात-आठ मोठमोठी मशीन्स असत. लवकरात लवकर उत्पन्न सुरू व्हावं म्हणून ती सर्व सामुग्री विमानाने मागवण्यात आली आणि मुंबईला पोहोचल्यावर ती विमानतळावर कस्टमच्या आयात गोदामात क्लिअरन्सकरता पडून राहिली. त्यावेळचे टीसीएसचे प्रमुख कोहली हे माझे जवळचे मित्र. दर दिवशी इतका महसूल बुडतोय तर तुम्ही ती मशिन्स कस्टमकडून सोडवून का घेत नाही असं मी विचारल्यावर त्यांनी मला स्पष्ट सांगितलं, ''ते XXX आमच्याकडून बक्षिसी (लाच) अपेक्षित आहेत. आम्ही याला तयार नसल्यामुळे काहीना काही कारणे सांगून ते वेळ काढत आहेत. तो विभाग सांभाळणाऱ्या माझ्या मॅनेजर्सना मी स्पष्ट सांगितलं आहे, की तुम्ही त्यांना हमाम (टाटांचा साबण) ची एक वडी दिलीत तर मी तुम्हाला नोकरीवरून काढून टाकेन. लाच देऊन काम करून घेण्याची कीड मला माझ्या कंपनीत नको आहे.''

आज टीसीएस ही जागतिक स्तरावरील एक अग्रगण्य कंपनी झाली आहे. थोडक्यात म्हणजे भ्रष्टाचाराने पोखरलेल्या या आपल्या देशात स्वच्छ कारभार करून नुसताच टिकाव धरता येतो असं नव्हे तर खूप प्रगती पण करता येते.

लाखो कर्मचारी नोकरीवर असलेल्या टाटासारख्या अवाढव्य आस्थापनात सर्वच लोक स्वच्छ असणं शक्य नाही. पण अजित केरकर आणि दिलीप पेंडसे यासारख्या अत्यंत उच्चपदावर असलेल्या आपल्या सहकाऱ्यांना बेकायदा (टाटांच्या शब्दात 'अनैतिक) गोष्टी केल्याबद्दल टाटांनी नोकरीवरून काढून टाकले इतका कणखरपणा दाखवावा लागतो.

डॉ. लाभसेटवारांनी दिलेले पुण्याजवळील कारखानदार राजपूत यांचे उदाहरण ही वस्तुस्थिती आहे, पण तो नियम नाही. भारतातील एका फार मोठ्या उद्योगसमूहाच्या महाराष्ट्रातील एका कारखान्याचा मी बारा वर्षे प्रमुख होतो. राजपूत यांना येणाऱ्या सर्व अडचणी मला नेहमीच येत असत. पण बारा वर्षांच्या त्या काळात मी कुठल्याही सरकारी वा बिनसरकारी खात्याच्या कोणाही कर्मचाऱ्याला वा अधिकाऱ्याला लाच दिली नाही आणि कारखाना चालवला. तोट्यातून बाहेर पडून कारखाना फायद्यात आला. 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'रत्नागिरी ते आईनस्टाइन' या माझ्या

पुस्तकातील ''मी लाच देत नाही. तुम्ही?'' या लेखात याबद्दल थोडं विस्तारित लिहिलं आहे. त्याची पुनरावृत्ती करत नाही. ''मी घेतलेली लाच वरच्या अधिकाऱ्यापर्यंत मला पोहोचवावी लागते'' या विधानाबद्दलही मी त्या लेखात उल्लेख केला आहे.

मी भाजपचा चाहता नाही. १९५२ पासूनच्या सर्व निवडणुकांत मी मतदान केले आहे. एखादी निवडणूक सोडली तर भाजपच्या उमेदवाराला मी मत दिलेलं नाही, पण रेणुताई गावस्करांनी डॉ. लाभसेटवारांकडे केलेलं ''भारतात काही एक प्रगती झालेली नाही'' हे विधान मला अजिबात पटत नाही. मोदींनी स्वच्छता मोहीम सुरू केल्यापासून आजपर्यंत चार-पाच कोटी खाजगी घरात शौचालये बांधली गेली आहेत. इतक्या कुटुंबातील बायकामुलींना शौचाला जाण्याकरता काळोख पडण्याची अथवा आडोशाची जागा शोधण्याची वाट पहावी लागत नाही. त्यांची प्रकृती बिघडण्याचं एक फार मोठं कारण आता नाहीसं झालं आहे. अनुदानित गॅसधारकांनी आपले स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर गरिबांना मदत म्हणून परत करण्याच्या मोदींच्या आवाहनामुळे मोकळे झालेले सिलेंडर गरीब घरात देऊन चार-पाच कोटी स्वयंपाकघरातील विस्तव फुंकून होणारा धूर थांबून कितीतरी स्त्रियांचं (चुलीकडे बहुतेक त्याच असतात) आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे. हजारो खेड्यात पाणीटंचाईमुळे दरवर्षी टँकरनी पाणी पुरवावे लागत असे. अशा कितीतरी खेड्यांना आता वर्षभर पाणी मिळण्याची सोय झाली आहे.

स्वित्झर्लंडमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेतील आरामशीर व भक्कम पगाराची नोकरी आठ-दहा वर्षं करून, ती सोडून शरद जोशी भारतात परतले. एका खेड्यातील एक कोरडवाहू पडकी जमीन विकत घेऊन शेतीचा स्वत: अनुभव घेतला आणि नंतर 'शेतकी संघटना' उभी केली. त्यांनी म्हटल्याप्रमाणे हिंदुस्थानात 'भारत' आणि 'इंडिया' असे दोन भाग आहेत.

प्रमोद महाजन यांच्यावर रिलायन्स समभागाबद्दल आरोप आल्यावर त्यावेळचे भाजप पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांचे मंत्रिमंडळातील खाते बदलले, त्यांना मंत्रिमंडळातून काढून भ्रष्टाचार निर्मूलनाचा एक आदर्श घालून दिला नाही. मोदी यांच्या एखाद्या वरिष्ठ सहकाऱ्यावर आरोप सिद्ध झाला तर त्यावर ते कठोर कारवाई करणार की भाजपाचा आहे म्हणून मुळमुळीत धोरण करून पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणार यावर मोदींच्या 'भारत सुधारण्याचं' यश अवलंबून राहणार आहे. गेली तीन-चार वर्षं 'भारत' आर्थिकदृष्ट्या 'इंडिया'च्या जवळ येण्याचा प्रयत्न करतो आहे. ते काम फत्ते होणं न होणं यावरच अवलंबून राहणार आहे.

थोडक्यात म्हणजे मोदी भ्रष्टाचाराच्या विरुद्ध टाटांसारखी कणखर पावलं उचलतात काय हे पाहिलं पाहिजे.

**– सर्वोत्तम ठाकूर**

भ्रमणध्वनी : ९८२०२२९९२१

## साहित्यगौरव







'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या नीलम माणगावे लिखित 'निर्भया लढते आहे' या कथासंग्रहास 'लघुकथा' या साहित्य प्रकारासाठी दिला जाणारा 'दिवाकर कृष्ण पुरस्कार' (२०१६) प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत दिला जातो.

# परिसंवाद



डॉ. लतिका भानुशाली



दिनकर गांगल



नरहर वसंत फेणे



प्रा. अरुणा पेंडसे



डॉ. सुरेखा सबनीस

**२०१७** च्या वर्षात 'ग्रंथाली'ने मराठी साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरू शकतील अशा दोन प्रदीर्घ कादंबऱ्या प्रकाशित केल्या. त्यापैकी पहिली कादंबरी होती नरहर वसंत फेणे लिखित 'कारवारी माती' तर दुसरी कादंबरी होती डॉ. प्रकाश लोथे लिखित 'धर्मधुरीण' ही कादंबरी.

या कादंबऱ्या कथावस्तू, निवेदनशैली आणि सादरीकरण या दृष्टीने अत्यंत वाचनीय झाल्या आहेत. त्या वाचकांना स्वातंत्र्यपूर्व काळातील विचारविश्वात घेऊन जातात.

या दोन्ही कादंबऱ्यांचा काळ हा एकच असल्याने या कादंबऱ्यांची तुलनात्मक चर्चा करावी, या दोन्ही कादंबऱ्यांची वैशिष्ट्यं अधोरेखित करावी आणि सध्याच्या विचारसिद्धांताच्या अभावाच्या काळात तत्कालीन विचाराधिष्ठित जगण्याला उजाळ द्यावा या हेतूने दिनकर गांगल यांच्या अध्यक्षतेखाली या कादंबऱ्यांवर आधारित 'द्विगुणित' या नावाचे चर्चासत्र 'मुंबई मराठी साहित्य संघ 'आणि 'ग्रंथाली' यांच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ रोजी 'मुंबई मराठी साहित्य संघा'त आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम एकूण दोन सत्रात विभाजित केला होता. पहिले सत्र हे कादंबऱ्यांवरील चर्चासत्राने गुंफले गेले. या सत्रासाठी ५० ते ६० साहित्यिक, समीक्षक, लेखक इ. आमंत्रित केले होते. तर दुसरे सत्र 'लाभसेटवार फाउंडेशन'च्या वतीने देण्यात येणाऱ्या 'उत्कृष्ट मराठी ललित साहित्य पुरस्कार' या सोहळ्याने संपन्न झाले.

पहिल्या सत्राचे प्रास्ताविक डॉ. लतिका भानुशाली यांनी केले व उर्वरित चर्चासत्राचे सूत्रसंचालन दिनकर गांगल यांनी अध्यक्ष या नात्याने घडवून आणले.

आपल्या सुरुवातीच्या निवेदनात गांगल असे म्हणाले, की ''इतक्या महत्त्वाच्या ठरू शकणाऱ्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आणि मग विस्मृतीत गेल्या असे या कादंबऱ्यांच्या बाबतीत होऊ नये या विशुद्ध हेतूने हे चर्चासत्र आयोजित केले आहे.''

चर्चासत्रात मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून डॉ. सुरेखा सबनीस व प्रा. अरुणा पेंडसे यांना आमंत्रित केले होते.

''कादंबरीचा पट मोठा असतो, त्यात सत्यवादी भूमिका मांडलेली असते. जीवनातील सगळ्या थरातील संबंध, वाद-विवाद, नियतीशी टक्कर या सगळ्यांचा सांगोपांग आलेख मांडला जातो. त्यानुसार या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये सुद्धा जीवनाचा विशाल पट मांडला गेला आहे. हिंदी साहित्यातील थोर साहित्यिक 'प्रेमचंद' यांच्या कादंबऱ्यांची आठवण या दोन्ही कादंबऱ्या वाचताना होते'' असे मत डॉ. सुरेखा सबनीस यांनी व्यक्त केले. चर्चासत्राच्या मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयाच्या माजी प्राध्यापिका अरुणा पेंडसे यांनी असे मत मांडले की, ''या दोन्ही कादंबऱ्या म्हणजे एका जातीच्या; किंबहुना ब्राह्मणी कुटुंबातील कथा आहेत. एकाच काळातील पण दोन वेगवेगळ्या प्रांतांमध्ये घडणाऱ्या या कादंबऱ्यांच्या कथानकात स्वातंत्र्यपूर्व काळ हा पात्रांच्या बरोबर जैविक पद्धतीने जोडला जात नाही. तसेच पात्रांचा अजून विकास होणे गरजेचे होते.''

मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्षा श्रीमती सुहासिनी कीर्तीकर यांनी असे मत मांडले की, ''परिवर्तन हे शाश्वत असते याची ग्वाही या दोन्ही कादंबऱ्या देतात. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये सामाजिक, कौटुंबिक, वैचारिक, धार्मिक, राजकीय परिवर्तन हे प्रसरण पावत जाते.''

''सनातनपणा आणि उदारमतवादाचा संघर्ष मांडणाऱ्या या दोन्ही कादंबऱ्या आहेत, असे मत अवधूत परुळकर यांनी मांडले तर या कादंबरीतील शाम हे पात्र वगळता इतर पात्रे संघर्ष करून पेटून उठताना दिसत नाहीत,'' असे मत संजीवनी खेर यांनी व्यक्त केले. ''वैचारिक गोंधळात सापडलेले शामचे पात्र नंतर विकसित होताना दिसते'' ही कादंबरीची जमेची बाजू आहे असे मत डॉ. अनंत देशमुख यांनी व्यक्त केले. ते पुढे असेही म्हणाले



डॉ. प्रकाश लोथे



डॉ. अनंत लाभसेटवार



डॉ. उदय निरगुडकर



दीपक घारे



प्रभाकर भिडे



अवधूत परळकर

की ''विमल ही स्त्रीदेखील नंतर शाम बरोबर विकसित होत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करते खरी पण नंतर शेवटी कादंबरीत अपेक्षाभंग होतो कारण अपेक्षित उंची गाठताना पात्रे दाखवली नाहीत.''

'कादंबरी वाचनीय आहे' असे मत मीना वैशंपायन यांनी मांडले. दोन कादंबरीकार व्यक्तिश: ही चर्चा ऐकायला उपस्थित असल्याने चर्चेचा आलेख हा उत्तरोत्तर वाढत गेला. या चर्चासत्राला प्रतिसाद देताना ज्येष्ठ साहित्यिक नरहर वसंत फेणे हे म्हणाले की, ''कादंबरी जरी आत्ताच्या काळात प्रकाशित झाली असली तरी ती २०-२५ वर्षांपूर्वी लिहिलेली असल्यामुळे मला आता त्यातील सूक्ष्म तपशील आठवणे शक्य नाही.''

धर्मधुरीणकार डॉ. प्रकाश लोथे यांनी खुल्या दिल्याने कादंबरीतील त्रुटी स्वीकारल्या. या कादंबरी लेखनामागे असलेली, त्यांच्या वडिलांची व्यक्तिरेखा त्यांनी विशद केली.

''जगण्याची पद्धती थेटपणे या कादंबरीत व्यक्त होते व पात्रांच्या वा संभाषणांच्या माध्यमातून लेखक प्रकट होतो. त्यामुळे जुन्या काळातील कादंबरीकारांच्या रचनाबंधाची आठवण होते'' असे मत ग्रंथाली विश्वस्त दीपक घारे यांनी नोंदवले.

''पाश्चात्त्य कादंबऱ्या वाचताना निवेदनामध्ये, वातावरण-निर्मितीमध्ये खूप सखोलपणा जाणवत राहतो तोच खोलपणा या बऱ्याच वर्षानंतर मराठी कादंबरी वाचताना आला'' असे मत ग्रंथालीचे दुसरे विश्वस्त प्रभाकर भिडे यांनी व्यक्त केले.

या दोन्ही कादंबरीकारांच्या जीवनावर आधारित, 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' निर्मित किरण क्षीरसागर यांनी तयार केलेली लघुचित्रफित या कार्यक्रमात प्रक्षेपित करण्यात आली.

सर्व विचारवंतांनी मांडलेल्या वैचारिक मंथनाचा आढावा सूत्रसंचालक या नात्याने दिनकर गांगल यांनी घेतला व प्रथम सत्रातील चर्चासत्राची सांगता झाली.

''वाचक वेधकता ज्या साहित्यकृतीत असते त्या कादंबरीला लोकाश्रय मिळतो त्याचबरोबर शैली, कथनतंत्रे, कादंबरीची भाषा, परंपरा व नवता याचा कादंबरीने साधलेला तोल आणि मुख्य म्हणजे कादंबरीत आढळणारा द्रष्टेपणा या गोष्टींमुळे कादंबरीला शाश्वत यश मिळते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कादंबरीत लेखकाने व्यक्त केलेली मूल्यव्यवस्था कादंबरीचे श्रेष्ठत्व वा कनिष्ठत्व ठरवते या पार्श्वभूमीवर 'धर्मधुरीण' ही कादंबरी श्रेष्ठ ठरते,'' असे मत पुरस्कारामागची भूमिका स्पष्ट करताना डॉ. लतिका भानुशाली यांनी व्यक्त केले.

लाभसेटवार फाउंडेशन प्रस्तुत 'उत्कृष्ट मराठी ललित साहित्य पुरस्कार' या सोहळ्याने 'द्विगुणित' या कार्यक्रमाचे द्वितीय सत्र गुंफले गेले.

स्वत: लेखक व उद्योजक असणाऱ्या अमेरिकास्थित डॉ. अनंत लाभसेटवार यांनी ललित साहित्याला उत्तेजन मिळावे या विशुद्ध हेतूने हा पुरस्कार सुरू केला.

या वर्षीचा हा पुरस्कार 'धर्मधुरीण' या न्यूजर्सी येथे बालरोगतज्ज्ञ असणाऱ्या डॉ. प्रकाश लोथे यांच्या पहिल्याच कादंबरीला प्राप्त झाला आहे. या पुरस्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून न्यूज १८ लोकमत वाहिनीचे संपादक उदय निरगुडकर, अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षा श्रीमती उषा तांबे, डॉ. अनंत लाभसेटवार, डॉ. लता लाभसेटवार, दिनकर गांगल इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कादंबरीला पुरस्कार देण्यामागची भूमिका डॉ. लतिका भानुशाली यांनी 'पुरस्कार समिती सदस्य' या नात्याने मांडली. तसेच उर्वरित कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही केले. या कार्यक्रमात 'ग्रंथाली'तर्फे श्रीमती धनश्री धारप यांनी प्रास्ताविक सादर केले.

हा पुरस्कार डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते डॉ. प्रकाश लोथे यांना प्रदान करण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ व ५०,००० हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. 'पुरस्काराचा आनंद मोठा आहे. जबाबदारीची जाणीव त्यामुळे निर्माण झाली आहे' असे भावपूर्ण उद्‌गार याप्रसंगी डॉ. लोथे यांनी काढले. कादंबरी लिहिण्याची प्रेरणा दिनकर गांगल यांनी दिली पण विषय सुचत नसल्याने बरेच दिवस कादंबरी लेखन मागेच पडत गेले. शेवटी वडील पूर्वी ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाखाली धर्मांतर करायला उद्युक्त झाले होते ही आठवण सांगून ते म्हणाले मग हेच बीज केंद्रस्थानी ठेवून 'धर्मधुरीण' कादंबरी लिहिली. याप्रसंगी डॉ. अनंत लाभसेटवार लिखित 'हुंकार' या कथासंग्रहाचे प्रकाशन श्रीमती उषा तांबे यांच्या हस्ते झाले.



संजीवनी खेर



उषा तांबे



मीना वशंपायन



सुहासिनी कीर्तीकर



धनश्री धारप



**लाभसेटवार फाउंडेशन प्रस्तुत 'उत्कृष्ट मराठी ललित साहित्य पुरस्कार' डॉ. प्रकाश लोथे यांच्या 'धर्मधुरीण' कादंबरीला मिळाला. त्यावेळी धनश्री धारप, डॉ. लता लाभसेटवार, लेख डॉ. प्रकाश लोथे, डॉ. अनंत लाभसेटवार, डॉ. उदय निरगुडकर, उषा तांबे आणि डॉ. लतिका भानुशाली**

हा पुरस्कार 'धर्मधुरीण' कादंबरीला मिळाला आहे, याचा आनंद मोठा आहे असे मत डॉ. अनंत लाभसेटवार यांनी मांडले व पुरस्कारामागची भूमिका विशद केली. 'हुंकार' या कथासंग्रहावरील आपले मनोगत करताना श्रीमती उषा तांबे यांनी या पुस्तकातील आंतरराष्ट्रीय परिणामे उलगडून दाखवली. कादंबरीत वापरलेल्या इंग्रजी शब्दांसाठी निर्माण केलेले नवीन मराठी शब्द त्यांनी अधोरेखित केले.




**धर्मधुरीण**

**प्रकाश लोथे**

**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये**

प्रमुख अतिथी म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. उदय निरगुडकर यांनी विविध विषयांचा ऊहापोह केला. वऱ्हाडी बोलीभाषेतील ही कादंबरी एका अमेरिकेत राहणाऱ्या बालरोगतज्ज्ञाने लिहिली आहे यावर विश्वास ठेवणे कठीण असल्याचे सांगून त्यांनी कादंबरीतील बलस्थाने उलगडून दाखवली. आजकाल उत्तम मराठी जाणणाऱ्या लोकांची, भाषांतरकारांची प्रचंड वानवा असल्याने प्रसारवाहिन्यांना याबाबतीत तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्याची खंत त्यांनी आपल्या भाषणात केली. तंत्रज्ञानाचा प्रसार ग्रामीण भागात, तळागाळातील थरात किती खोलवर रुजला आहे हे त्यांनी उदाहरणांसहित स्पष्ट केले. अत्यंत खुमासदार पद्धतीने सभागृहात हास्यरसाची निर्मिती करत त्यांनी या कार्यक्रमाची सांगता केली.

**– प्रतिनिधी**

## मेहता पब्लिशिंग हाऊस    नवी पुस्तकं... नवा आनंद...



एका मनस्वी द्विखंडीय प्रवासातली
कलंदर कलाकारी
**मॅग्नोलिया**
लेखक - अनिता कुलकर्णी
Book Available

जागतिक अर्थशास्त्रज्ञ, पद्मभूषण पद्मा देसाईंचा
लोकल ते ग्लोबल प्रवास...
**बंधमुक्त होताना...**
लेखक - पद्मा देसाई
अनुवाद - सुनंदा अमरापूरकर





रानशिवारात फुलणाऱ्या प्रेमाची उत्कट सत्यकथा.
'The Dirty Life' या पुस्तकाचा अनुवाद
**मातीचे मम अवघे जीवन**
लेखक - क्रिस्टीन किंबल
अनुवाद - मेधा मराठे
Book Available

जेंव्हा लेकीचं बोट धरुन चालते माय...
मायलेकीतल्या जिव्हाळ्याची कहाणी...
**माय डॉटर माय मदर**
लेखक - ॲनी मरे
अनुवाद - रमा नाडगौडा





कारुण्याला विनोदाचा साज चढवत
गुंतवून ठेवणारी कादंबरी.
**आंधळ्या बाईचे वंशज**
लेखक - अनीस सलीम
अनुवाद - श्यामल चितळे
Book Available

समुद्र देतो जेंव्हा नात्यांना संजीवनी...
**समुद्राकाठचे एक वर्ष**
लेखक - जोआन ॲंडरसन
अनुवाद - अरुंधती चितळे





बर्मातील लोकशाहीच्या आग्रहास्तव
सर्वस्व झोकून देणाऱ्या ब्रह्मकन्येची सत्यकथा
**ब्रह्मकन्या**
लेखक - झोया फन आणि डेमियन लुईस
अनुवाद - श्रद्धा भोवड

धैर्य, कल्पकता आणि विश्वासाचा कानमंत्र
असणाऱ्या 'The Tools'चा अनुवाद
**साधने**
लेखक - फिल स्टुट्झ, बॅरी मायकेल्स
अनुवाद - डॉ. जयश्री गोडसे





मानवी चेतनेचं नवं प्रतिबिंब... जगभर सात दशलक्ष
प्रती विकल्या गेलेल्या 'A New Earth'चा अनुवाद
**अवनी एक नवी**
लेखक - एकहार्ट टोले
अनुवाद - नीलिमा जोशी
Book Available

गजाआडच्या महिलांचे काव्यात्मक भावबंध
**तिनका तिनका तिहार**
लेखक - वर्तिका नंदा, विमला मेहरा
अनुवाद - मंजिरी धामणकर
Book Available



महाराष्ट्र
घडवणाऱ्या
विभूतींचा
जीवन आलेख













**डॉ.जयसिंगराव पवार** आणि **वसुधा पवार** यांचे समग्र साहित्य

मेहता पब्लिशिंग हाऊस

Email : sales@mehtapublishinghouse.com
**website : www.mehtapublishinghouse.com**

Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

E-book available : **play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in**

Mehta Books
Save Tree Books, Read eBooks
700 Marathi books available as e-book

**WhatsApp us on 9420594665**

## डॉ. ढवळे लिखित 'मार्मिकाय नमः' आणि 'शब्दफुलांच्या फुलवाती'


उद्धव ठाकरे


मनोहर जोशी


डॉ. विजय ढवळे


संजय राऊत


श्रीधर पाटील


डॉ. लतिका भानुशाली

'पूर्वी वाचाल तर वाचाल' असे म्हटले जायचे; मात्र आजची वर्तमानपत्रे, पुस्तके आणि शालेय अभ्यासक्रमातील पुस्तके पाहिली तर न वाचलेलेच बरे अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशातच गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या घडामोडींच्या नेमका वेध घेणाऱ्या डॉ. विजय ढवळे यांच्या पुस्तकामुळे काहीसा आशावाद शिल्लक आहे, असे मत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मांडले.

डॉ. ढवळे यांच्या 'मार्मिकाय नमः' आणि 'शब्दफुलांच्या फुलवाती' या दोन पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच ठाकरे यांच्या हस्ते झाले. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, खासदार संजय राऊत, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

सातासमुद्रापार कॅनडामध्ये डॉ. ढवळे यांनी मराठी भाषा केवळ जिवंतच ठेवली नाही, तर तिचा अभिमान बाळगून प्रसारही केला. खासदार संजय राऊत यांनी साहित्यसंमेलनावर टीका केली. हल्लीचे साहित्य-संमेलन कधी येते आणि कधी जाते ते कळतच नाही. अध्यक्षाचे नावही अनेकांनी ऐकलेले नसते. पूर्वी साहित्यसंमेलनाची उत्सुकता असायची; ती आता पूर्णपणे संपली. मात्र संमेलनासाठी ट्रम्पपासून हिलरीपर्यंत आणि काश्मिरपासून चीनपर्यंत जगभरातल्या अनेक घडामोडींवर चौफेर लिहिणारे ढवळे हेच संमेलनाच्या अध्यक्षपदाचे प्रबळ दावेदार आहेत, अशा शब्दांत त्यांनी ढवळे यांचा गौरव केला.

## डॉ. मृण्मयी भजक लिखित अमेरिका : खट्टी-मिठी


कुमार केतकर


उषा मेहता


मोनिका गजेंद्रगडकर


मेधा आलकरी


डॉ. मृण्मयी भजक


अस्मिता पांडे


धनश्री धारप

डॉ मृण्मयी भजक लिखित 'अमेरिका : खट्टी-मिठी या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर इथं संपन्न झाला. कुमार केतकर, उषा मेहता, मोनिका गजेंद्रगडकर, मेधा आलकरी सोहळ्याला पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या हस्ते पुस्तकाचं प्रकाशन झालं. यावेळी बोलताना कुमार केतकर म्हणाले, हे पुस्तक ऑडिओ व्हिजुअल आहे, कारण ते वाचताना संपूर्ण चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभं राहतं, आणि त्यातले संवाद ऐकू येतात. त्यानिमित्ताने अमेरिकेतील सद्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यावरही त्यांनी मार्मिक भाष्य केलं. ज्येष्ठ कवयित्री उषा मेहता म्हणाल्या की मृण्मयीचे लेख वाचताना त्यांना अजिता काळे यांच्या लेखनाची आठवण होते. बापटांची न्यूयॉर्कचं वर्णन करणारी कविता त्यांनी रसिकांसमोर सादर केली. मोनिका गजेंद्रगडकर यांनी त्यांच्या मनोगतात 'अमेरिका : खट्टी-मिठी' या पुस्तकावर समीक्षणात्मक टिपण मांडले. त्या म्हणाल्या, शीर्षकापासूनच वेगळेपण असणारं हे पुस्तक भेळेच्या खट्ट्या-मिठ्या चटणीप्रमाणे आहे. लेखणीत लालित्य आहे, आणि ते क्रिएटिव्ह रायटिंग च्या जवळ जाणारे आहे आणि मुख्य म्हणजे हे लेखन स्वतंत्र आहे, त्यावर कोणाचाही प्रभाव नाही. थोडक्यात सांगायचं तर 'अमेरिकेचा स्लाईड शो' या पुस्ताकातून दिसतो. प्रवासवर्णनकार मेधा आलकारी यांनी परदेशातील अनुभवांचे वर्णन केले.लेखिकेच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचे कौतुक केले. पुस्तकाच्या लेखिका डॉ. मृण्मयी भजक यांनी आपल्या मनोगतात लेखनाच्या प्रेरणा व लेखनप्रवास याविषयी सांगितले.

या पुस्तकातील लेखांचे अभिवाचन गीतेश शिंदे आणि प्रीतम पाथरे यांनी केले, अस्मिता पांडे यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले. 'ग्रंथाली'तर्फे धनश्री धारप यांनी प्रास्ताविक केले, तर धनंजय गांगल यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सभागृहात लावलेल्या मकरंद जोशी यांच्या चित्रांनी अमेरिकन जीवनाचे प्रत्यंतर घडविले. यावेळी सुरेंद्र गावस्कर सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते.

## पुस्तकप्रकाशन

# कवी अशोक गुप्ते यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

नवी मुंबई, येथील साहित्यिक अशोक गुप्ते यांच्या 'मृगजळाचे आभास' (कवितासंग्रह) आणि 'रुमी' (भाषांतरित कविता) या दोन पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच वाशी येथील 'नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन' सभागृहात पार पडले. अनुक्रमे 'डिंपल' आणि 'ग्रंथाली' प्रकाशन यांनी प्रकाशित केलेल्या या पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यास ज्येष्ठ साहित्यिक प्रा अशोक बागवे, गझलकार ए. के. शेख, संगीतकार कौशल इनामदार, कवी दुर्गेश सोनार, को.म.सा.प नवी मुंबईचे कार्याध्यक्ष डॉ अशोक पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी गुप्ते यांनी या दोन पुस्तकांच्या निर्मिती मागील भावना विशद करून आपल्या पूर्वसुरींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अशोक गुप्ते यांचा आत्मा अध्यात्माकडे झुकणारा असल्याचे सांगून 'गर्भातले प्रेम म्हणजे रुमी (तेराव्या शतकातील सूफी संत कवी) आणि प्रेमातला गर्भ म्हणजे अध्यात्म' असे प्रा. बागवे याप्रसंगी म्हणाले. गुप्ते यांच्या कविता या ईश्वराशी संवाद साधणाऱ्या असून त्या आस्वादायला रसिकही तेवढे तयारीचे हवेत असे मत गझलकार शेख यांनी मांडले. परका रुमी गुप्ते यांनी आपला केल्याचे सांगून आपण इंग्रजी माध्यमात शिकलो असलो तरी माझ्याशी थेट संवाद साधणारं साहित्य हे फक्त आणि फक्त मराठीतच असल्याचे निरीक्षण कौशल इनामदार यांनी यावेळी नोंदवले. लोकोत्तर होण्याची क्षमता अशोक गुप्ते यांच्या कवितेत असल्याचे कवी दुर्गेश सोनार आपल्या भाषणात म्हणाले. तर गुप्ते यांची निरीक्षण शक्ती दांडगी असल्याचे डॉ. अशोक पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. या कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन कवी साहेबराव ठाणगे यांनी केले.

---

## 'ग्रंथाली' प्रस्तुत सह्याद्री वाहिनीवर मार्च महिन्यात प्रसारित होणारे 'अमृतवेल'चे कार्यक्रम




**संगणकीय साहित्य**
सहभाग – अनिल शाळीग्राम,
संस्थापक सिरीपिडीया
या फुलपाखराचे काय करायचे?
ब्लॉग लेखिका राधिका कुंटे
प्रसारण – ११ मार्च २०१८ रोजी,
रविवार, रात्री ९.० वा.
सूत्रसंचालन – रविराज गंधे

लेखकभेट
मुखपृष्ठकार सतीश भावसार
यांनी संपादित केलेल्या
निवडक बाबुराव अर्नाळकर
ह्या संग्रहाबाबत मुलाखत
प्रसारण – २५ मार्च
२०१८ रोजी, रविवार,
रात्री ९ वा.
सूत्रसंचालन – रविराज गंधे



दोन्ही कार्यक्रमांचं पुन:प्रसारण त्याच आठवड्यात १७ आणि २४ मार्च रोजी शनिवारी सकाळी ११ वाजून ३० मिनिटांनी होईल.




कोंडी वाढत गेली की
आपण समजून घ्यावं
आता माणूस पेटणं
अपरिहार्य आहे.




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे कविवर्य कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' काव्यसंग्रहाच्या नावाने काव्यलेखनासाठी 'विशाखा काव्यलेखन पुरस्कार' दिला जातो. २०१७ च्या पुरस्कारासाठी सुशीलकुमार शिंदे यांच्या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय' या काव्यसंग्रहास २१ रुपये हजारांचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

## काळा घोडा महोत्सव-२०१८
## बदलत्या माध्यमव्यवस्थेत आपल्यालाही बदलावे लागेल!




**आ**जच्या गतिमान दळणवळणाच्या आणि समाजमाध्यमांचा धुमाकूळ सुरू असणाऱ्या जमान्यात प्रादेशिक भाषांतील साहित्य टिकवण्याच्या दृष्टीने काय करावे लागेल, यावर विचारविनिमय करण्याच्या हेतूने मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या 'काळा घोडा महोत्सवात' खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चेत 'ग्रंथाली'चे संस्थापक, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर आणि विश्वस्त धनंजय गांगल सहभागी झाले होते.

सत्तरच्या दशकातील साहित्य हे उच्चभ्रू समाजाचे चित्रण करणारे तत्सम लेखकांचे साहित्य होते. ती चौकट मोडून समकालीन प्रश्नांचा वेध घेणारे समकालीन लेखक धुंडाळून त्यांची प्रतिभा समाजासमोर आणण्याची गरज होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लेखक आणि त्याचबरोबर वाचकांनाही एक व्यासपीठ मिळवून देण्याची गरज होती. ते काम ग्रंथालीच्या स्थापनेमुळे होऊ शकले. 'ग्रंथाली' ही प्रकाशकांपेक्षा वाचकांची चळवळ अधिक होती, असे कुमार केतकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

'ग्रंथाली'चे विश्वस्त धनंजय गांगल यांनी यावेळी बोलताना म्हटले की, 'ग्रंथाली' ही केवळ वाचकांचीच चळवळ नव्हती तर महाराष्ट्रातील एक प्रमुख सांस्कृतिक चळवळही होती. पुढे दहा-वीस वर्षांतील दूरचित्रवाहिन्या, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या उदयामुळे एकूण साहित्य चळवळीची गती मंदावत गेली. फक्त पुस्तकेच नव्हे तर चित्रपट आणि नाटकांनाही या अनुषंगाने कात टाकावी लागली असे ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर आणि माध्यमातील सर्वंकष बदलाच्या आजच्या काळात टिकून राहायचे तर त्यांच्यासोबत आपल्यालाही बदलावे लागेल असे धनंजय गांगल यांनी स्पष्ट केले.

॥ग्रंथाली॥

नोंदणी क्रमांक ग्रंथाली विश्वस्त संस्था, ई-१३८२५ (मुंबई)

द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ • दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० • Email - granthaliruchee@gmail.com

## ९१ पुस्तके घ्या । वाचनानंदाचे १०० पैकी १०० गुण मिळवा!

९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने
९१ निवडक पुस्तकांचा संच वितरणास तयार
कोणतेही पुस्तक फक्त ९१ रुपयात. किमान खरेदी पंचवीस पुस्तके.

## ९१ पुस्तकांचा संच (मूळ किंमत २१,७७५)
## सवलतीत ८,२८१ रुपयांत उपलब्ध!
## संचातील वेगवेगळी २५ पुस्तके (प्रत्येक पुस्तक ९१ रुपयांप्रमाणे) केवळ २२७५ रुपयांत!

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण (आठवणी-आख्यायिका) | लक्ष्मण माने | २५० |
| २. | जीवन अमृत झाले | दत्ताजी देसाई | २५० |
| ३. | या फुलपाखराचं काय करायचं? | राधिका कुंटे | २०० |
| ४. | माझी आरोग्ययात्रा | श्रीकृष्ण मराठे | २०० |
| ५. | कथा माझ्या घडण्याची | प्रभाकर राणे | १६० |
| ६. | इंदिरेची स्मृतिकथा | इंदिराबाई वाडीकर | १८० |
| ७. | मी पाहिलेला म्या | मारुती ज्योतिबा सावळकर | २०० |
| ८. | ए मेरे वतनके लोगों | शिल्पा खेर | ३०० |
| ९. | गौरीकुंड १.५ कि.मी. | एकता पटेल | २०० |
| १०. | मनतरंग | दीपक घैसास | १८० |
| ११. | आंदकोळ | किसन चव्हाण | २०० |
| १२. | गाऊ त्यांना आरती | अनुराधा गोरे | ३०० |
| १३. | ...पुत्र मानवाचा! | स्मिता भागवत | २०० |
| १४. | आनंद नक्षत्र | प्रल्हाद जाधव | २०० |
| १५. | मन पाहि मागे मागे... | अरुण शेवते | १८० |
| १६. | अचानक | स्मिता भागवत | ३०० |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| १७. | हिंडता फिरता | अरुण शेवते | ३०० |
| १८. | लडाख | आत्माराब परब / नरेंद्र प्रभू | २५० |
| १९. | सहज उडत राहिलो | डॉ. सुधीर देवरे | २५० |
| २०. | फुलाला सुगंध मातीचा | डॉ. अंजली कुलकर्णी | १६० |
| २१. | रस्त्यावरची मुले : संघर्ष 'हमारा फाउंडेशन'चा | आशा राणे | २५० |
| २२. | माझे स्वप्न : डॉ. मार्टिन ल्युथर किंग, ज्युनिअर | प्रभाकर जोशी | २०० |
| २३. | लालबाग | आदिनाथ हरवंदे | ४०० |
| २४. | माझ्या वकिलीची पन्नाशी | एस.आर. चिटणीस | १६० |
| २५. | अस्फुट आवाजांचा प्रदेश | डॉ. जयश्री गोडसे | १८० |
| २६. | हंदुके टाळण्यासाठी... | ॲड. नीलिमा कानेटकर | २०० |
| २७. | आनंदाची मुळाक्षरे | प्रल्हाद जाधव | २०० |
| २८. | हत्त्या | राकेश भडंग | ३५० |
| २९. | झोके अमेरिकेतले | डॉ. अनंत लाभसेटवार | २५० |
| ३०. | मांजरफन | विद्या हर्डीकर सप्रे | २०० |
| ३१. | हृदयस्पर्शी माधवबाग | सुमेध वडावाला (रिसबूड) | २५० |
| ३२. | ज्वालामुखीच्या तोंडावर | कुमार केतकर | ३०० |
| ३३. | रंग दे बसंती चोला | स्मिता भागवत | २०० |
| ३४. | पारुल : एक प्रेमकहाणी | हर्ष देहेजिया | २०० |
| ३५. | माझ्या मनाचा मुरांबा (आंबटगोड आठवणी) | वसुमती धुरू | २७५ |
| ३६. | रत्नागिरी ते आइनस्टाइन | सर्वोत्तम ठाकूर | २५० |
| ३७. | श्रमिकांचा नेता : भाई उद्धवराव | भारत गजेंद्रगडकर | २५० |
| ३८. | माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला १९४३ | नारायण विष्णू आठवले | २२५ |
| ३९. | स्वान्तसुखाय | पद्मा कऱ्हाडे | २०० |
| ४०. | विवेकीजनीं ह्या मज जागवीलें | प्र.ब. कुळकर्णी | २०० |
| ४१. | स्थानभ्रष्ट : डॉ. शांतिलाल धनिक | स्मिता भागवत | ३०० |
| ४२. | दैवी प्रतिभेचा कलावंत : मायकेल अँजेलो | डॉ. माधवी मेहेंदळे | २०० |
| ४३. | तर्कसंग्रह महाभाष्य | माणिक गुट्टे | ५०० |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| ४४. | चेकपॉईन्ट चार्ली | डॉ. माधवी मेहेंदळे | २५० |
| ४५. | नाही चिरा नाही पणती | स्मिता भागवत | २०० |
| ४६. | सोल्जर इन मी | शिल्पा खेर | २५० |
| ४७. | शब्दकिमया | नीला पाटणकर | ३०० |
| ४८. | पंख आणि पंजे | विलास सरमळकर | २०० |
| ४९. | मराठी व्याकरणातील वादस्थळे | डॉ. सुनील रामटेके | ४०० |
| ५०. | शोधयात्रा | डॉ. अनंत देशमुख | २५० |
| ५१. | अमेरिकेच्या दुर्बिणीतून भारत | डॉ. अनंत लाभसेटवार | २०० |
| ५२. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ४०० |
| ५३. | दृष्टिपटल | डॉ. माधवी मेहेंदळे | १५० |
| ५४. | सफरछंद | पंकज घारे | १५० |
| ५५. | निर्भया लढते आहे | नीलम माणगावे | ३०० |
| ५६. | मनगट दणकट छातीत हिम्मत... | सुषमा शाळिग्राम | १५० |
| ५७. | महात्मा फुले : व्यक्तित्व आणि विचार | गं.बा. सरदार | २०० |
| ५८. | आहारसंहिता : आहार नियोजन | श्यामा रानडे | २५० |
| ५९. | सफरनामा | स्मिता भागवत | १६० |
| ६०. | आर्त माझ्या बहु पोटी | विजय शं. माळी | ६५० |
| ६१. | सोल्जर इन मी! (भाग २) | शिल्पा खेर | २५० |
| ६२. | काळोखगर्भ : 'अस्मितादर्श'मधील निवडक कथा | बबन लोंढे/सुधाकर गायकवाड | २५० |
| ६३. | डायरी | प्रवीण बर्दापूरकर | १८० |
| ६४. | आभाळाचं अनुष्ठान | यशवंत पाठक | २०० |
| ६५. | येणे बोधे आम्हा । असो सर्व काळ | यशवंत पाठक | २०० |
| ६६. | प्रसंगरंग | अरुण घाडीगावकर | १८० |
| ६७. | दि मॅन इन ऑलिव्ह ग्रीन्स | सुधीर नाफड | २२५ |
| ६८. | डॉक्टरांच्या जगात | डॉ. वर्षा दंडवते | १८० |
| ६९. | माझं साहित्यिक खटलं | ॲड. यशवंत हडप | २२५ |
| ७०. | सारांश शून्य | संजय कळमकर | ३०० |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| ७१. | संचिताची कोजागिरी | यशवंत पाठक | ३०० |
| ७२. | गुन्हेगारांच्या मागावर | यशवंत व्हटकर | १५० |
| ७३. | समाजरंग | अनिता वाकणकर-कुलकर्णी | २५० |
| ७४. | शापित भूमी : आफ्रिकेतील सत्य घटनांवर... | उमेश कदम | २५० |
| ७५. | अमीरबाई कर्नाटकी (मूळ कन्नड : रहमत तरीकेरे) | प्रशांत कुलकर्णी | २५० |
| ७६. | आठवणींच्या जगात (जर्मनीतील तीन तपांचा अनुभव) | निरुपमा प्रधान-सोनाळकर | ३०० |
| ७७. | जेनेटिक्स कशाशी खातात? | डॉ. उज्ज्वला दळवी | २५० |
| ७८. | शांताराम (व्यक्ती आणि वाङ्मय) | सुरेखा सबनीस | २५० |
| ७९. | नगरमंथन | प्रकाश पेठे | २०० |
| ८०. | धाराशीव ते उस्मानाबाद | भारत गजेंद्रगडकर | १८० |
| ८१. | नातीगोती | लता देशपांडे | १६० |
| ८२. | नियतीशी करार | संदीप जावळे | ३०० |
| ८३. | टकिला टकाटक! | डॉ. भूषण केळकर | ३०० |
| ८४. | पाचट | योगीराज बागूल | २५० |
| ८५. | भटकंतीची साद | पद्मा कऱ्हाडे | २०० |
| ८६. | चंदनाची पाखर | यशवंत पाठक | २०० |
| ८७. | घडत गेलेली गोष्ट | विजया राजाध्यक्ष | २२५ |
| ८८. | देवांसि जिवें मारिले | लक्ष्मण लोंढे/चिंतामणी देशमुख | २०० |
| ८९. | स्व..देश! (आम्ही मराठी एनआरआय) | डॉ. भूषण केळकर | १६० |
| ९०. | कळी उमलताना | अनुराधा गोरे | २०० |
| ९१. | विकासाचे निष्कर्ष (एका तपाच्या अनुभवातून) | सु.गो. तपस्वी | ३५० |




## मुलांसाठी बाल-खजिना




**गुलज़ार यांच्या (९ पुस्तकांचा) संच :- मूळ किंमत १००० रुपये**
**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने (६ पुस्तकांचा) संच :- मूळ किंमत ४८० रुपये**

**सवलतीत फक्त ७५० रुपयांत (१५ पुस्तके)**

**ता. क. : ही योजना फक्त ३० मार्च २०१८ पर्यंत! ९१ संचांपुरती मर्यादित!**
**किमान २५ पुस्तके घ्यावीच लागतील!**
**वाहतूक खर्च ३०० रु.**

**चिंतनशीलतेने जीवनाला भिडताना त्यातील प्रसन्नता अधोरेखित करणारे आत्मकथन**

मेहता पब्लिशिंग हाऊसने आतापर्यंत स्त्रियांची अनेक आत्मचरित्रं/आत्मकथनं (स्वतंत्र आणि अनुवादित) प्रकाशित केली आहेत; अर्थातच प्रत्येक आत्मचरित्राचा रंग वेगळा आहे. आत्मचरित्रातून/आत्म कथनातून त्या स्त्रीचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रतीत होत असतो. अनिता कुलकर्णी यांचं 'मॅग्नोलिया' हे आत्मकथन जीवनाकडे अतिशय चिंतनशीलतेने पाहतानाही त्यातील प्रसन्नता टिपणारं आहे.

जे. जे. कला–वास्तुशास्त्र महाविद्यालयात त्यांना मिळालेला प्रवेश, त्यावेळचं त्यांचं महाविद्यालयीन जीवन, त्यांच्या खास मध्यमवर्गीय जाणिवा, जे.जे.तील वास्तुशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर परदेशात उमेदवारी करताना नोकरीत आणि व्यवसायात आलेले अनुभव आणि त्यादरम्यान भेटलेल्या व्यक्तींबद्दल त्यांनी लिहिलं आहे. परदेशात गेल्यानंतर केन मिचेलकडे त्यांनी उमेदवारी केली. त्याच्याकडून त्यांना काय–काय शिकायला मिळालं, हे त्या कृतज्ञतापूर्वक सांगतात. अशाच कृतज्ञतेने त्या बोलतात मार्था स्ट्रोक्सबद्दल. केन मिचेलनंतर त्यांनी मार्थाकडे उमेदवारी केली तिच्याकडून त्यांना काय शिकायला मिळालं, हेही त्या नमूद करतात. मार्थाकडे काम करणारा स्टीव्ह, वास्तुशास्त्रज्ञ डेव्हिड मार्किन्स, एमिली, पीटर, लारा इ. अनेक व्यक्तींचा कधी तपशीलाने तर कधी जाता जाता उल्लेख करतात.

भारतात परतल्यानंतर त्यांनी आर्किटेक्ट म्हणून व्यवसाय सुरू केला. टेरेस गार्डन ते टाउनशिप असा त्यांचा व्यावसायिक प्रवास झाला. त्या प्रवासातील अनुभव त्यांनी सांगितले आहेत. तसेच वास्तुशास्त्राचं सौंदर्याच्या आणि भावनांच्या चष्म्यातून केलेलं आकलनही त्या मांडतात. वास्तुशास्त्राच्या क्षेत्रातील अपप्रवृत्तींबद्दलही त्या लिहितात. भारतात आणि भारताबाहेर केलेल्या भटकंतीचे अनुभवही त्यांनी सांगितले आहेत. या भटकंती दरम्यान त्यांनी अनुभवलेली निसर्गाची विविध रूपं त्यांनी शब्दबद्ध केली आहेत. आपल्या मित्र–मैत्रिणींबद्दलच्या, ज्येष्ठांबद्दलच्या भावना त्यांनी अतिशय उत्कटतेने व्यक्त केल्या आहेत.

त्यांचे व्यावसायिक अनुभव असोत, शिक्षणाच्या बाबतीतले अनुभव असोत, भटकंती असो किंवा व्यक्तिचित्रण असो, भारत आणि परदेश यांची तुलना त्या करतात. परदेशात काही वर्षं राहूनही भारतीय माणसाचं साधं जगणं, आपली कुटुंबसंस्था, नातेसंबंध याविषयी त्यांना अभिमान आहे; मात्र तिथलं शिक्षण आणि भारतातील शिक्षण यातील फरक त्यांना प्रकर्षाने जाणवतो. तिथल्या शिक्षण पद्धतीतील खुलेपणा आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना मिळणारा आत्मविश्वास यावर त्या भाष्य करतात. नवोदितांना घडवण्याची अमेरिकेतील आणि भारतातील पद्धत, यांची तुलना करताना त्या लिहितात, ''विचारांना पुरेसं खाद्य मिळत होतं आणि माझे विचार कसाला लागत होते. तुलनात्मक निरीक्षणं घडत होती. मुंबईतल्या त्या ऑफिसच्या आठवणी अजून अगदीच ताज्या असताना केन मिचेलकडचा काळ आला आणि संपलाही. मला या दोन ऑफिसांमध्ये हजारो विरोधाभास जाणवले. मुंबईतल्या नोकरीत मला पुरेसं आव्हान मिळालं नाही. परिणामी, चांगल्या कार्यपूर्तीतून येणारा आनंद, समाधान हेही दूरवरच राहिलं. शिकण्याची इच्छा होती, परंतु आजूबाजूचे सीनिअर्स शिकवण्यात रस घेणारे नव्हते. केनने मात्र पहिल्या दिवसापासून माझ्या अभ्यासाचा, अभ्यासक्रमाचा आणि व्यक्तिशः माझा– संपूर्ण आदर केला. क्षेत्रात नवोदित म्हणून शिरतानाच्या काळात मिळालेल्या या आदरामुळे माझ्या ठिकाणी नैसर्गिकपणे, त्या आदराचा मान मी चांगल्या कामाद्वारा ठेवला पाहिजे, ही एक प्रामाणिक भावना रुजू लागली.''

मेहता पब्लिशिंग हाऊस

मॅग्नोलिया

अनिता कुलकर्णी




आपल्या व्यवसायाविषयी बोलताना जाता जाता एखादी टिपही देतात. उदा. ''स्वतःच्या क्षेत्रात नुसतं तांत्रिकदृष्ट्या ठीकठाक राहून भागत नाही. प्रॅक्टिसच्या सगळ्या अंगांनी चालू असणाऱ्या उलाढालींचा ताबा घ्यावा लागतो. छांदिष्ट एकटेपणातून उत्तम डिझाइनच्या निर्मितीची उपासना करत असताना चांगल्या जनसंपर्काचं भानही ठेवावं लागतं. कागदावर सुंदर चित्र रंगवत असताना संबंधित जगातलं राजकारणही जगावं लागतं.'' त्यांच्या या आत्म कथनातून वास्तुशास्त्रज्ञ किंवा आर्किटेक्टचं काम नक्की कसं चालतं, या व्यवसायातील आव्हानं काय आहेत, व्यवसाय करताना कोणती पथ्यं पाळावी लागतात इ. या व्यवसायाशी निगडित अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो. लालित्यपूर्ण भाषा हे या आत्मकथनाचं वैशिष्ट्यं आहे.

जीवनात भौतिक गोष्टींसाठी किंवा मानसिक, भावनिक संघर्ष आला नाही तरी आपलं आपल्या मनाशी जीवनविषयक चिंतन चालू असतं. ते चिंतन त्यांनी शेवटच्या प्रकरणात मांडलं आहे. एकूणच त्यांच्या या आत्मकथनाला चिंतनशीलतेची, अध्यात्माची किनार आहे. लौकिक अनुभव आणि सौंदर्यपूर्ण अनुभव या हिंदोळ्यावर त्यांचं मन झुलताना दिसतं. जीवनाला चिंतनशीलतेने भिडताना त्यातील सौंदर्य, आनंद आणि शब्दातीत अनुभूती त्या टिपतात. म्हणूनच या आत्म कथनाला 'मॅग्नोलिया' असं सार्थ नाव त्यांनी दिलं आहे. मॅग्नोलियाबद्दल त्या स्वत:च लिहितात, मॅग्नोलिया म्हणजे 'मूर्तिमंत सौंदर्य, आनंद आणि शांती!' त्यांचं हे आत्मकथनही वाचकाला या तीन गोष्टींची अनुभूती देतं. तेव्हा जीवनाला विविध सकारात्मक अंगांनी कवेत घेऊ पाहणारं हे आत्मकथन मुळातून आणि आवर्जून वाचावं असं आहे.

**– अंजली पटवर्धन**

**मॅग्नोलिया**
लेखक : अनिता कुलकर्णी
पृष्ठसंख्या : २६४
किंमत : २९५ रु.
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत २६० रुपये**


# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

## बिमल रॉय यांची मधुमती

**सरोज बावडेकर**




### अंतरंग शोधण्यातला कुतुहलाचा प्रवास

'मधुमती ' नावाचा चित्रपट पडद्यावर झळकला तो १९ सप्टेंबर १९५८ रोजी. तो काळ म्हणजे ब्लॅक अँड व्हाईटचा. त्या काळात पाहिलेले आणि कायमचे स्मरणात राहिलेले जे चित्रपट आहेत त्यात 'मधुमती'ने आपले स्थान अढळ ठेवलेले असल्याचे सगळेच मान्य करतील. 'मधुमती' हा चित्रपट बिमल रॉय यांच्या दिग्दर्शनामुळे गाजला. दिलीप कुमार आणि वैजयंतीमाला यांच्या उत्कट अभिनयाने गाजला. सलील चौधरी यांचे मधुर संगीत आणि शैलेंद्र यांच्या भावविभोर गीतांमुळे गाजला. ब्लॅक अँड व्हाईट असूनही निसर्गसौंदर्यामुळे तो लक्षात राहिला. आजही त्याची 'सुहाना सफर...', 'बिचुवा...', 'आजारे, कबसे खडी...' ही गाणी कानांवर पडली की संपूर्ण चित्रपट नजरेसमोर उभा राहातो.

'मधुमती' हा बिमल रॉय यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट. बिमल रॉय हे हिंदी सिनेमातील प्रतिभावान दिग्दर्शक आणि एक अविस्मरणीय, असामान्य, आदरणीय व्यक्तिमत्त्व. चित्रपट निर्मिती करताना ते कथा निवडीपासून ते कथा पडद्यावर साकार करण्यापर्यंत कसा विचार करीत, पात्रांची चपखल निवड कशी करीत, चित्रपटासाठी संगीत आणि गीत यांच्याविषयी कसे चोखंदळ असत, शूटींगसाठी स्थळांची कशी निवड करीत, दृश्य अधिक परिणामकारक व्हावे म्हणून कसे प्रयत्न करीत, करायचे ते नेमके आणि परिपूर्ण याविषयी कसे आग्रही असत, आलेल्या प्रसंगांवर मात कशी करीत आणि या सगळ्यात एक दिग्दर्शक, एक व्यक्ती, एक माणूस म्हणून कसे इतरांशी वागत, या सगळ्यांचे कुतूहल अनेकांना आहे. तेच कुतूहल त्यांची कन्या रिंकी रॉय-भट्टाचार्य यांनाही होते. वडिलांच्या पश्चात ते अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. त्या कुतुहलापोटीच त्यांनी 'मधुमती' आणि या चित्रपटामागील घटनांची निवड या पुस्तकासाठी केलेली आहे. त्या अर्थाने हा त्या चित्रपटाचा दस्तऐवज म्हणता येईल.

बिमल रॉय प्रॉडक्शनची स्थापना 'रोशोमान' हा चित्रपट पाहिल्यानंतर झाली आणि त्यासारखा चित्रपट काढण्याची कल्पनाही याच चित्रपटामुळे पुढे आली. ही हृषीदांची आठवण थेट मुळाशी घेऊन जाते. भुतखेत -पुनर्जन्म यांच्या समन्वयावरील ऋत्विक घटक यांनी लिहिलेल्या या कथेला बिमलदांनी भूतकाळ आणि वर्तमानकाळाशी जोडणारी प्रेमकथा म्हणून सादर केले. अभिनेता म्हणून दिलीपकुमारची निवड केली. आनंद आणि दुःख यांच्या भूमिका समर्थपणे पेलणारा हा नट. ही भूमिका स्वीकारण्याचे कारण विचारले असता दिलीपकुमार उत्तर देतात, 'बिमलदांबरोबर काम करण्याची संधी, पण मधुमतीमध्ये प्रोत्साहन आणि अनिश्चितता ह्यांचा सुरेख मेळ होता.' तर वैजयंतीमाला म्हणतात, 'बिमलदांसारख्या गंभीर चित्रपट बनवणाऱ्या दिग्दर्शकांनी माझी निवड केली तेव्हा कुणीतरी मला स्वर्गातून अमृत पाठवल्याचा आनंद झाला.'

या चित्रपटातील भरपूर नृत्य आणि एकापेक्षा एक सरस मधुर गाणी यासाठी सोहनलाल, सचिन शंकर, सत्यनारायण यांना श्रेय जाते. 'बिचुवा' या गाण्यात एक तेरा वर्षाची मुलगी नाचताना दाखवली आहे, ती आहे आजची प्रसिद्ध कोरिओग्राफर 'सरोजखान'. पुढे तिने नृत्यशिक्षक सोहनलाल ह्यांच्याशी लग्न केले. सिनेमॅटोग्राफर दिलीप गुप्ता हे पहिले सिनेमॅटोग्राफर होते, ज्यांनी हॉलिवूडमध्ये रीतसर शिक्षण घेतलेले होते. त्यांनी प्रकाश आणि काळोख याचा सुरेख उपयोग केल्याने अनेक प्रसंग प्रत्ययकारी झालेले आहेत. त्यांच्यामुळे 'मधुमती' हा चित्रपट सिनेमॅटोग्राफीच्या विद्यार्थ्यांना एक अभ्यासग्रंथ वाटतो, असे एका विद्यार्थ्याने मत व्यक्त केले. शूटींगसाठी नैनिताल, राणीखेत, भोवाली, घोराखाल अशा ठिकाणांची निवड करताना, तेथील लोकजीवन, कपडे, वागणे यांचा अभ्यास केल्याचे जाणवते. तसेच इगतपुरी, खंडाळा यांचाही उपयोग वरील ठिकाणांसारखाच केलेला आहे.

सलील चौधरी हे रीतसर शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतलेले संगीतकार नसून ते पडलेले संगीतकार आहेत, असे सर्वजण म्हणत परंतु बिमलदांनी त्यांच्यावर पूर्ण विश्वास दाखवला. तो किती सार्थ ठरला हे पुढे सिद्ध झाले. '' 'आजारे परदेसी...' हे गाणे रेकार्ड झाले तेव्हा शैलेंद्रने खूश होऊन मला मोठ्ठा फुलांचा गुच्छ दिला होता'', असे लता मंगेशकर सांगतात.

सर्वांगाने अत्यंत यशस्वी ठरलेल्या या 'मधुमती'च्या पडद्यामागील अप्रकाशित घटनांची कहाणी शोधण्याचा लेखिकेने कसोशीने प्रयत्न केला आहे.

संशोधनाचे कुतूहल नजरेसमोर ठेवून लिहिलेले असले तरी लिखाणातला सर्वांगीण वेध घेण्याचा चौकसपणा लक्षात येण्यासारखा आहे. हवे ते मिळविण्यासाठी जशी धडपड आहे, तशीच लेखनाचा स्तर प्रवाही ठेवण्यातला दर्जेदारपणाही आहे. 'सावलीत पारा चाळीस डिग्री असूनही तो थंड स्वभावाचा माणूस वितळला नाही', असे वाक्य त्या लीलया लिहून जातात.

त्यामुळेच हे पुस्तक केवळ 'मधुमती' चित्रपट आणि त्याच्याशी संबंधित व्यक्ती, स्थळे याविषयी वर्णन करीत नाही तर त्यानिमित्ताने त्या काळच्या अनेक व्यक्ती, घटना, चित्रपट, संगीत, कलावंत, पुस्तके, वचने, यांची माहिती देत जाते. प्रत्यक्ष भेटलेल्या अनेकांची मुलाखत देते. त्यांचे आपसातले व्यवसायिक आणि अंतरिक नाते उलगडून दाखवते.

दिलीपकुमार आणि वैजयंतीमाला यांच्यावरील दिव्याच्या प्रकाशातील एक दृश्य घेऊन प्रकाश आणि काळोख यांचे गूढ निर्माण करणारे उत्तम मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये • सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**श्रेय ज्याचे त्याचे**

**माधुरी अरुण शेवते**




## आपलेपणातली आपली व्यक्तिचित्रे

'श्रेय ज्याचे त्यास द्यावे' हे व्यक्तिचित्रणाचे पुस्तक ग्रंथालीने प्रकाशित केले आहे. माधुरी अरुण शेवते यांचे हे पहिलेच पुस्तक. ग्रंथाली अशाच लेखकांच्या शोधात असते. ज्यांच्याकडून सराईताहून वेगळे काही अस्सल मिळण्याची अपेक्षा असते. आणि ही अपेक्षा अनेक लेखकांनी पूर्ण केलेली आहे त्याच अपेक्षाची पूर्ती करणारे हे पुस्तक आहे. यातील लेख यापूर्वी दिवाळी अंकांतून प्रकाशित झालेले आहेत. मोजकेच आठ लेख आहेत परंतु मनाचा ठाव घेणारे आहेत. अगदीच स्पष्टपणे सांगायचे झाले तर नितळ मनाने अंतरंगातील सुंदर अनुभवांना मोकळे केलेले आहे; ताज्या टवटवीत फुलांची प्रसन्न ओंजळ समोर घरावी!

गुलजार आणि अरुण शेवते ही दोन नावे आता वेगळी करता येणार नाहीत, दिसतील फक्त वेगळी टाळांसारखी इतकेच परंतु त्यांच्यातून निघणारा नाद एकच असेल. गुलजार साहेबांचा लेख ऋतुरंगमध्ये असणे ही ऋतुरंगची संपादकीय लेखासारखी अनिवार्यता झालेली आहे. त्यामुळे गुलजार साहेबांचा स्नेह शेवते कुटुंबीयांची जणू एक जन्मोजन्मीचा अनुबंध व्यक्त करणारी नातेठेव आहे. त्यांचा वत्सल स्नेह, वडिलकीच्या नात्याने दिलेले प्रेम हा या कुटुंबाचा मौलाचा ठेवा आहे. लग्न सोहळा असो, दिवाळी असो, पुस्तक प्रकाशन, दिपाळीअंक प्रकाशन वा कुठलेली निमित्त असो, गुलजारसाहेबांची अगत्यपूर्वक उपस्थिती ठरलेली! फोनवरून चौकशी करणे तर हक्काचेच झालेले. बहूच्या हातच्या वड्यांची तारीफ, पोहे आणि हिरव्या टोमॅटोची चटणी, बेसनाचे लाडू हे आवडीचे पदार्थ आणि त्यासाठीची आग्रहपूर्वक मागणी, ही लेखिकेसाठी मोठी बिदागी असते. शर्वरीचे आजोबांच्या नात्याने लाड करणे हा वेगळाच अनुभव. 'दिवाळीच्यावेळी त्यांच्याकडून वेलदोडे घातलेली खडीसाखरेची बरणी येणे म्हणजे अप्रूपच. साखरेला लागलेला वेलदोड्याचा वास, तुमच्या गाण्यांचा सूर, सुगंध, कवितेच्या ओळी, तुमचा चेहरा आठवत बरणीतील साखर संपू नये असे वाटते. चव, सुगंध, प्रतिभा सर्व एकत्र होऊन साखर जास्त गोड होऊन जाते.' ही लेखिकेची भावनिक साद सारेच सांगून जाते.

यशवंतराव गडाखसाहेब म्हणजे पित्याच्या जागी असलेले दुसरे व्यक्तिमत्त्व. त्यांचे सोनई साखर कारखान्याचे चेअरमनपद, त्यांची खासदारकी, त्यांचा राजकीय दबदबा, हे सारे शेवते कुटुंबीयासाठी झुलीसारखे बाजूला ठेवले जातात आणि उरतात ते फक्त आपसातले नात्याचे बंध. साहेबांनी या कुटुंबाला आपल्याच कुटुंबातील एक मानलेले आहे. प्रत्येक सुखदुःखात ही दोन्ही कुटुंबे वेगळी नसतात. आईच्या मृत्यूनंतर अनावर शोक व्यक्त करण्यासाठी आश्वासक आधाराचा खांदा गडाखांचाच होता, यातून आपलेपणाच सिद्ध होतो. वाढदिवासासाठी हजर राहण्याला तर कुठेच पर्याय नसतो. कुलू-मनालीची ट्रीप अर्ध्यावर सोडून थेट महाबळेश्वरला वाढदिवसासाठी हजर होण्यातली शेवते यांची तगमग या नात्यातील जिव्हाळा दाखवते. आणि साहेबही बंगल्याच्या बाहेर उभे राहून वाट पाहतात. तेव्हा लेखिका लिहितात, 'मनातून गलबलून आले. वाट दाखविणाऱ्यालाच वाट पाहावी लागत होती. याचे खूप वाईट वाटले.' गडाखसाहबांचे मोठेपण नुसते बाहेरच नाही, तर कुटुंबातही आहे. संपूर्ण घर एकत्र नादंत आहे. समारंभाला सर्व कुटुंब, नातेवाईक यांना एकत्र आणतात. सगळ्यांची काळजी घेतात. पोरींनो जेवून घ्या, हा आग्रह धरतात. अतिशय कुटुंबवत्सल असे हे व्यक्तिमत्त्व आहे.

'बाई' या लेखात सासूबाईविषयी लिहिलेले आहे. त्यांचा जिव्हाळा, त्यांनी केलेले प्रेम, दिलेले संस्कार, हा ठेवा खूप मोठा आहे. त्यांनी काबाडकष्ट केले पण आपला करारीपणा सोडला नाही. उपाशी राहण्याचे दिवस आले, पण शेजाऱ्यांना दिसावे म्हणून खोटी-खोटी भांडी घासली आणि चूल पेटलेली ठेवली. दोन मुलांना वाढवले. त्याही परिस्थितीत वाचनाचा छंद जोपासला. त्यांच्या धीर आणि धीटपणाविषयी लेखिका लिहितात, 'त्यावेळेस तुमच्यासमोर अंधार होता. त्याचबरोबर पाणी देखील अथांग होते, पण तुम्ही त्या अंधारावर, पाण्यावर मात करत मुलांना वाढवलेत. डोळ्यांतले खारे पाणी गोड्या पाण्यात मिसळून टाकलेत... डोळ्यांतले पाणी नदीला दिले वाहण्यासाठी आणि मन मात्र नदीसारखे अथांग केले होते.'

अरूण शेवते आणि शर्वरी ही तर रक्ताने जोडलेली नाती. पती आणि कन्या. अरूण हे लेखक, कवी, संपादक. 'अरे जगणं मरणं एका श्वासाचं अंतर' या कवितेच्या ओळी आयुष्यात कशा सार्थ आहेत, त्यांचा संदर्भ ठेवून अरूण यांच्याविषयीचे अनुभव या लेखात दिलेले आहेत. शर्वरी म्हणजे पौर्णिमेचे चांदणे. तिच्यामुळे त्यांच्या आयुष्यात चांदणे आले. तिच्या खाऊच्या डब्यात फुलवाती ठेवण्याची कल्पकता ही फुलासारखी फुलण्यासाठी, वातीसारखी तेवण्यासाठी. या दोघांविषयी लिहिताना संयम आणि तटस्थता यांची परीक्षाच होती. तरीही नेमकेपणाची कास ठेवून अंतरंग मोकळे केलेले आहे. तीच गोष्ट शरद पवार साहेबांचे सचिव धुवाळीसाहेब यांची. देवाधर्माचे वेड जपण्यापेक्षा माणसांचे काम करणे एवढेच ध्येय जपलेले. आयुष्यभर निष्ठा बाळगली ती साहेबांची. घरी आलेली चंदाराणी, एक परकरी गरीब पोर कामानिमित्ताने येणारी आणि खरेच मनाला चटका लावणारी आहे.

एक सुंदर पुस्तक वाचल्याचा आनंद हे पुस्तक देते. व्यक्तिचित्रणात अनेक पैलू आहेत. त्यातला भावनिक जिव्हाळा, आत्मीयता, उत्कटता एका गृहिणीच्या नितळ नजरेतून दिसतो. माणूस आणि नात्याला आत्मसात असलेली तरलता या लेखांतून दिसून येते. पुस्तक पहिले असले तरी त्यातला दमदारपणा आश्वासक आहे.

**मूल्य १२० रुपये ● सवलतीत ८० रुपये**

# ग्रंथपान

## सौंदर्ययात्री

**माया परांजपे**




**इथे नांदतो ध्यास सौंदर्याचा!**

'मुलांच्या वाढत्या वयात आजी, आजोबा किंवा चांगल्या वळणाची मोठी माणसे जवळ असणे आजच्या धकाधकीच्या आयुष्यात नक्की मुलांच्या आयुष्यात फरक करतात. ही आपली संस्कृती आपण जितकी जपू तेवढी फायद्याची आहे.' मन संस्कारक्षम असेल तर कुटुंबही त्याच वळणाने जाते. गरज आहे ती ते वळण जपण्याची, सोबत घेऊन चालण्याची, पुढे जाणाऱ्याच्या पाठीशी उभे राहण्याची. तसे घडले तर कुठल्याही वळणावर मागे वळून पाहण्याची गरज पडत नाही. अशाच संस्कारक्षम कुटुंबाच्या कर्तृत्वाच्या यशाची गाथा म्हणजे 'सौंदर्ययात्री'!

पुण्यात बीएससीपर्यंत केवळ लायब्ररीच्या पुस्तकांवर अभ्यास करणारी, पहिला वर्ग प्रत्येक वर्षी मिळवणारी माया लग्नानंतर पतीच्या नोकरीमुळे थेट स्वित्झर्लंडला गेली. सदाशिव पेठेतील दोन खोल्यांत राहणारी माया विमानाने जगाचे नंदनवन असलेल्या स्वित्झर्लंडला जाते ही गोष्ट परिकथेसारखी ठरली. परंतु ही त्यांच्या भावी कर्तृत्वाची नांदी ठरली. तिथे आरामात राहण्याऐवजी त्यांनी लॅब असिस्टंटची नोकरी स्वीकारली. त्यात शिकण्याचा ध्यास कायम ठेवला. भारतात परतल्यानंतर ओव्हेशन नावाच्या प्रसाधन कंपनीत 'ब्युटी काउन्सिलर' म्हणून नोकरी मिळाली. कौशल्याच्या जोरावर 'सौंदर्य समुपदेशक म्हणजे स्टार ब्युटी काउन्सिलर' वर नेमणूक झाली. कंपनीने पार्लरचे सौंदर्यशिक्षण देणे सुरू केले. त्याच्या जोडीला केशरचनांच्या वर्गांत प्रवेश घेतला. नव्याची खूप ओढ व नावीन्यपूर्ण गोष्टी शिकण्याचा आस्थापूर्वक छंद या अंगभूत गुणांच्या जोरावर 'इंटरनॅशनल स्कूल ऑफ नॅचरल ब्युटी थेरपी' लंडन येथे संपूर्ण ब्युटीचे शिक्षण घेतले. या जोरावर , स्वतःवर पूर्ण विश्वास ठेवून आणि काम करण्याची प्रचंड इच्छा मनात ठेवून स्वतःचे पार्लर सुरू केले. ही सुरुवात भावी आयुष्याला खूप वेगळे वळण देऊन गेली. पुढे आणखी शिक्षण घेतले. सौंदर्यशास्त्राच्या वेगवेगळ्या कला जगातल्या तज्ज्ञांकडून आत्मसात केल्या. लागणारी प्रसाधने स्वतः तयार करण्याचा ध्यास घेतला. यातून ब्युटीपार्लर, स्पा ची अनेक ठिकाणी केंद्रे सुरू झाली. स्वतःची प्रसाधने निर्मिती स्वतःच्या कारखान्यात सुरू झाली आणि पाहता पाहता व्याप आणि कीर्ती यांनी गगनाला गवसणी घातली. आकाशवाणी, दूरदर्शनवर याच विषयांवर कार्यक्रम करण्यासाठी आमंत्रित करण्यात येऊ लागले. वृत्तपत्रांतून सदरलेखन सुरू झाले. 'अस्थेटिक' व 'बॅबटॅक' ची सदस्यता चालत आली. ब्रिटिश स्कूलशी संलग्नता मिळाली. आंतरराष्ट्रीय परीक्षा घेण्यास मान्यता मिळाली.. जगातल्या छत्तीस देशांमध्ये भारताचे नाव सिडेस्कोच्या नकाशावर आले व सिडेस्को परीक्षा देणारी भारतातील पहिली शाळा ठरण्याचा मान त्यांच्या संस्थेला मिळाला. नुसतेच ब्युटीपार्लर चालवले नाही तर त्याद्वारे प्रशिक्षण देणारे केंद्र, कॉलेज सुरू केले, आणि त्यांना जागतिक स्तराचा दर्जा प्राप्त करून दिला.

पती –विजय यांनी दिलेले प्रोत्साहन, वडिलांच्या जागी असलेले कडक शिस्तीचे सासरे, अनय आणि आदित्य या मुलांचे शिक्षण आणि त्यांचा व्यवसाय, दीपा आणि प्राजक्ता या सुना, नातवंडे या सगळ्यांचे वेगळेपण, वैशिष्ट्ये जे अनुभवास आले, जाणवले, त्यांचे वर्णन तपशिलाने केले आहे. बालपण, शिक्षण, ब्युटी पार्लरविषयी असलेला समज याविषयी समरसून लिहिले आहे. जगभराचा झालेला प्रवास मोठाच परंतु तिथल्या प्रवासवर्णनापेक्षा ब्युटीपार्लर, प्रसाधने, त्यातले बारकावे, शिक्षण देणाऱ्या संस्था, शिक्षक यांच्याविषयी अधिक तपशील दिलेला आहे. या निमित्ताने या व्यवसायाचे जाळे किती मोठे आहे, याचा प्रत्यय या लेखनातून येतो.

मिळालेले यश कसे साध्य झाले याविषयी माया परांजपे लिहितात, 'मागणी आणि मैत्रिणी, ग्राहक ह्यांच्या आग्रहामुळे जे काही घडत गेले त्या साऱ्याच्या मागे माझी नावीन्याची ओढ, अभ्यास करण्याची आवड आणि परिश्रमातून निर्माण झालेली कला आहे. ह्या साऱ्याचा एकत्र संगम होऊन जे काही उभे केले ते घडले.'

स्वतःविषयी लिहितांना अनेकदा संकोच वा दडपण आल्यासारखे होते परंतु विनाकारण फाफटपसारा सांगत बसण्यापेक्षा, आपल्याला जे सांगायचे आहे त्याच्याशीच एकनिष्ठ राहिले, तर असे होण्याचे कारण नसते. माया परांजपे यांची एकनिष्ठता अनेक पातळीवरील आहे. कुटुंब आहे, व्यवसाय आहे, स्वतःच्या जगण्याच्या कल्पना आहेत आणि मिळालेले यश तर उत्तुंग म्हणावे असे आहे. तरीही अतिशय संयमितपणे त्यांनी आपल्या प्रवासाविषयी लिहिलेले आहे. बरे हा प्रवास तसा नाजूक आणि तितकाच कुतुहलाचा. नवनवीन प्रयोगांचा, शिक्षणाचा, प्रवासाचा, ध्यासाचा, उद्योगजकतेचा आणि यशाचा. या सगळ्यांत त्यांचे अस्तित्व केंद्रस्थानी असूनही त्यांनी इतरांच्या मोठेपणाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे. स्वतःच्या पुढे जाण्यात इतरांचा वाटा किती आहे, याची कृतज्ञता वारंवार स्पष्ट केली आहे. तीही मोकळेपणाने. कटुतेचा कुठे उल्लेख नाही. त्यामुळेच हा आलेख आत्मचरित्राचा असला तरी तो एका कर्तृत्ववान गृहिणीचा, ध्यासासक्त उद्योगी महिलेचा सौंदर्यशील प्रवास आहे, असे म्हणावेसे वाटते.

नीला सत्यनारायण यांनी प्रस्तावनेत माया परांजपे यांच्या कर्तृत्वाविषयी आपुलकीने लिहून कौतुक केले आहे. स्वतः लेखिकेनेही आपल्या मनोगतात या प्रवास–यात्रेविषयी लिहिले आहे. पुस्तकात काही फोटो दिलेले आहेत, ते एकूण प्रवासातील काही खुणा स्पष्ट करतात. पुस्तकाच्या शेवटी लेखिकेचा परिचय दिलेला आहे. तो जिज्ञासूंनी जरूर लक्षात घ्यावा असा आहे. एक गृहिणी कुठल्याकुठे आणि कशी झेप घेऊ शकते, याचा अंदाज त्यावरून येईल. कुणाही ध्यासवेड्यासाठी हे आत्मचरित्र नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर सजवलेल्या पंखांचा उंच झेप घेतलेला पक्षी दाखवला आहे. हा पक्षी लेखिकेच्या कर्तृत्वाचा साता समुद्रापार पोहोचलेल्या यशोगाथेचा प्रतिनिधी आहे असेच त्याकडे पाहताना वाटत राहते.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**नेदरलँड डायरी**
**आपलेपणाचे आख्यान**
**सुलभा कोरे**




**निसर्गाइतकाच निमग्न लोकांचा देश**

'नेदरलँड – डायरी' हे पुष्पिता अवस्थी यांनी हिंदीतून लिहिलेले पुस्तक. त्याचा मराठीत अनुवाद केला आहे सुलभा कोरे यांनी. नेदरलँड हा हृदयाच्या आकाराचा देश. समुद्राला बांध घालून त्याची जमीन मिळवलेला. त्या जमिनीवर वसवलेला. त्यामुळे हा निसर्गनिर्मित देश नसून मानवनिर्मित आहे. हा नद्यांचा देश आहे तसा कालव्यांचा. आश्चर्याची बाब म्हणजे इथल्या तंत्रज्ञांनी प्रशस्त व छान रस्ते बनविलेले आहेत ते नदीच्या खालून, ज्यावरून मोठमोठे अवजड ट्रक, उंच डबलडेकर बसेस अरामात येऊ जाऊ शकतात. इतकेच नाही तर, समुद्राच्यावरूनही नद्या वाहतात, ज्यातून मोठमोठी जहाजे जातात. अमस्टरडॅम शहरात शंभर कालवे आहेत. या कालव्यांवर एक हजारांवर स्वयंचलित पूल आहेत. बरे हा देश लांबी रुंदीने मोठा आहे, असे समजण्याचे कारण नाही. त्याची लांबी ३०४ कि.मी. व रुंदी २५६ कि.मी. आहे. यात १२ प्रांत आहेत. इथली लोकसंख्या १६.७ दशलक्ष आहे तर प्रतिव्यक्ती जेडीपी कॅपिटा ४०,०४० यूरो आहे. इथल्या बेकारीचा टक्का ६.५ असून त्यासाठी सरकारकडून ठरावीक रक्कम दिली जाते. हा देश पूर्वी कोळी आणि शेतकऱ्यांचा असल्याने ग्रामीण संस्कृती इथे पावलोपावली दृष्टीस पडते. नेदरलँडचे मूळ निवासी डच आहेत. फ्रांसिसी, इंग्रजी, जर्मन, स्पॅनिश आणि पोतुर्गीज अशा अनेक भाषा या लोकांना आत्मसात आहेत. इथल्या शाळांमधूनही त्या भाषा शिकविल्या जातात परंतु या देशाची भाषा डच असून ती या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आलीच पाहिजे, हा दंडक आहे. शिक्षणाबाबत हे लोक जागरूक आहेत. मूल चार वर्षाचे झाले की, त्या भागातील शाळेत त्याचे नाव सरकारकडून नोंदविले जाते. शिक्षणाबाबतची नोंद मजेशीर आहे. मूल किंवा तरुण वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाला की त्याचे आईवडिल त्यांच्या घराच्या दरवाजाजवळ काठीला दप्तर आणि फुगे टांगून ठेवतात. त्यावरून त्या भागात कोणकोण मुले पास झाली आहेत, याचा अंदाज इतरांना येतो. जिथे असे काही टांगलेले नसेल, तर लोक समजतात, या घरातला मुलगा नापास झाला आहे.

हा देश पवनचक्क्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आज इथे बाराशे पवनचक्क्या आहेत. इथली माणसे आपले काम आपणच करतात. स्वतःसाठी आणि आपल्या घरासाठी काम करण्याची या लोकांची ही सवय एवढी खरी व प्रामाणिक असते की कुणाच्याही घरात नोकर वा ड्रायव्हर दिसणार नाही. सरकारी अधिकाऱ्यांना अन् मंत्र्यांना सरकारी घर, नोकर, कार, ड्रायव्हर यासारख्या सुविधा मिळत नाहीत. सायकलचा वापर सर्रास केला जातो. सायकल ही जणू त्यांची प्राथमिक गरज आहे. स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि वेगाचे प्रतीक म्हणून मिरवल्या जातात त्या सायकलीच. कुठल्याही शाळेची स्वतःची बस नाही. इथे पुढे जाण्यासाठी वशिला वा अन्य प्रकार नाही कारण हा देश योग्यता आणि क्षमतेचा पुजारी आहे. जात, धर्म, वर्ण, वर्ग याला महत्त्व नाही.

साहित्य, कला यांची विशेष दखल घेणारा हा देश आहे. व्हॅनगॉगच्या नावाने इथे मोठे संग्रहालय आहे. अनेक मजल्यांची पुस्तकांची दुकाने इथे आहेत. प्रत्येक गावात, खेड्यात पुस्तकांची दुकाने आढळतात. पुस्तकनिर्मिती, विक्री, लेखकाचे मानधन, त्याचा दर्जा, यांची विशेषत्वाने काळजी घेतली जाते.

चीझ हा इथली विशेष खासियत. पशुपालन इथला सर्वात मोठा व्यवसाय आहे. १.९ मिलियन गायींपासून मिळणाऱ्या दुधापासून चीझ बनविण्याचा व्यवसाय इथे चालतो. चीझच्या बावीस फॅक्टरीज इथे आहेत. चीझचे अनेक प्रकार असून त्याचे स्वतंत्र संग्रहालय आहे. त्याचा खास महोत्सव आयोजित केला जातो.

इथल्या लोकांना भटकंतीचे वेड आहे. सुट्टी मिळाली की ते भटकंतीवर निघतात. मनासारखे राहणे, जगणे यातही ती आनंद, सुख मिळवत असते. लग्न हा त्यासाठी अडसर नाही. दागिन्यांची हौस नाही. शरीर हाच तिच्यासाठी दागिना असतो.

फूटबॉलचा खेळ ही या देशाची ओळख. तशी ट्युलिपची फुले. हा देश ओळखला जातो तो या दोहोंसाठी. भारतीय लोक पिढ्यान् पिढ्या इथे नांदत आहेत. त्यांनी चालीरिती जपल्या आहेत.

एखाद्या देशाविषयी लिहिताना प्रथम तो देश पूर्णपणे आत्मसात करावा लागतो. त्याच्या अंतरंगात उतरावे लागते. मानवी मन, समाजाचे तत्वज्ञान समजून घ्यावे लागते आणि निसर्गाचा एक भाग होऊन जगावे लागते. तर तो देश कळू शकतो, शब्दांत मांडता येऊ शकतो. पुष्पिता अवस्थी यांचे लेखन या सगळ्यांची साक्ष देते. एकेक प्रकरण घेऊन त्यांनी तिथली सगळी वैशिष्ट्ये वाचकांच्या समोर चित्रित करून दाखवली आहेत. त्यामुळे आपण पुस्तक वाचत नसून प्रत्यक्ष नेदरलँडमध्येच वावरत आहोत, असा भास होतो. आणि वाचून झाल्यानंतर असा देश एकदातरी पाहायलाच हवा, या निर्णयावर येतो. अवस्थी या हिंदीतील उत्तम साहित्यिक आहेत त्यांचे या भाषेतील साहित्यिक योगदान मोठे आहे. आणि त्यांचा त्यासाठी अनेक पुरस्कारांद्वारे सन्मान देखील करण्यात आलेला आहे. त्याच श्रेणीतील हे पुस्तक असून त्याचा अनुवाद मराठीत त्याच दर्जाने झालेला आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. जीवन आणि निसर्ग यांचे सौंदर्य उलगडून दाखवताना भाषेचे सौंदर्यही पदोपदी जाणवते. आपण अनुवादाच्या स्वरुपात हे पुस्तक वाचत आहोत, असे परकेपण इथे अभावाने देखील जाणवत नाही. सुलभा कोरे यांचे भाषेतील सिद्धहस्तपण इथे उठून दिसते.

नेदरलँडची ओळख म्हणजे तिथली जीवनशैली, सायकलचा जास्तीत जास्त उपयोग, बागा, मन मोहून टाकणारी ट्युलिपची फुले, पवनचक्की आणि भरपूर दूधदुभते. ही सगळी एकत्रित मांडून मुखपृष्ठ सजवले आहे. पाहताच क्षणी नेदरलँडची ओळख व्हावी. सतीश भावसार यांची ही कल्पना उत्तमच.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.

## पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



डॉ. विजय ढवळे लिखित 'मार्मिकताय नम:' आणि 'शब्दांच्या फुलवाती' पुस्तक प्रकाशनसमयी डॉ. लतिका भानुशाली, लेखक डॉ. विजय ढवळे, उद्धव ठाकरे, मनोहर जोशी, संजय राऊत, श्रीधर पाटील आणि सुदेश हिंगलासपूरकर




डॉ. मृण्मयी भजक लिखित 'अमेरिका : खट्टी-मिठी' या पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, कुमार केतकर, मोनिका गजेंद्रगडकर, लेखिका डॉ. मृण्मयी भजक, उषा मेहता आणि मेधा आलकरी



डॉ. अनंत लाभसेटवार लिखित 'हुंकार' पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, डॉ. लता लाभसेटवार, डॉ. प्रकाश लोथे, लेखक डॉ. अनंत लाभसेटवार, डॉ. उदय निरगुडकर, उषा तांबे आणि डॉ. लतिका भानुशाली



अशोक गुप्ते लिखित 'रुमी' या पुस्तक प्रकाशनसमयी डॉ. अशोक पाटील, ए.के. शेख, कवी दुर्गेश सोनार, प्रा. अशोक बागवे, कौशल इनामदार आणि लेखक अशोक गुप्ते




नीला उपाध्ये संपादित 'कथाव्रती अरविंद गोखले' या पुस्तकप्रकाशनमयी ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. बाळ फोडके, सुरेखा सबनीस, सुदेश हिंगलासपूरकर, विश्वास मोकाशी, गिरीश बापट, अरविंद तांबोळी




दिप्ती वारंगे लिखित 'दृष्टिकोन' पुस्तक प्रकाशसमयी उषा तांबे, अशोक बेंडखळे, इब्राहिम अफगाण व इतर मान्यवर







प्रकाश पेठे लिखित 'बखर वास्तुकलेची' या पुस्तकाचे ९१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात प्रकाशन बडोदा येथे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते झाले. दुसऱ्या छायाचित्रांत संमेलनाला स्टॉलवर पुष्कर श्रोत्री, कमलेश भडकमकर आणि विजय पटवर्धन यांनी भेट दिली.



संगिता धायगुडे लिखित 'हमान' या पुस्तकाच्या आठवी आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ कवी ना.धों. महानोर यांच्या हस्ते झाले.